महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-४२२ ००२.
[illegible]
रजि.ऑफीस -"आदिवासी विकास भवन", [illegible], तार - ट्रायबल कॉर्प ,फॅक्स- (०२५३) [illegible]
दुरध्वनी- (०२५३) २५७९७८२,२५७६८६०, mail- msetdcnsk@gmail.com
Web-www.mahatdc.com.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक ची दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ परिसर, अंबड, आयमा सभागृह, येथील सभागृह, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ परिसर, अंबड, नाशिक येथे सकाळी ११.०० वाजता मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त

सभेस खालील प्रमाणे सन्माननिय संचालक सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | मा.संचालक सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | मा.ना.ॲड.के.सी.पाडवी,<br>मंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. | अध्यक्ष, (पदसिध्द) |
| २. | मा.श्री.वसंत चि.पुरके | उपाध्यक्ष, (पदसिध्द) |
| ७. | मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारे | संचालक |
| ८. | मा. श्री. धनराज हरिभाऊ महाले | संचालक |
| ९. | मा. श्री. विकास दुलाजी वळवी | संचालक |
| ११. | मा. श्री. विठ्ठल देवराम देशमुख | संचालक |
| १२. | मा. श्री. केवलराम तुळशीराम काळे | संचालक |
| १३. | मा. श्री. मगन नुरा वळवी | संचालक |
| १४. | मा. श्री.अशोक भाऊराव मंगाम | संचालक |
| १५. | मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग | संचालक |
| १६. | मा. श्री. प्रकाश तुळशीराम दडमल | संचालक |
| १७. | मा. श्रीमती जयश्री नामदेव तळपे | संचालिका |
| १८. | मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी | संचालिका |
| १९. | मा. श्रीमती ताराबाई शंकर माळेकर | संचालिका |
| २५. | मा.आयुक्त,<br>आदिवासी विकास विभाग, (महाराष्ट्र राज्य), नाशिक. | संचालक, (पदसिध्द) |
| ३३. | मा. सहनिबंधक सहकारी संस्था, (महाराष्ट्र राज्य), नाशिक. | संचालक, (पदसिध्द) |
| ३४. | मा. श्री.गणेश सुकाळे | कर्मचारी प्रतिनिधी |
| ३५. | मा. श्री.अमोल धुर्वे | कर्मचारी प्रतिनिधी |
| ३६. | व्यवस्थापकीय संचालक<br>म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक. | पदसिध्द सचिव |

Scanned with CamScanner

मा. मंत्री, आदिवासी विकास तथा अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांनी सर्व संचालक व मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वागत केले.

मा. मंत्री यांनी सभेकरीता उपस्थित सदस्य यांची गणपुर्ती झाल्याने मा. व्यवस्थापकीय संचालक यांना विषयसुचीप्रमाणे सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती दिली.

**विषय क्रमांक १ : संचालक मंडळ सभा दिनांक २९.०९.२०१९ रोजीचे इतिवृत्त व इतिवृत्तातील पारित झालेल्या ठरावांवर वाचुन कायम करणे.**

महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी दिनांक २९.०९.२०१९ रोजी संपन्न झालेली संचालक मंडळ सभेची इतिवृत्त व इतिवृत्तावर केलेली कार्यवाहीचे अहवालाचे वाचन करुन दाखविले. मा.संचालक सदस्य यांनी सदर इतिवृत्त व इतिवृत्तांवर पारित केलेल्या कार्यवाहीस मान्यता दिली व खालील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला.

**ठराव क्रमाक १ :** दिनांक २९.०९.२०१९ रोजी संपन्न झालेली संचालक मंडळ सभेची इतिवृत्त व इतिवृत्तावर केलेली कार्यवाहीचे अहवालास सदर संचालक मंडळ सभा हि मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य
**अनुमोदक** :- मा. श्री. धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २ : महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक च्या संस्थेचा निवडणुक निधी व जाहिरात खर्च.**

आदिवासी विकास महामंडळाची निवडणुक २०१५-२०२० या कालावधीसाठी घेणेकामी क्रमप्राप्त होते. महामंडळाच्या संचालक मंडळाची मुदत दिनांक १७.०३.२०१५ या दिवशी संपलेली होती. त्या अनुषंगाने विविध आवश्यक असणारी माहिती व पत्रव्यवहार हा राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेबरोबर करण्यात आलेला होता. मा.सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशान्वये निवडणुक घेण्याचे तसेच जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक यांच्या निर्देशानुसार निवडणुकीकरिता १५ लक्ष निधी जमा करण्याचे आदेश दिलेले होते.

सदर निर्देशान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने १५ लक्ष रुपये जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक विभाग, नाशिक यांच्या चालु खाते क्रमांक ३७२००२१००००००३९१ यावर धनादेश क्रमांक १४३४०८ दिनांक ३०.०३.२०१५ द्वारे पेसै भरले. तत्पुर्वी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारीतथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

Scanned with CamScanner

यांना सुचना व संस्था सचिव यांनी द्यावयाच्या दाखला व मतदार यादी प्रसिध्द करावयाची सुचना दिली व तदनंतर जाहिरातीचे देयक रक्कम रुपये १,६४,०३२.०० (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष चौशष्ट हजार बत्तीस मात्र) या कार्यालयास अदा करण्याचे निर्देश देण्यात आले होते आणि सदर देयके अदा करण्यात आलेली आहेत.

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळा ची संचालक मंडळाची निवडणुक न पार पडल्यामुळे रक्कम रु.१२,६०,२२५/- (रक्कम रुपये बारा लक्ष साठ हजार दोनशे पंचविस मात्र) महामंडळाच्या खातेवर जमा करण्यात आलेले आहे आणि रक्कम रुपये २,३९,७७५.०० (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष एकोणचाळीस हजार सातशे पंच्चात्तर मात्र) इतक्या रक्कमेची खर्च झाल्याचे कळविण्यात आले आहे. तरीहि सदर महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या निवडणुक प्रक्रियेकरिता एकुण झालेला खर्च रक्कम रुपये ४,०३,८०७.०० (अक्षरी रक्कम रुपये चार लक्ष सात हजार आठशे सात रुपये मात्र) इतक्या खर्च मान्यतेस संचालक मंडळासमोर मांडण्यात आला. सदर विषयावर सांगोपांग चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक २ :** जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळा ची सन २०१५ या सालच्या अपेक्षित संचालक मंडळाची निवडणुक करिता करण्यात आलेल्या खर्च एकुण रक्कम रुपये ४,०३,८०७.०० (अक्षरी रक्कम रुपये चार लक्ष सात हजार आठशे सात रुपये मात्र) इतक्या खर्चास सदर संचालक मंडळ सभा हि मान्यता देण्यात येत असुन पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना प्रदान करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. विकास दुलाजी वळवी, संचालक सदस्य
**अनुमोदक** :- मा. श्री. विठ्ठल देवराम देशमुख, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

सादर



**विषय क्रमांक ३ : महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक च्या संस्थेचा व्यवस्थापन समितीच्या संरचनेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यां सांघिय संस्थेची, महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ चे कलम ९ (i) अन्वये दि.२२.०३.१९७२ रोजी नोंदणी करण्यात आलेली असुन कायद्यातील कलम १२ (१) नुसार सदर संस्थेचे वर्गीकरण हे सर्वसाधारण संस्था व उपवर्गीकरण इतर संस्था असे करण्यात आले आहे. जुना पोटनियम क्रमांक ४१ व ४२ अन्वये संचालक मंडळ संरचना ही खालीलप्रमाणे आहे.

| संचालक मंडळ (४१) | महामंडळाचा कारभार व व्यवस्थापन संचालक मंडळ चालवेल. संचालक मंडळ खालील प्रमाणे असेल. | |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र शासनाने नियुक्त करावयाचे (आठ) त्यापैकी तीन संचालक संख्या राज्य विधिमंडळाचे विद्यमान आदिवासी सभासद असतील... | ०८ |
| २. | संलग्न संस्थांनी निवडून द्यावयाच्या एकुण-१२ संचालकांची संख्या जिल्हावार खालील दर्शविल्याप्रमाणे असेल, मात्र निवडून द्यावयाचे संचालक हे आदिवासीच राहतील... | १२ |
| | अ) ठाणे. | ०२ |
| | ब) नासिक. | ०२ |
| | क) धुळे व जळगांव. | ०२ |
| | ड) पुणे व रायगड. | ०१ |
| | इ) अहमदनगर. | ०१ |
| | ई) अमरावती. | ०१ |
| | फ) यवतमाळ व नांदेड. | ०१ |
| | ग) नागपूर व भंडारा. | ०१ |
| | ह) चंद्रपूर व गडचिरोली. | ०१ |
| | छ) राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या आदिवासी महिला राखीव संचालिका. | ०३ |
| ३. | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., ने नियुक्त केलेला एक आदिवासी संचालक, आदिवासी संचालक उपलब्ध नसल्यास इतर आरक्षित वर्गातील एक संचालक, इतर आरक्षित वर्गातील<br>संचालक उपलब्ध नसल्यास इतर (जनरल) वर्गातील एक संचालक. | |
| ४. | राज्य सहकारी अंगिकृत, निमराज्य सहकारी अंगिकृत संस्था अगर स्थानिक संस्था यासाठी शासनाने नियुक्त करावयाचा एक संचालक. | |
| ५. | सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन. | |
| ६. | केंद्र शासनाने नियुक्त करावयाचे दोन प्रतिनिधी. | |
| ७. | अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे, नासिक, अमरावती, नागपूर. | |
| ८. | प्रमुख वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य किंवा त्यांचा प्रतिनिधी. | |
| ९. | निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य किंवा त्यांचा प्रतिनिधी. | |
| १०. | कर्मचाऱ्यांचे दोन प्रतिनिधींपैकी किमान एक मान्यताप्राप्त संघटनेचा असावा. | |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| ११. | व्यवस्थापकीय संचालक, पदसिध्द सदस्य सचिव किंवा त्यांचेकरिता व त्यांचेवतीने उप व्यवस्थापकीय संचालक. |
| ४२) अ) | पोटनियम ४१ कलम (२) प्रमाणे निवडावयाचे संचालक हे दर ५ वर्षांने निवडले जातील आणि अशारितीने निवडून आलेले संचालक पहिली सभा ज्या तारखेला घेण्यात येईल त्या तारखेपासून ५ वर्षाच्या मुदतीपर्यंत पदधारण करतील आणि नवीन समितीच्या सदस्यांची पहिली सभा भरण्याच्या निकटपूर्वीपर्यंत ते पदावर राहतील. |
| ब) | निवृत्त होणारे संचालक पुन्हा निवडणूकीसाठी पात्र राहतील. |
| क) | नियुक्त केलेले, निवडलेले अगर स्विकृत करण्यात आलेले संचालक पुढील शासनाने नियुक्ती करेपर्यंत, निवडेपर्यंत अगर स्विकृत करेपर्यंत त्या जागेवर राहतील. |

उपरोक्त पोटनियम क्रमांक ४१ व ४२ नुसार संचालक मंडळाची संरचना आहे. सदर संरचनेनुसार मागील संचालक मंडळ हे दि.०५.०३.२०१० रोजी निवडुन आले असुन पहिली संचालक मंडळ सभा ही दिनांक १८.०३.२०१० रोजी संपन्न झाली असुन सदर तारखेपासमुन दिनांक १७.०३.२०१५ रोजीच्या मुदतीपर्यंत पदधारण करतील अशी उपरोक्त पोटनियमा प्रमाणे तरतुद आहे. दिनांक १७.०३.२०१५ रोजी नंतर सद्यस्थितीतील संचालक मंडळ मुदत हि समाप्त झालेली असुन निवडणुक होणे अपेक्षित आहे.

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेकडुन निवडणुक कार्यक्रम सन २०१५ मध्ये जाहीर करण्यात आलेला होता. सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार संचालक मंडळ संरचनेस सुधारणा न केल्यामुळे निवडणुक ही घेतलेली नाही. पोटनियम दुरुस्तीचा प्रस्ताव हा वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०९.२०१६ मध्ये पुढे ठेवण्यात आलेला होता. वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक सदस्य संरचना दुरुस्ती ही जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) प्रमाणेच ठेवुन किरकोळ बदलासह उर्वरित सर्व पोटनियम हे बदलण्याकरिता वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२९.०९.२०१६ मार्फत मंजुरी देण्यात आली. दिनांक २९.०६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) जुन्याप्रमाणे ठेवुन सहकार आयुक्तांना मंजुरी करिता पाठविण्यात आले. मा.सहाकार आयुक्तांती जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) वगळता उर्वरित सर्व पोटनियमास मा.आयुक्त (सहकार) यांचेमार्फत मंजुरी देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार पुढील संचालक मंडळ निवडणुक घेणेकामी जुना पोटनियम क्रमांक ४१(२) पोटनियमास मंजुरी मिळणे आवश्यक आहे.उपनिबंधक, सहकारी संस्था (आ.वि.), महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे पत्र क्रमांक २०/आविम/निवडणुक व ९७ व्या घटना पोटनिरयम दुरुस्ती/२०२० दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या पत्रानुसार ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार महामंडळाचा उपविधी क्रमांक २० मध्ये दुरुस्ती करुन उपविधी दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव मा.सहकार आयुक्त कार्यालयास सादर करण्याचे कळविण्यात आले आहे. दिनांक २९.०६.२०१६ रोजी आदिवासी विकास विभागामार्फत महामंडळाच्या संचालकांच्या संरचनेबाबत जो शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता, तो शासन निर्णय हा दिनांक २३.०७.२०२०च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे. मा.उच्च न्यायालय, नागपुर येथे दावा क्रमांक १२९८७/२०१८ दिनांक १४.११.२०१८ रोजी दाखल करण्यात असुन मुंबई येथे वर्ग करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

९७ व्या घटनादुरुस्तीतील कलम ७३ अअअ नुसार नियमावली खालीलप्रमाणे

**७३ अअअ. समितीची रचना करणे.**

(१) उपविधींमध्ये करण्यात येईल इतक्या संख्येचा समितीत अंतर्भाव असेल ;

परंतु समितीच्या सदस्यांची **कमाल संख्या एकवीसपेक्षा अधिक असणार नाही.**

परंतु आणखी असे की, बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ याच्या तरतुदी, बँक व्यवसाय करणाऱ्या सर्व संस्थाना लागू होईल.

(२) समितीला, संस्थेची उदिष्टे व तिने हाती घेतलेली कार्ये यांच्या संबंधात, "तज्ञ संचालक" स्वीकृत करण्यात येईल.

परंतु, तज्ञ संचालकांची संख्या ही, पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, समितीच्या सदस्यांच्या कमाल संख्व्यतिरिक्त असेल आणि ती दोनपेक्षा अधिक असणार नाही.

परंतु आणखी असे की, ज्या समितीमध्ये सतरापेक्षा जास्त सदस्य नसतील अशा समितीच्या बाबतीत समिती एका कार्यलक्षी संचालकाची नेमणूक करु शकेल आणि सतरापेक्षा जास्त सदस्य असलेल्या आणि एकवीसपेक्षा जास्त सदस्य नसलेल्या समितीच्या बाबतीत, समिती नामनिर्दिष्ट करील अशा कार्यलक्षी संचालकांची संख्या दोनपेक्षा अधिक असणार नाही.

परंतु तसेच की, शासनाने भाग भांडवल असेल अशा संस्थेच्या बाबतीत शासनाने नामनिर्देशित केलेले दोनपेक्षा जास्त असणार नाहीत असे शासनाचे अधिकारी समितीचे सदस्य असतील, ते पोटकलम (१) च्या पहिल्या परंतुकान्वये नेमून देण्यात आलेल्या संख्येच्या व्यतिरिक्त असतील.

परतु तसेच की, जर समिती दोन कार्यलक्षी संचालकांची मिळून बनलेली असेल तर, अशा कार्यलक्षी संचालकांपैकी एक कार्यलक्षी संचालक हा, संबंधित संस्थेचा कर्मचारी असेल किंवा तो अशा संस्थेच्या मान्यता प्राप्त कर्मचारी संघाचा प्रतिनिधी असेल.

परंतु तसेच की, संस्थेचे कार्यलक्षी संचालक हे समितीचे सदस्यदेखील असतील आणि अशा सदस्यांना पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्या समितीच्या एकुण सदस्य संख्येची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी वगळण्यात येईल.

परंतु तसेच की, अशा तज्ञ संचालकांना तसेच तिसऱ्या परंतुकान्वये शासनाने नामनिर्देशित केलेल्या संदस्यांना संस्थेच्या कोणत्याही निवडणुकीत मत देण्याचा अधिकार असणार नाही आणि ते, समितीने पदाधिकारी म्हणुन निवडून दिले जाण्यास पात्र असणार नाही.

(३) समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांना आणि तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी, निवडणुकीच्या दिनांकापासून पाच वर्षापर्यंत असेल आणि पदाधिकाऱ्यांची मुदत समितीच्या मुदतीइतकीच असेल.

(४) समितीवरील नैमितीक रिक्त पद, ज्याच्यासंबंधात नैमितीक रिक्त पद निर्माण झाले असेल अशा क्रियशील सदस्यांचा त्याच वर्गामधून भरता येईल.

(५) (अ) जर समितीच्या सदस्यांच्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीत, निवडणुकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर समितीची रचना झाली नसेल तर, या अधिनियमात किंवा नियमात किंवा संस्थेच्या उपविधीत काहीही अंतर्भत असले तरी, निर्वाचित अधिकारी किंवा अशी निवडणुक घेणारा इतर कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी, दोन तृतीयांश किंवा

Scanned with CamScanner

त्याहून अधिक सदस्यांचा निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत त्यांची नावे त्यांच्या कायम पत्त्यांसह निबंधकाकडे अग्रेषित करील. निबंधक, त्याला कळविण्यात आलेली नावे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन पंधरा दिवसांच्या आत, अशी नावे व पत्ते सूचना फलकावर किंवा त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही ठळक जागी नोटीस लावून प्रसिद्ध करील किंवा प्रसिध्द करण्याची तजवीज करील आणि नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर संस्थेच्या समितीची रितसर रचना करण्यात आली असे समजण्यात येईल. सदस्यांची दोन-तृतीयांश इतकी संख्या ठरवितांना अपुर्णांक हिशोबात घेतला जाणार नाही.

परंतु, अशा रितीने नावे व पत्ते प्रसिध्द करण्यामुळे

(एक) उर्वरित सदस्यांची निवडणुक पूर्ण होण्यास तसेच निवडून आलेल्या सदस्यांची नावे व कायम पत्ते वरीलप्रमाणेच जसजसे उपलब्ध होतील तसतसे प्रसिध्द करण्यास अडथळा होणे किंवा
(दोन) या अधिनियमाखाली समितीच्या सदस्यांच्या पदावधीला बाधा पोहोचते असे मानले जाणार नाही

(ब) उर्वरित सदस्य निवडून आल्यानंतर त्यांची नावेही (त्यांच्या कायम पत्त्यांसह) त्यानंतर तशाच प्रकारे निबंधकाकडून प्रसिध्द करण्यात येईल.

७३ ब. संस्थेच्या समित्यांवर सदस्यांसाठी जागा राखून ठेवणे व त्यासाठी निवडणुक घेणे.
(१) या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत किंवा कोणत्याही संस्थेच्या कोणत्याही उपविधी काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यशासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल, अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या समितीवर पुढीलप्रमाणे तीन जागा राखून ठेवण्यात येतील
(क) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यांमधील सदस्यांसाठी एक
(क-१) इतर मागासवर्गातील एक सदस्य आणि
(क-२) विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य

(३) यथास्थिती, अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या किंवा इतर मागासवर्गीय किंवा विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय मधील संस्थेचा कोणताही व्यक्तीगत सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीच्या कोणताही निर्वाचित सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या सकितीचा कोणताही सछय मग तो या कलमान्वये निवडण्यात, स्वीकृत करण्यात किंवा नियुक्त करण्यात आलेला असो राखील जागेसाठी होणारी निवडणुक लढविण्यास पात्र असेल आणि समीतीच्या निवडणुकीत मत देण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीस अशा कोणत्याही राखीव जागेसाठी निवडणुकीत मत देण्याचा हक्क असेल.
(४) तीन राखीव जागांपैकी कोणत्याही जागेवर कोणत्याही व्यक्तीची निवड न झाल्यास अशी किंवा अशा राखीव जागा, पोट-कलम (३) अन्वये निवडणुक लढविण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींमधुन नामनिर्देशाद्वारे, भरण्यात येतील.

Scanned with CamScanner

**७३ क. महिलांकरिता जागा राखून ठेवणे.**

(१) हा अधिनियम, किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये, किंवा कोणत्याही संस्थेच्या उपविधींमध्ये काहीही अंतर्भंत असले तरी, प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिला सदस्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सदस्य म्हणून व्यक्तींचा अंतर्भाव असणाऱ्या प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिलांकरिता दोन जागा राखून ठेवण्यात येतील.

(२) संस्थेची कोणतीही महिला सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीची कोणतीही महिला सदस्य, मग ती निवडून आलेली, स्वीकृत केलेली किंवा नामनिर्दिष्ट केलेली असो, पोट-कलम (१) अन्वये, राखून ठेवण्यात आलेल्या जागेकरता निवडणूक लढवण्यास पात्र असेल.

(३) अशा राखून ठेवण्यात आलेल्या जागांकरिता कोणतीही महिला सदस्य किंवा, यथास्थिती कोणत्याही महिला सदस्य निवडून आलेल्या नसतील त्याबाबतीत, अशी जागा किंवा अशा जागा, पोट कलम (२) अन्वये निवडणुक लढवण्यासाठी पात्र असलेल्या महिला सदस्यामधुन स्वीकृत करुन घेऊन भरण्यात येतील.

(४) केवळ महिला सदस्य असणाऱ्या संस्थेच्या समितीला या कलमातील कोणतीहि गोष्ट लागु होणार नाही.

उपरोक्त ९७व्या घटनादुरुस्तीनुसार तरतुद आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे दिनांक १४ जानेवारी,१९७२ च्या शासन निर्णयानुसार अध्यक्ष हे मा.मुख्यमंत्री व उपाध्यक्ष मा.मंत्री, समाजकल्याण हे होते. दिनांक २१ जानेवारी, १९८५ च्या शासन निर्णयानुसार महामंडळाचे अध्यक्ष हे मा.मंत्री (आ.वि.) हे असुन मा.राज्यमंत्री (आ.वि.) हे होते. दिनांक २५ जुन, २०१९ च्या शासन निर्णयानुसार महामंडळाच्या उपाध्यक्ष हे शासन नियुक्त असतील अशी तरतुद आहे.महामंडळाचा पोटनियम क्रमांक २३ नुसार शासन नियुक्त असतील.

महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार संरचना खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १. | महिला आरक्षण | २ |
| २. | इतर मागास वर्गीय | १ |
| ३. | अनुसूचित जाती किंवा जमाती | १ |
| ४. | विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य | १ |

**चर्चेसाठी प्रस्ताव**

९७ व्या घटनादुरुस्तीनुसार २१ निर्वाचित सदस्य वगळता २ कार्यलक्षी संचालक (कर्मचारी प्रतिनिधी व व्यवस्थापकीय संचालक), २ तज्ञ संचालक (योजनांना अनुसरुन) व २ संचालक हे शासनाचे भाग भांडवल असेल अशा संस्थांचे अधिकारी (भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे प्रत्येकी एक) हे संचालक असतील.

Scanned with CamScanner

उपरोक्त नमुद घटनादुरुस्ती, शासन निर्णय व महामंडळाचे पोटनियम लक्षात घेता, सुयोग्य संरचना प्रस्तावित करावी ज्यात खालील बाबींचा उल्लेख असावा.

| | | |
|---|---|---|
| १) | पोटनियम क्रमांक २३ नुसार महामंडळाचे मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष हे शासन नियुक्त असतील. * | २ |
| २) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या महिला राखीव संचालिका. | कमीत कमी ०२ |
| ३) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या इतर मागासवर्गा मधील एक सदस्य | ०१ |
| ४) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य | ०१ |
| ५) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या अनुसूचित जाती किंवा जमाती मधील एक सदस्य | ०१ |
| ६) | कार्यलक्षी संचालकांपैकी एक कर्मचारी प्रतिनिधी व एक व्यवस्थापकीय संचालक | ०२ |
| ७) | तज्ञ संचलांपैकी एक मा.प्रधान सचिव, अन्न व नागरी पुवरठा विभाग, मंत्रालय, मुंबई आणि एक मा.मुख्याधिकारी, भारतीय जनजाती सहकारी विपणन विकास परिसंघ | ०२ |
| ८) | संचालक हे शासनाचे भाग भांडवल असेल अशा संस्थांचे अधिकारी पैकी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे प्रत्येकी एक | ०२ |

***पोटनियम क्रमांक २३ नुसार महामंडळाचे मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष हे शासन नियुक्त असतील परंतु महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ (९७ व्या घटनादुरुस्तीनुसार) जी उक्त नमुद तरतुदीनुसारच निवडणुक हि घ्यावी लागेल.**

Scanned with CamScanner

संचालक मंडळ सभेची संरचना खालीलप्रमाणे क्षेत्रनिहाय प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | क्षेत्र | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | जोडलेल्या एकुण संस्था | प्रस्तावित संचालक | प्रती संचालक मतदार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | जव्हार | ८६ | २ | ६४ |
| | ठाणे | जव्हार | ३१ | | |
| | रायगड | जव्हार | १० | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **१२७** | | |
| २ | नाशिक | नाशिक | १६५ | २ | ८२.५ |
| | | **एकुण संस्था संख्या** | **१६५** | | |
| ३ | पुणे | जुन्नर | २५ | १ | ६४ |
| | अहमदनगर | जुन्नर | ३९ | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **६४** | | |
| ४ | नंदुरबार | नंदुरबार | १४४ | २ | ७२ |
| | | **एकुण संस्था संख्या** | **१४४** | | |
| ५ | धुळे | नंदुरबार | ३९ | १ | ७९ |
| | जळगाव | नंदुरबार | ७ | | |
| | अमरावती | धारणी | ३३ | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **७९** | ० | |
| ६ | नांदेड | यवतमाळ | २४ | २ | ६४ |
| | यवतमाळ | यवतमाळ | ९१ | | |
| | वर्धा | भंडारा | २ | | |
| | नागपुर | भंडारा | ११ | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **१२८** | ० | |
| ७ | गोंदिया | भंडारा | ४१ | १ | ६७ |
| | गडचिरोली (कोरची) | गडचिरोली | ९ | | |
| | गडचिरोली (कुरखेडा) | गडचिरोली | १७ | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **६७** | ० | |
| ८ | चंद्रपुर | चंद्रपुर | ६३ | १ | ६३ |
| | | **एकुण संस्था संख्या** | **६३** | ० | |
| ९ | गडचिरोली | गडचिरोली | ९१ | २ | ४५ |
| | | **एकुण संस्था संख्या** | **९१** | ० | |
| | **एकुण** | | **९२८** | **१४** | |

उपरोक्त नुसार मा.संचालक मंडळ सदस्य संरचनेस मार्गदर्शन तथा निर्णयास्तव सविनय सादर.

Scanned with CamScanner

ठराव क्रमांक ३ : महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक च्या संस्थेचा व्यवस्थापन समितीच्या संरचनेबाबत सांगोपांग चर्चा होऊन सदर विषय हा आगामी संचालक मंडळ सभेत ठेवण्यात यावा, असे एकमताने ठरले.

सुचक :- मा. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

अनुमोदक :- मा. प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ०४ :- दिनांक ३१.०३.२०२० अखेर खरेदी, विक्री व शिल्लक साठा आढावा.**

**अ-१) एकाधिकार खरेदी योजनेचा दिनांक ३१.०३.२०२० अखेर हंगाम निहाय खरेदी विक्री शिल्लक साठा आढावा.**

एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०१३-१४ ते २०१९-२० हंगामातील खरेदी झालेल्या अन्नधान्य,कडधान्य दिनांक ३१/०३/२०२० अखेर प्रादेशिक कार्यालय निहाय एकूण ५९,५९५.२१ क्विं. रक्कम रुपये १४.८२ कोटीचा मालसाठा बी.ई.पी. प्रमाणे शिल्ल्क आहे.त्याचा तपशिल खालालप्रमाणे.

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नांव | शिल्लक माल वजन (क्विं) | मालाची किंमत रुपये कोटीत. |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ३४०४४.०७ | ८.९४ |
| २ | जव्हार | २२०३८.८५ | ३.४८ |
| ३ | नंदूरबार | ४२७.११ | ०.०९ |
| ४ | चंद्रपूर | २.०० | ०.०० |
| ५ | धारणी | १४२३.३४ | ०.५२ |
| ६ | यवतमाळ | १५६७.५० | १.७६ |
| ७ | गडचिरोली | ०.०० | ०.०० |
| ८ | उप प्रा.का.अहेरी. | ९२.३४ | ०.०१ |
| | **एकूण :-** | ५९,५९५.२१ | १४.८२ |

प्रादेशिक कार्यालय शिल्लक मालाचा तपशिल वरील प्रमाणे आहे.

दि. १९.१०.२०१३ चे शासन निर्णयानुसार एकाधिकार योजना ८ जिल्हयात २९ तालुक्यात ही योजना राबविण्यात येत होती. या योजनेत खरेदी केलेल्या मालाची शासन निर्णय दिनांक १०.०३.२०१६ नुसार शासकीय आश्रमशाळा/वसतीगृहांना प्रक्रीया करुन अन्न धान्याचा पुरवठा केला जात होता, मात्र दिनांक १५ जुन, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय आश्रमशाळा/वसतीगृहांना माल पुरवठा करणेसाठी महामंडळाने ई-निविदेत (स्पर्धेत) महामंडळाने सुध्दा भाग घेण्याचे निर्देश आहेत. ई-निविदेमध्ये महामंडळ पात्र ठरल्यास अन्न धान्य पुरवठा करणेचे आदेश देणे बाबत नमुद आहे.

महामंडळाचा मुख्य उद्देश नफा मिळवणे हा नसून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास वाजवी दाम मिळवून देणे हा आहे.त्यामुळे महामंडळ खुल्या बाजारातील स्पर्धेत (घाऊक व्यापारी) ई-निविदेत टिकू शकणार नाही.

वरील माल गेल्या सात वर्षा पासून शिल्लक असून शिल्लक मालाची बी.ई.पी. मध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून जाहिर लिलावात तसेच ई-लिलावात अपेक्षित दर प्राप्त होत नसल्याने उपरोक्त नमुद प्रमाणे मालसाठा शिल्लक आहे.

Scanned with CamScanner

कोरोना-१९ प्रार्दुभाव काळात खालीलप्रमाणे शिल्लक धानापैकी एकाधिकार धानाचे वाटप करण्यात आले तपशिल खालीलप्रमाणे

| प्रा.का.चे नांव | वाटप धाना वजन क्विटल. | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | | गहू | | तुर | | चना | | तीळ | |
| | लाभार्थी | वजन क्वि. | लाभार्थी | वजन क्वि. | लाभार्थी | वजन क्वि. | लाभार्थी | वजन क्वि. | लाभार्थी | वजन क्वि. |
| नाशिक | २२१२ | ४४२.४४ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| जव्हार | ३८०७ | ७६१.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| नंदूरबार | ० | ०.०० | २०३६ | २०३.६० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| किनवट (यवतमाळ) | ० | ०.०० | ० | ०.०० | २६३१ | ६५.७७ | २३७६७ | ४७५.३४ | ० | ०.०० |
| धारणी | ० | ०.०० | ३६०० | ३६०.०० | | ०.०० | ३६०० | १०८.०० | ३६०० | १८.०० |
| एकूण :- | ६०१९ | १२०३.४४ | ५६३६ | ५६३.६० | २६३१ | ६५.७७ | २७३६७ | ५८३.३४ | ३६०० | १८.०० |

शिल्लक राहिलेल्या साठा विल्हेवाटीसाठी केलेले उपाय बाबत तपशिल स्वतंत्र विषयाद्वारे मांडण्यात आले आहे. तरी सदर बाब अवगत करण्यांत येत आहे.

**अ-२) दिनांक ०१.०४.२०२० पासुन ते ३०.०९.२०२० या कालावधीत एकाधिकार खरेदी निरंक आहे.**

**<u>ब-१) आधारभुत किमत खरेदी योजनेचा धानाचा हंगाम निहाय भरडाईविना शिल्लक साठा आढावा.</u>**

खरेदी हंगाम २०१८-१९ खरीप व रब्बी (उन्हाळी) अशी एकूण झालेली आधारभुत किंमत योजने अंतर्गत खरेदी झालेल्या, भरडाई झालेल्या व भरडाईविना शिल्लक मालाचा आढावा खालील प्रमाणे.

**<u>हंगाम २०१८-२०१९</u>**

| अ. क्र. | जिल्हा | एकूण खरेदी | भरडाई झालेला धान | भरडाईची टक्केवारी | भरडाईविना शिल्लक धान | आलेली घट | घटीचे टक्के… |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ८४००१२.३० | ८२६७५१.५७ | ९८.४१% | ०.०० | १३३४०.७३ | [illegible] |
| २ | उप प्रा.का.अहेरी | ३४८८६७.९० | ३३३१५६.५७ | ९५.५०% | २१८४.५१ | १३५२६.८२ | [illegible] |
| ३ | गोंदिया | १३०२५०५.४१ | १२८७०५९.५५ | ९८.८१% | ०.०० | १५४४५.८६ | [illegible] |
| ४ | नागपूर | २४७१६.०२ | २४१३५.११ | ९७.६५% | ०.०० | ५८०.९१ | [illegible] |
| ५ | चंद्रपूर | ३९७७२.४१ | ३९५६६.२३ | ९९.४८% | ०.०० | २०६.१६ | [illegible] |
| ६ | ठाणे | १२१३३३.९१ | ११६३१३.७६ | ९५.८६% | ३९७५.२४ | १०४४.९१ | [illegible] |
| ७ | रायगड | ४६७३.५० | ४५६७.१६ | ९७.७२% | १०.७२ | ९५.६२ | [illegible] |
| ८ | पालघर | १५४०८८.०८ | १५१८१८.६५ | ९८.५३% | ३६०.०६ | १९०९.३७ | [illegible] |
| ९ | नंदूरबार | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | [illegible] |
| १० | नाशिक | २६२२७.७५ | २१३१५.९४ | ८१.२८% | ४८४६.९५ | ६४.८६ | [illegible] |
| | एकूण :- | २८६२२७७.२८ | २८०४६८४.५४ | ९७.९९% | ११३७७.४८ | ४६२१५.२४ | [illegible] |

भरडाईविना शिल्लक दिसत असलेल्या वजन ११,३७७.४८ क्विं. धान हा शासन निर्णयानुसार Online विक्री करायची प्रक्रिया प्रादेशिक कार्यालय स्तरावर सुरु आहे. वरील शिल्लक मालापैकी प्रा.का. नाशिक अतंर्गत. बाऱ्हे गोदामात व गोदामा बाहेरील उघडयावर खरेदी करुन साठविलेला वजन १४४०.१७ क्विं. किंमत रक्कम रु.४३९६६१५/- धानाची अफरातफर केल्याने श्री. विवेक

Scanned with CamScanner

मधुकर नावरकर, गोदामपाल यांना दिनांक २७/११/२०१९ रोजी निलंबित करणेत आले आहे. त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच त्यांनी अफरातफर केल्याबाबत कबुली दिली असनु त्यांचेकडुन रक्कम रु.७५०००/- वसुली केली असुन उर्वरीत रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

तसेच अहेरी व नाशिक कार्यालयातील शिल्ल्क धानाचा ऑनलाईन विक्री करणेत आली होती परंतू अत्यल्प दर प्राप्त झाल्याने प्राप्त दरास मंजूरी मिळणेसाठी अन्न, नागरी पुरवठा विभागास प्रस्ताव सादर केला असता त्यांनी शिल्लक मालाची जबाबदारी महामंडळाची असल्याने त्याचा निर्णय अभिकर्ता संस्थेनेच घेणे बाबत नाशिक- ३०११ दिनांक २६/०८/२०२० व अहेरी २४८० दि. २० जुलै, २०२० रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

**ब-२) आधारभुत किंमत खरेदी योजना धानाचा हंगाम निहाय भरडाईविना शिल्लक साठा आढावा. हंगाम २०१९-२०२० दिनांक ३१.०७.२०२० अखेर आढावा.**

खरेदी हंगाम २०१९-२० खरीप व रब्बी (उन्हाळी) अशी एकूण झालेली आधारभुत किंमत योजने अंतर्गत खरेदी झालेल्या, भरडाई झालेल्या व भरडाईविना शिल्लक मालाचा आढावा खालील प्रमाणे.

| अ.क्र. | जिल्हा | एकूण खरेदी | भरडाई झालेला धान दि. ३१.११.२०२० पर्यत | भरडाईची टक्केवारी | भरडाईविना शिल्लक धान | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | १४२०५२२.९४ | १२९६५७१.५० | ९१.१०% | १२३९५१.४४ | हंगाम २०१९-२० चे धानभरडाईचे अंतिम अहवाल अद्याप अप्राप्त आहे.त्यामुळे निश्चित आलेली घट दर्शविता येत नाही. |
| २ | उप प्रा.का.अहेरी | ७९३३३८.१० | ७२७८९१.३३ | ९१.७५% | ६५४४६.७७ | |
| ३ | गोंदिया | १८९८८२९.०६ | १८६९१३८.८५ | ९८.४४% | २९६९०.२१ | |
| ४ | नागपूर | ४९९६३.४२ | ४६१९३.७६ | ९२.४६% | ३७६९.६६ | |
| ५ | चंद्रपूर | २७९९५५.०८ | २७७१४३.८९ | ९९.००% | २८११.१९ | |
| ६ | ठाणे | २११३००.२८ | २०७६१०.८६ | ९८.२५% | ३६८९.४२ | |
| ७ | रायगड | ४५०७.८० | ४४३२.८० | ९८.३४% | ७५.०० | |
| ८ | पालघर | १९२३९९.८९ | १९०४९५.२९ | ९९.०१% | १९०४.६० | |
| ९ | नंदूरबार | ०.०० | ०.०० | ०.००% | ०.०० | |
| १० | नाशिक | ६७६३६.८२ | ६१८६८.०६ | ९१.४७% | ५७६८.७६ | |
| | **एकूण :-** | **४९१८४५३.४०** | **४६८१३४६.३४** | **९५.१८%** | **२३७१०७.०५** | |

सदर हंगामात दि.०१.१०.२०१९ ते ३०.०७.२०२० अखेर धान खरेदी झालेली असुन, दि. ३०.११.२०२० पर्यंत धानाची भरडाई झालेली आहे.

**ब-३) भरडधान्य खरेदी आढावा हंगाम २०१८-१९.**

आधारभुत किंम खरेदी योजना खरीप पणन हंगाम २०१८-१९ मध्ये खालीलप्रमाणे भरडधान्य खरेदी झालेले असून, सदर भरडधान्य जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे अधिनस्त गोदामात संपूर्ण हस्तांतरीत करण्यात आल.

| अ.क्र | जिल्हा | एकूण भरडधान्य (खरीप ) खरेदी | | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | ज्वारी | मका | | |
| १. | अमरावती | ५४९८.१७ | ३९२९.८८ | ९४२८.०५ | ज्वारी १२७६८.३१ क्वि. मका ९७८९.०६ क्वि. असे एकूण २२५५७.३७ क्वि. भरडधान्य शासकीय गोदामास जमा करण्यात आले आहे. |
| २. | नाशिक | ०.०० | ३४५५.०० | ३४५५.०० | |
| ३. | धुळे | ०.०० | १८१८.५० | १८१८.५० | |
| ४. | नंदूरबार | ७२७०.१४ | ५८५.६८ | ७८५५.८२ | |
| एकूण :- | | १२७६८.३१ | ९७८९.०६ | २२५५७.३७ | |

Scanned with CamScanner

**ब-४) भरडधान्य खरेदी आढावा हंगाम २०१९-२०.**

आधारभुत किंमत खरेदी योजना खरीप व रब्बी पणन हंगाम २०१९-२० मध्ये दिनांक ३१.०७.२०२० अखेर खालीलप्रमाणे भरडधान्य खरेदी झालेले असून, सदर भरडधान्य जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे अधिनस्त गोदामात संपूर्ण हस्तांतरीत करण्यात आला आहे.

| अ.क्र | जिल्हा | एकूण भरडधान्य (खरीप + रब्बी) खरेदी | | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | ज्वारी | मका | | |
| १. | गडचिरोल | ०.०० | ३४३००.३६ | ३४३००.३६ | ज्वारी वजन क्विं. १२७६४.७५ व मका वजन क्विं. १६७३८७.४४ असे एकूण १८१३१०.२० क्विं. भरडधान्य शासकीय गोदामास जमा करण्यात आले आहे. |
| २. | अहेरी | ०.०० | १९२३८.१० | १९२३८.१० | |
| ३. | गोंदिया | ०.०० | १७३०१.५० | १७३०१.५० | |
| ४. | चंद्रपूर | ०.०० | २०४४.५६ | २०४४.५६ | |
| ५. | अमरावती | १००६.६० | १५३३२.७६ | १६३३९.३६ | |
| ६. | नांदेड | ११२९८.७५ | ५००४८.५७ | ६१३४७.३२ | |
| ७. | नाशिक | ०.०० | ११३४२.०० | ११३४२.०० | |
| ८. | नंदूरबार | १४६६.०० | १४५१८.०० | १५९८४.०० | |
| ९. | जळगांव | ०.०० | ११३०.५० | ११३०.५० | |
| १०. | धुळे | ०.०० | २२८२.५० | २२८२.५० | |
| **एकूण :** | | **१२७६४.७५** | **१६७३८७.४४** | **१८१३१०.२०** | |

सदरच्या खरेदी केलेल्या धानाच्या नोंदी NeML चे पोर्टलवर नोंदी घेतल्या आहेत. परंतु खरेदी मुदत तसेच केंद्र शासनाने ठरवुन दिलेले मका खरेदीचे उद्दीष्ट संपल्याने वजन २३०० क्विं. खरेदी केलेल्या मक्याचे NeML पोर्टवर लॉट एन्ट्री करता आली नाही. सदरचा मका जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे अधिनस्त गोदामात खरेदी केला असल्याने त्यांचे ताब्यात आहे. लॉट एन्ट्री न झालेल्या मक्याबाबत दिनांक ९/९/२०२० रोजी मंत्रालय, मुंबई येथे मा. मंत्री, महोदय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत उपस्थित केला असता सहसचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी सदरचा मका शेतकऱ्यांना परत करणेबाबत सुचित केले. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्र.आविम/विप/आखयो/भ.ख./तक्रार/३२७५/२० दिनांक २१/९/२०२० नुसार शेतऱ्यांना मका परत करणेबाबत प्रादेशिक कार्यालयांना निर्देश दिले आहेत.

अशा मालाचे पेमेंट करण्यासाठी शासकडून निधी मिळत नाही, त्यामुळे खरेदी केलेला परंतु लॉट एन्ट्री न झालेला मका शेतकऱ्यांला परत करणेबाबत प्रादेशिक व्यवस्थापक यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे. यवतमाळ अंतर्गत ६००.०० क्विं. मका शेकऱ्यांना परत केला असून १७००.०० क्विं. मका जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे अधिनस्त गोदामात पडून आहे.

एकाधिकार योजने अंतर्गत खरेदी झालेला माल हा शिल्लक असल्याने मा. व्यवथापकीय संचालक यांनी सभेपुढे वाचन करुन दाखविले, तसेच शिल्लक असलेला माल हा २०१३-१४ ते २०१९-२० या कालावधीचा पडून आहे. जास्त कालावधी झाल्यामुळे BEP वाढत आहे. ई-टेंडर मध्ये कमी दर येत असून, कमी आलेले दर व खरेदी दर यातील तफावत पाहता येणारे दर हे कमी असल्याने महामंडळास तोटा येत आहे. तोटा पोटी येणारा खर्च याबाबत शासनास प्रस्ताव पाठविणे उचित राहिल असे मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी सभेस सांगितले.

Scanned with CamScanner

२३ मार्च,२०२० पासून देशात कोरोना प्रादुर्भाव वाढत असल्याने आदिवासी बांधवांची उपासमार होवू नये म्हणून शासनाचे मार्गदर्शक सुचनाद्वारे शिल्लक मालावर प्रक्रिया करुन आदिवासी बांधवाना वाटप करण्यात आले आहे.

सदर शिल्लक माल प्रयोग शाळेत तपासणी करुन खाण्यास योग्य आहे किंवा नाही याची शाहानिशा करुन आदिवासी बांधवाना वाटप करण्यात आले आहे.

मा. मंत्री महोदयांनी सुचित केले कि, एकाधिकार खरेदी योजनेतील शिल्लक मालाबाबत कमिटी स्थापन करुन मालाची विल्हेवाट लावावी व येणाऱ्या तोटयाची प्रतिपूर्ती बाबत शासनास प्रस्ताव सादर करावेत जेणेकरुन महामंडळास तोटा होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

तसेच आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत  शिल्लक माल त्वरीत उचल करणेबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी  यांचेशी संपर्क साधुन माल शिल्लक राहणार नाही असे पहावे असे मा. मंत्री महोदयांनी सुचति केले.

वरील प्रमाणे शिल्लक माला विषयी साधक बाधक चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ०४ :-** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यांत येतो की, सध्याच्या एकाधिकार खरेदी योजनेच्या खाण्यास अयोग्य असलेला शिल्लक माल ई-टेंन्डरद्वारे विक्री करावी. शासनाकडून मागिल ई-टेंन्डरद्वारे मिळणाऱ्या धान्याच्या रकमेची रक्कम शासनाकडून मागवावी व महामंडळाचे नुकसान टाळावे.

तसेच आधारभुत योजनेत खरेदी माल वेळीच उचल होईल याची दक्षता संबधित प्रादेशिक व्यवस्थापक यांनी घ्यावी, याबाबत जिल्हापुरवठा अधिकारी यांना अवगत करुन दयावे जेणे करुन महामंडळाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**सुचक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य
**अनुमोदक** :- मा. श्री.अशोक भाऊराम मंगाम, संचालक सदस्य.

**ठराव सर्वोनुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०५: पणन हंगाम २०१९-२० व  हंगाम २०२०-२१ मध्ये शेतकऱ्यांनी धानासोबत दिलेल्या व देणाऱ्या बारदानाचे दर निश्चित करणेबाबत.**

पणन हंगाम २०१९-२० मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेतंर्गत धान खरेदी करतांना शेतकऱ्यांनी धानासोबत आणलेला व वापरण्यास योग्य असलेला बारदाना प्रादेशिक कार्यालय, नाशिक,जव्हार, भंडारा, गडचिरोली, चंद्रपुर व उप प्रादेशिक कार्यालय,अहेरी यांनी धानासोबत घेतलेला आहे. सदर बारदानाचे राज्य शासनाकडुन झालेल्या पत्रव्यवहाराप्रमाणे रक्कम प्रति नग रु.६.३३  प्रमाणे मिळणार आहे उर्वरित रक्कम ही महामंडळाला एकाधिकार खरेदी योजनेतुन दयावी लागते. त्यासाठी शेतकऱ्यांकडुन घेतलेल्या बारदानाचे प्रति नग दर निश्चित करणे आवश्यक आहे.

हंगाम २०१७-१८ मध्ये शेतकऱ्यांकडील बारदाना प्रति नग रु.१५/-प्रमाणे खरेदी करण्यात आलेला आहे. तसेच हंगाम २०१८-१९ मध्ये प्रति नग रु.२०/- प्रमाणे बारदाना २५,४५,९३५ नग खरेदी करण्यात आलेला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी धानासोबत दिलेल्या बारदानाची रक्कम रु.५,०९,१८,७००/- अदा करणेसाठी प्रादेशिक कार्यालयांना निधी वर्ग करण्यात आलेला आहे.

Scanned with CamScanner

हंगाम २०१९-२० मध्ये शासनाकडुन धान खरेदी करीता प्रादेशिक कार्यालयांना नविन SBT ५० कि.ग्रॅ. क्षमतेचा बारदाना ६०,५६,००० पुरवठा झालेला आहे. प्रादेशिक कार्यालयाकडुन अहवाल प्राप्त नसल्याने बारदाना नग कमी/जास्त होण्याची शक्यता आहे. तसेच बारदाना पुरवठेदार मे. श्री बालाजी कार्पोरेशन, गोंदिया यांचेकडुन टेंन्डर प्रक्रियाव्दारे एकदा वापरलेला ५० कि.ग्रॅ. क्षमतेचा बारदाना ४०,०९,७४४ नग खरेदी करण्यात आलेला आहे.

हंगाम २०१९-२० मध्ये दिनांक ३१.०७.२०२० अखेर खरीप व रब्बी हंगामामध्ये धान खरेदी ४९१७६३९.०१ क्विंटल झाली असुन त्या शिवाय भरडधान्य खरेदी १८०१५२.१९ क्विंटल झाली आहे.

वरील धान खरेदी करीता २.५ नग बारदाना प्रति क्विं. धानाकरीता १,२५,३१,९३८ नग बारदाना लागलेला आहे. तसेच भरडधान्य करीता प्रति क्विं. बारदाना २ नग नुसार ३,६०,३०५ नग बारदाना लागलेला आहे. असा एकुण १,२८,९२,२४३ नग बारदाना लागलेला आहे.

वरील प्रमाणे धान/भरडधान्य खरेदीसाठी दिनांक ३१.०७.२०२० पर्यंत (हंगाम २०१९-२०) मध्ये नविन एस.बी.टी.५० कि.ग्रॅम क्षमतेचा ५५,२२,०८६ (शासन निर्णयानुसार ५०% नविन व ५०% जुना) तसेच ई-निविदा राबविण्यात येवुन मे.श्री बालाजी कार्पोरेशन,गोंदिया यांनी पुरवठा केलेला एकदा वापरलेला ४०,०९,७४४ बारदानाचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच धानाची आवक जास्त प्रमाणात असल्याने व कोवीड-१९ विषाणुमुळे लॉकडाऊन असल्याने एकदा वापरलेला व नविन बारदाना वेळेवर न आल्याने धान खरेदीसाठी बारदानाची आवश्यकता नुसार शेतकऱ्यांनी धानासोबत आणलेला वापरण्यास योग्य ३०,००,१०८ नग बारदाना दिनांक ३१.०७.२०२० अखेर धान/भरडधान्य खरेदी करीता घेण्यात आलेला आहे. सदर नमुद केलेल्या बारदानाची आकडेवारी प्रादेशिक कार्यालयांकडुन अहवाल (अंतीम) प्राप्त न झाल्याने कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शासनाकडुन रब्बी धान खरेदीची वाढीव मुदत दि.३१.०७.२०२० पर्यंत देण्यात आली होती. त्यामुळे या कालावधीत धानद खरेदी करीता आवश्यकतेनुसार प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली, भंडारा, चंद्रपुर व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी अंतर्गत झालेल्या खरेदीकरीता शेतकऱ्यांकडुन बारदाना घेण्यात आलेला आहे.

या खरीप हंगाम २०१९-२० व रब्बी हंगाम २०२०-२१ मध्ये शेतकऱ्यांकडुन घेण्यात आलेल्या बारदान्यास (BOD ने ठरविलेल्या दरानुसार) मंजुरी मिळण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. १८८१ दि.१९ जुन, २०२० ला शासनाचे मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासनाकडुन दिनांक २७ ऑक्टोबर,२०२० च्या पत्रांन्वये मंजुरी मिळालेली आहे. परंतु केंद्र शासनाच्या दि.१३ डिसेंबर,२०१८ व दि.१९ मे,२०२० रोजीच्या बारदाना खरेदी संदर्भात असलेल्या निर्देशाचे पालन करावे असेकळविले आहे. केंद्र शासनाच्या दि.१३ डिसेंबर,२०१८ च्या पत्रानुसार प्रति नग रु. ६.३३/- शासनाकडुन प्रतिपुर्ती केली जाणार आहे.

हंगाम २०१८-१९ मध्ये शेतकऱ्यांकडुन घेतलेल्या बारदानाचे एक नग बारदान्यासाठी शासनाकडुन प्राप्त होणारी रक्कम व येणारा तोटयाचा तपशिल खालील प्रमाणे.

Scanned with CamScanner

| बारदाना नग संख्या | रु.२०/- प्र.नग प्रमाणे किंमत रु. | शासनाकडुन रु.७.३२ प्र.नग प्रमाणे होणारी प्रतिपुर्ती रक्कम | मिलरकडुन रु.१० प्र.नग प्रमाणे प्राप्त होणारी रक्कम | एकुण होणारी प्रतिपुर्ती रक्कम रु. (३+४) | येणारा तोटा प्रति नग रुपये (२-५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २० | ६.३३ | १० | १६.३३ | ३.६७ |

प्रति नग रुपय ३.६७ तोटा महामंडळाला सोसावा लागणार आहे. म्हणजेच हंगाम २०१८-१९ मध्ये २५,४५,९३५ नग बारदाना शेतकऱ्यांकडुन खरेदी केला आहे. प्रति नग ३.६७ प्र.नग प्रमाणे रक्कम रुपये ९३,४३,५८१.४५/- इतक्या रकमेचा तोटा महामंडळास सोसावा लागेल. तसेच याप्रमाणे हंगाम २०१९-२० मध्ये देखील तोटा अपेक्षित आहे. करीता हंगाम २०२०-२१ मागील हंगामाप्रमाणे तोटा होऊ नये यासाठी शेतकऱ्यांकडुन कमी दराने बारदाना खरेदी करणे अथवा मिलर्सकडुन जादाची रक्कम घेणे आवश्यक वाटते.

एकदा वापरलेला बारदाना घेण्यासाठी या कार्यालयाने आतापर्यंत दरवर्षी निविदा काढली आहे. अजुन एकदाही अन्न व नागरी पुरवठा विभागाकडुन या बाबत प्रतिपुर्ती झालेली नाही. जर अशी प्रतिपुर्ती होत नसेल तर त्याचा संपुर्ण भार TDC वर पडतो. आता एकदा वापरलेला बारदानाचा निविदा धारकांकडुन प्राप्त झालेला भाव प्रति नग रु.२६.७२ ते रु.३४.२५ पर्यंत प्राप्त झ ाला आहे, व शेतकऱ्याचा बारदाना वर्ष २०१८-१९ मध्ये संचालक मंडळाने ठरवलेल्या प्रमाणे प्रति नग रु.२०/- आहे.

पणन हंगाम २०१९-२० व हंगाम २०२०-२१ मध्ये शेतकऱ्यांनी धानासोबत दिलेल्या व देणाऱ्या बारदानाचे दर निश्चित करणेबाबत साधक बाधक चर्चा होवून सन २०१८-१९ व २०१९-२० या कालावधीत महामंडळास ९३,४३,५८१.४५/- इतक्या रकमेचा तोटा महामंडळास सोसावा लागेल. तसेच याप्रमाणे हंगाम २०१९-२० मध्ये देखील तोटा अपेक्षित आहे. करीता हंगाम २०२०-२१ मागील हंगामाप्रमाणे तोटा अपेक्षित आहे असे होऊ नये यासाठी शेतकऱ्यांकडुन खालीलतपशिला प्रमाणे दर निश्चिती बाबत मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी सुचित केले.

हंगाम २०१८-१९ मध्ये शेतकऱ्यांकडुन घेतलेल्या बारदानाचे एक नग बारदान्यासाठी शासनाकडुन प्राप्त होणारी रक्कम व येणारा तोटयाचा तपशिल खालील प्रमाणे.

| बारदाना नग संख्या | रु.२०/- प्र.नग प्रमाणे किंमत रु. | शासनाकडुन रु.७.३२ प्र.नग प्रमाणे होणारी प्रतिपुर्ती रक्कम | मिलरकडुन रु.१० प्र.नग प्रमाणे प्राप्त होणारी रक्कम | एकुण होणारी प्रतिपुर्ती रक्कम रु. (३+४) | येणारा तोटा प्रति नग रुपये (२-५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २० | ६.३३ | ८ | १६.३३ | ३.६७ |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मिलर्सकडून ८/- प्रमाणे बारदानाची रक्कम वसुल करावी व येणाऱ्या तोटयाची रक्कम शासनाकडून मागणी करावी. तसेच अन्न, नागरी पुरवठा व संरक्षण विभाग यांचेशी याबाबत चर्चा करुन योग्य निर्णय घ्यावा. तसेच मा. महाव्यवस्थापक (वित्त) व लेखापाल-२ यांनी सभेच्या निर्देशनास आणून दिले की, सन २०१८-१९, २०१९-२० तोटयाचे प्रतिपूर्ती

Scanned with CamScanner

पोटी शासनाकडून कोणतीही रक्कम प्राप्त झालेली नाही. त्यामुळे महामंडळास नुकसान सहन करावे लागत आहे.

तसेच शेतकऱ्यांचा बारदाना वर्ष २०१८-१९ मध्ये संचालक मंडळाने ठरविल्याप्रमाणे प्रतिनग रुपये २०/- मंजूर देण्यांत येत आहे.

वरील प्रमाणे साधक बाधक चर्चा होवू खालील प्रमाणे ठराव पारित करणेत येत आहे

**ठराव क्रमांक ०५** : सर्वानुमते ठराव मंजूर करण्यांत येतो की, हंगाम २०१९-२० व २०२०-२१ मध्ये शेतकऱ्यांनी धानासोबत दिलेल्या व हंगाम २०२०-२१ मध्ये एकदा वापरलेला बारदानाची कमतरता भासल्यास धान खरेदीस अडचण येऊ नये म्हणून धानासोबत शेतकऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या बारदानासाठी प्रतिनग दर रु. २०/- प्रमाणे अदा करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक** :- मा. श्री.सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०६ :- हंगाम २०१९-२० आधारभुत किंमत खरेदी योजनेकरीता धान खरेदीसाठी ई-निविदाव्दारे खरेदी केलेला एकदा वापरलेला बारदाना ५० कि.ग्रॅम क्षमतेचा खरेदी प्रक्रियेस मंजुरी मिळणेबाबत.**

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०१९-२० मध्ये शासन निर्णयानुसार धान खरेदी करण्यात करीता एकदा वापरलेला बारदाना बारदाना ई-निविदेव्दारे खरेदी करण्यात आलेला आहे.

**एकदा वापरलेला बारदाना खरेदी :-**

हंगाम २०१९-२० मध्ये धान साठवणुकीसाठी एकदा वापरलेला ५० Kg क्षमतेचा बारदाना प्रादेशिक कार्यालय;निहाय खरेदी करणे करीता दिनांक १४.०९.२०१९ रोजी लोकमत राज्यस्तरीय आवृत्ती मध्ये निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात येवुन एकदा वापरलेला ५० कि.ग्रॅ.क्षमतेचा बारदाना ४७००००० नग त्यात ५०%कमी/जास्त खरेदी करीता मुख्य कार्यालय स्तरावर ई-निविदा राबवुन जिल्हा निहाय दर मागवुन संपुर्ण कार्यक्षेत्रातील जिल्हयातील प्रादेशिक कार्यालयांचे कार्यक्षेत्रातील सर्व खरेदी केंद्रावर प्रत्यक्ष पोहच करुन देणेकरीता जिल्हानिहाय एकदा वापरलेला बारदानाचे प्रति नग दर वाटाघाटी अंती खालील प्रमाणे पुरवठा करणार असल्याचे बारदाना पुरवठेदार मे.श्री बालाजी कार्पोरेशन,गोंदिया यांनी लेखी पत्र सादर केले.

| अ.नं. | जिल्हा | वाटाघाटी अंती मान्य केलेले प्रति नग दर | अक्षरी रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | नाशिक,पालघर,रायगड,व ठाणे | २२.४५ | रु.बावीस पैसे पंचेचाळीस मात्र |
| २ | अहमदनगर,पुणे,जळगांव,नंदुरबार,धुळे, यवतमाळ व नांदेड | १९.०० | रु.एकोणावीस मात्र |
| ३ | चंद्रपुर व गडचिरोली | २२.३५ | रु.बावीस पैसे पस्तीस मात्र |
| ४ | गोंदिया | २०.८६ | रु.वीस पैसे सहाऐंशी मात्र |
| ५ | नागपुर | २१.३५ | रु.एकवीस पैसे पस्तीस मात्र |
| ६ | अमरावती | १५.२५ | रु.पंधरा पैसे पंचवीस मात्र |

Scanned with CamScanner

वरील एकदा वापरलेला बारदाना खरेदीसाठी दिनांक २९.०९.२०१९ रोजीच्या मा.संचालक सभेत ठराव क्र.३७ अन्वये सुध्दा मंजुरी घेण्यात आले आहे. वरील प्रमाणे प्राप्त दर मंजुरीसाठी मा.मंत्री महोदय,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिनांक ०१.११.२०१९ रोजी टिपणी सादर करण्यात येवुन मंजुरी घेण्यात आली. त्यानुसार मे.श्री बालाजी कार्पोरेशन, गोंदिया यांच्याकडुन प्रादेशिक कार्यालय, निहाय खालील प्रमाणे एकदा वापरलेला बारदाना खरेदी करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालय | जिल्हा | बारदाना पुरवठा नग | दर प्रति नग दर रु. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | नाशिक | ८००२९ | २२.४५ | १७,९६,६५१.०५ |
| २ | जव्हार | पालघर,ठाणे,रायगड | ३,१५,४५० | २२.४५ | ७०,८१,८५२.५० |
| ३ | चंद्रपुर | चंद्रपुर | २,७७,५५४ | २२.३५ | ६२,०३,३३१.०० |
| ४ | भंडारा | गोंदिया | १३,२३,८८१ | २०.८६ | २,७६,१६,१५७.६६ |
| | | नागपुर | ९०,००० | २१.३५ | १९,२१,५००.०० |
| ५ | गडचिरोली | गडचिरोली | १२,६४,६०० | २२.३५ | २,८२,६३,८१०.०० |
| ६ | अहेरी | गडचिरोली | ६,५८,२३० | २२.३५ | १,४७,११,४४०.५० |
| **एकुणांत :-** | | | **४०,०९,७४४** | | **८,७५,९४,७४२.७१** |

मागील पानावरील तक्त्यात दर्शविलेला एकदा वापरलेला ४०,०९,७४४ नग बारदाना प्रादेशिक कार्यालय, निहाय पुरवठा झालेला आहे. मा.अध्यक्ष यांचेकडुन दिनांक २६.०८.२०२० व दिनांक १३.१०.२०२० च्या रोजी मंजुर टिपणी नुसार एकाधिकार खरेदी योजनेतुन रक्कम रुपये ८,७५,९४,७४४/- घेण्यात येवुन खालील प्रमाणे देयके अदा करण्यात आलेली आहेत.

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालय | जिल्हा | बारदाना पुरवठा नग | दर प्रति नग दर रु. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | नाशिक | ६००२९ | २२.४५ | १३४७६५१.०० |
| २ | जव्हार | पालघर,ठाणे,रायगड | ३१५४५० | २२.४५ | ७०८१८५३.०० |
| ३ | चंद्रपुर | चंद्रपुर | २४४५७७ | २२.३५ | ५४६६२९६.०० |
| ४ | भंडारा | गोंदिया | ९०३१३१ | २०.८६ | १८८३९३१३.०० |
| | | नागपुर | ९०००० | २१.३५ | १९२१५००.०० |
| ५ | गडचिरोली | गडचिरोली | ९९९६५० | २२.३५ | २२३४२१७८.०० |
| ६ | अहेरी | गडचिरोली | ६५६२३० | २२.३५ | १४६६६७४०.०० |
| **एकुणांत :-** | | | **३२६९०६७** | | **७,१६,६५,५३१.००** |

वरील प्रमाणे ३२,६९,०६७ नग बारदानाचे रक्कम रुपये ७,१६,६५,५३१.०० बारदाना पुरवठेदार मे. श्री बालाजी कार्पोरेशन, गोंदिया रक्कम अदा करण्यात आले आहेत. उर्वरीत ७४०६७७ नग बारदानाचे रक्कम रुपये १,५९,२९,२१२/- अदा करणे बाकी आहे. प्रादेशिक कार्यालय, नाशिक, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांना पुरवठा केलेल्या बारदानाच्या पोहोच पावत्या मध्ये तृटी असल्याने पत्र देण्यात आले असुन सदर असलेल्या तृटी पुरवठा झाल्यानंतर बारदाना पुरवठेदारास रक्कम अदा करण्यात येईल.

एकुण पुरवठा केलेल्या ४०,०९,७४४ बारदानापैकी २१,८०,६११ नग बारदानाच्या पोहोच पावतीसह रुपये ४,७५,२५,२३५.६६ चे बारदाना पुरवठयाचे देयके सदर निधी मागणीकरीता

Scanned with CamScanner

वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी व ग्राहक संरक्षण विभाग,मुंबई यांचेकडे बारदाना च्या देयकासह निधी मागणी प्रस्तास सादर करण्यात आलेला आहे निधी प्राप्त झालेला नाही. उर्वरीत बारदाना १८,२९,१३३ नगाचे पोहोच पावतीसह रक्कम मागणी परिपुर्ण प्रस्ताव वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचेकडे सादर करण्यात येवुन एकदा वापरलेल्या बारदानाची रक्कम मागणी करण्यात येईल.

करीता एकदा वापरलेला ५० कि.ग्रॅम. क्षमतेचा ४०,०९,४७७ नग बारदानाच्या जिल्हा निहाय प्राप्त दरास व बारदाना खरेदी रक्कम रु ८,७५,६५,५३१.०० रकमेस कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक ०६ :-** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो की, वरील प्रमाणे खरेदी करण्यात आलेल्या बारदानाच्या रक्कमेस व जिल्हानिहाय आलेल्या प्रतिनग दरास मंजूरी देण्यात येत आहे. सदर बारदाना रकमेची मागणी करणेसाठी मा. वित्तीय सल्लागार व उपपसचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**सुचक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री.अशोक भाऊराम मंगाम, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०७ : हंगाम २०१९-२० करीता खरेदी करण्यात आलेल्या ताडपत्र्यांच्या खरेदीस कार्योत्तर मंजुरी बाबत...**

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरीप पणन हंगाम २०१९-२० मध्ये दिनांक ३१.०७.२०२० अखेर खरीप व रब्बी धान क्विं ४९१७६३९.०५ व भरडधान्य क्विं.१८०१५२.१९ सदर हंगामात एका हंगामात होणाऱ्या खरेदी पेक्षा तिनपट धानाची खरेदी झालेली आहे. धान साठवणुकीकरीता महामंडळाकडे पुरेसे गोदामे उपलब्ध नसल्यामुळे ८०% धान उघडयावर साठवणुक करावा लागतो. धानाची सुरक्षितेची जबाबदारी महामंडळाची असल्यामुळे उघडयावर साठवणुक करण्यात आलेल्या धान अवकाळी पाऊस, ऊन, वारा, गुरे व ढोर इत्यादीपासुन सुरक्षितेकरीता ताडपत्र्यांची आवश्यकता भासते.

GeM पोर्टलवर ताडपत्री खरेदीस लागणारा वेळ लक्षात घेता अवकाळी पाऊसामुळे धानाचे नुकसान टाळणे करीता तातडीची बाब म्हणुन प्रादेशिक कार्यालय, नाशिक, जव्हार, यवतमाळ, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली व उप प्रादेशिक कार्यालय,अहेरी यांना प्रत्येकी रक्कम रु.५०,०००/- च्या मर्यादेत ताडपत्री खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार खालील प्रमाणे प्रादेशिक कार्यालयांनी ताडपत्री (प्लॅस्टिक) ची खरेदी केलेली आहे.

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालय | GSM | ताडपत्री साईज | खरेदी ताडपत्री संख्या | एक ताडपत्रीची किंमत G.S.T.सह. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा | २५० | ३०X३० | १० | ४९९१.४० | ४९९१४.०० |
| २ | चंद्रपुर | २५० | ३०X३० | १० | ४९९१.४० | ४९९१४.०० |
| ३ | गडचिरोली | ९० | ४०X३० | १० | ६२५४.०० | ६२५४०.०० |
| ४ | उप प्रा.का.अहेरी | २५० | ३०X३० | १० | ४९९१.४० | ४९९१४.०० |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| एकुणांत :- | ४० | २१२२८.२० | २१२२८२.०० |

प्रादेशिक कार्यालय, निहाय प्लॉस्टीक ताडपत्री मागणी नोंदविण्यात आली होती. त्यानुसार ८६५ नग प्लॉस्टिक ताडपत्री खरेदी त्यात २५% कमी/जास्त करुन दिनांक २०.०२.२०२० रोजी GeM पोर्टलवर दुसऱ्यादा ई-निविदा Bid Number GEM/२०२०/B/५५९४७४ प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदर निविदेतआठ निविदाधारकांनी भाग घेतला सदर निविदाच्या अटी-शतीनुसार व त्यानी दिलेल्या दरानुसार मे.लॅमिफॅब्स ॲण्ड पेपर्स प्रा.लि.एम.आय.डी.सी. चिखलठाणा जि. औरंगाबाद हे १,०२,५५६ स्क्वे.मि. करीता रु.६५,६३,५८४/- इतके दर प्राप्त झाले या दरांची तुलना केली असता रु.६४.०० प्रतिस स्क्वे. मि. इतका दर प्राप्त झाला.

त्यानुसारखरेदी झालेल्या उघडयावरील खरीप हंगामातील व रब्बी हंगामातील धानाच्या सुरक्षितेसाठी आवश्यक असलेल्या ताडपत्र्यानुसार GeM पोर्टलवर ८६५ नग ताडपत्र्या ४०० GSM च्या खरेदीसाठी GeM पोर्टलवर आदेश देण्यात आलेला त्यानुसार स्क्वे.मि.१,०२,५५४ प्रतिस स्क्वे. मि. रु. ६४/- प्रमाणे रक्कम रु. ६५,६३,५५६/- ची ताडपत्री प्लॉस्टिक GeM पोर्टलवर खालील तपशिलानुसार खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालय | GSM | Size | खरेदी ताडपत्री संख्या | एकुण Sqr. Mtr. | दर प्रति Sqr. Mtr. रुपये G.S.T.सह. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ४०० | ३० X ३० | ११५ | ९६१९.०० | ६४.०० | ६१५६१६.०० |
| | एकुण नाशिक :- | | | ११५ | ९६१९.०० | | ६१५६१६.०० |
| २ | जव्हार | ४०० | ३० X ३० | १०० | ८३६४.०० | ६४.०० | ५३५२९६.०० |
| | एकुण जव्हार :- | | | १०० | ८३६४.०० | | ५३५२९६.०० |
| ३ | यवतमाळ | ४०० | ३० X ३० | १० | ८३६.०० | ६४.०० | ५३५०४.०० |
| | एकुण यवतमाळ :- | | | १० | ८३६.०० | | ५३५०४.०० |
| ४ | चंद्रपुर | ४०० | ३० X ३० | ५० | ४१८२.०० | ६४.०० | २६७६४८.०० |
| | एकुण चंद्रपुर :- | | | ५० | ४१८२.०० | | २६७६४८.०० |
| ५ | अहेरी | ४०० | ३० X ३० | ४० | ३३४६.००. | ६४.०० | २१४१४४.०० |
| | | | ३० X ४० | ४५ | ५०१९.०० | ६४.०० | ३२१२१६.०० |
| | | | ४० X ५० | १०० | १८५८७.०० | ६४.०० | ११८९५६८.०० |
| | एकुण अहेरी :- | | | १८५ | २६९५२.०० | | १७२४९२८.०० |
| ६ | भंडारा | ४०० | ३० X ४० | २०५ | २२८६२.०० | ६४.०० | १४६३१६८.०० |
| | एकुण भंडारा :- | | | २०५ | २२८६२.०० | | १४६३१६८.०० |
| ७ | गडचिरोली | ४०० | ४० X ४० | २०० | २९७३९.०० | ६४.०० | १९०३२९६.०० |
| | एकुण गडचिराली | | | २०० | २९७३९.०० | | १९०३२९६.०० |
| | एकुणांत :- | | | ८६५ | १०२५५४.०० | | ६५६३४५६.०० |

प्रादेशिक कार्यालयस्तरावर खरेदी केलेल्या ताडपत्री ४० नग रक्कम रु.२,१२,२८२/- व वरीलप्रमाणे GeM पोर्टल वरुन ४०० GSM च्या एकुण १,०२,५५४ स्क्वे. मि. करीता रु. ६४ प्रति स्क्वे. मि. प्रमाणे मे.लॅमिफॅब्स ॲण्ड पेपर्स प्रा.लि.एम.आय.डी.सी. चिखलठाणा जि. औरंगाबाद यांचे रक्कम रु.६५,६३,४५६/- इतक्या रकमेचे देयक मा. अध्यक्ष, तथा मंत्री महोदय, आदिवासी विकास मंत्रालय, मुंबई यांनी दिलेल्या दिनांक ०९.०३.२०२० च्या मंजुर टिपणीनुसार अदा करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

हंगाम २०१९-२० मध्ये केलेल्या करारनामा व ई-निविदेत २५% कमी/जास्त नुसार प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांच्या हंगाम २०२०-२१ च्या मागणी ४०X४० च्या ५०० नग ताडपत्री पैकी २५% नुसार मे.लॅमीफॅब्स अँण्ड पेपर्स (प्रा) लि. चिखलठाणा, औरंगाबाद यांना दिनांक ०९ डिसेबर,२०२० रोजीच्या आदेशानुसार प्रादेशिक कार्यालय,गडचिरोली यांना ४०X४० च्या १७२ नग ताडपत्र्या ४०० GSM च्या प्रति स्क्वेअर मिटर दर ६४.०० प्रमाणे एकुण स्क्वेअर मिटर २५,५७६.२० पुरवठा करणेसाठी कळविण्यात आले आहे, त्यानुसार त्यांनी १७२ नग ताडपत्रीचा पुरवठा प्रादेशिक कार्यालय,गडचिरोली यांना केलेला आहे.

खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांना सुविधा पुरविणे, खरेदी केंद्राना ताडपत्री,मॉइश्चर मिटर, वजनकाटे वगैरे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कृषी उत्पन्न बाजार समितीची आहे. परंतु त्यांचे कडुन सदरच्या सुविधा उपलब्ध न करुन दिल्यास सदरचे साहित्य महामंडळ खरेदी करुन त्यांच्या रक्कमा उत्पन्न बाजार समितीना देय असलेल्या मार्केटसेस मधुन कपात करणेबाबत प्रादेशिक कार्यालयांना दिनांक ३ सप्टेंबर,२०२० रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत. करीता हंगाम २०१९-२० प्लॅस्टिक ताडपत्री खरेदी ९०५ नग खर्च रक्कम रु. ६७,७५,७३८/- खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव व हंगाम २०२०-२१ मध्ये प्रादेशिक कार्यालय,गडचिरोली यांना पुरवठा केलेल्या १७२ नग खर्च रक्कम रु.१६,३६,८७७/- कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव सादर.

वरील प्रमाणे हंगाम २०१९-२० मध्ये खरेदी करण्यात आलेल्या ताडपत्रयास बाबत साधक बाधक चर्चा होवून खालीलप्रमाणे सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ०७ :-** ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो की, हंगाम २०१९-२० प्लॅस्टिक ताडपत्री खरेदी नग ९०५ खर्च रक्कम रुपये ६७,७५,७३८/- खर्चास कार्योततर मंजूरी देणेत येत आहे.

**सुचलक** :- श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- श्री. विकास दुलाजी वळवी, संचालक सदस्य.

**ठराव सर्वोनुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०८ : एकाधिकार खरेदी योजनेतील हंगाम २०१५-१६ ते २०१९-२० मधील शिल्लक अन्नधान्य आदिम जमाती व गरजु आदिवासी कुटुंबांना वाटप करणेबाबत.**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने सादर करणेत येते की, एकधिकार खरेदी योजनेतील हंगाम २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीतील खरेदी झालेल्या कृषीउपज मालापैकी प्रादेशिक कार्यालय, नाशिक, जव्हार, धारणी व यवतमाळ या कार्यालयांतर्गत विक्रीविना शिल्लक असलेला कृषीउपज माल (अन्नधान्य) NCDEX, Star Agribazar व Agribid Inditrade यांचे मार्फत ई-लिलावाव्दारे विक्री केला असता त्यास अल्प दर प्राप्त झाले होते. सदर व्यवहारात महामंडळास मोठया प्रमाणावर तोटा होणार असल्याने प्राप्त झालेल्या दरानुसार विक्रीस मान्यता मिळणेकामी मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला होता. मात्र महाराष्ट्र राज्यात तसेच राष्ट्रीय पातळीवर कोरोना विषाणुंचा (COVID-१९) प्रसार होऊ नये याकरीता प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यात फौजदारी संहीता,

Scanned with CamScanner

१९७३ चे कलम १४४ लागु केले असल्याने जमावबंदी आदेश संपुर्ण राज्यात लागु केलेला आहे. त्यामुळे दारीद्रय रेषेखालील आदिवासी जनतेच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाल्याने या कार्यालयाने विक्री मालाचे प्रस्ताव रद्द करुन सदर कृषी माल राज्य शासनाचे मान्यतेने आदिवासी उपयोजना क्षेत्रात वितरीत करणेबाबत शासनास प्रस्तावित करणेत आले होते. त्यानुसार पत्र क्र.शासनाचे पत्र क्र.एसटीसी.२१२०/प्र.क्र.३५/का.१० दिनांक ७/४/२०२० अन्वये शासनाने त्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे तांदूळ व इतर अन्य अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे.

संपुर्ण राज्यात कलम १४४ लागु केल्याने दारीद्रय रेषेखालील आदिवासी जनतेला उपजिविकेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.त्यामुळे त्यांना अन्नधान्याचा पुरवठा करणे अंत्यत आवश्यक आहे.महामंडळाकडे धान, तांदुळ, तुर, तुरदाळ, चना, वरई, नागली, सोयाबीन, तीळ, उडीद, गहु व खुरासणी असे एकुण ५४३०६.५५ क्विं अन्नधान्य शिल्लक आहे.सदर अन्नधान्याचा पुरवठा हा संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे मागणी केल्यानुसार त्यांचेच नियंत्रणाखाली वाटप करणेत येत आहे.

तसेच वर दर्शविल्यानुसार एकाधिकार खरेदी योजनेतील कोरोनाच्या पार्श्वभुमीवर वाटप करण्यात येणाऱ्या मालाव्यतिरीक्त महामंडळाकडे धान, तांदूळ, तुर, तुरदाळ, चना,वरई, नागली,सोयाबीन,तीळ,उडीद व खुरासणी मिळून ५४३०६.५५ क्विं. शिल्लक असून तो खराब झाला आहे. अहवालानुसार पशुखाद्य म्हणुन विक्री करणेस तसेच जो माल जास्त प्रमाणात खराब झाला असेल त्या मालाचे निर्लेखन करण्याची मंजुरी मिळणे बाबत व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रस्तावित केले.

वरील प्रमाणे शिल्लक असलेल्या सर्व मालाचे नमुने शासकीय प्रयोग शाळेत तपासणी करुन जो माल चांगला स्वरुपाचा आहे मानवी खाण्यास योग्य आहे असा माल ई-लिविदेद्वारे विक्री करावी, जो माल मानवी खान्यास योग्य नाही तो पशुखादय म्हणून ई-निविदेत आलेल्या स्वरुपात विक्री करणेस सर्व संचालकांनी सहमती दर्शविली २०१५-१६ ते २०१९-२० पर्यत शिल्लक माला बाबत चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्योत आला.

**ठराव क्रमांक ०८ :-** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो की, एकाधिकार खरेदी योजनेतील कोरोनाच्या पार्श्वभुमीवर वाटप करण्यात आलेल्या मालाव्यतिरिक्त महामंडळाकडे जो माल शिल्लक आहे, त्यामालाची शासकीय प्रयोगशाळेत तपासणी करुन तपासणी अहवानुसार मानवी खाण्यास अयोग्य असलेला माल पशुखाद्य म्हणून विक्री करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच जो माल जास्त प्रमाणात खराब झाला असेल तो निर्लेखन करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक यांनी खातरजमा करुन त्यानुसार कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**ठराव सर्वोनुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०९ : हंगाम २०१९-२० मध्ये खरेदी करण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक वजनकाटे १९२ नग खरेदीस व रक्कमेस कार्योत्तर मंजुरी बाबत...**

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत व एकाधिकार खरेदी योजनेसाठी हंगाम २०१९-२० मध्ये धान व भरडधान्यव इतर कृषिउपज मालाचे अचुक मोजमाप होणेकरीता वजन काटयाची

Scanned with CamScanner

आवश्यकता भासते. त्या करीता दिनांक १६.०९.२०१९ च्या मा.संचालक सभेत ठराव क्र.३९ मंजुर करण्यात आलेला आहे. प्रादेशिक कार्यालय, निहाय ईलेक्ट्रानिक वजनकाटे मागणी नोंदविण्यात आली होती. त्यानुसार १९२ नग ईलेक्ट्रानिक वजनकाटे खरेदीकरीता व त्यात २५% कमी/जास्त करुन दिनांक२४.१०.२०२० रोजी GeM पोर्टलवर तिसऱ्यांदा ई-निविदा Bid Number GEM/२०१९/B/४००९६५ प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार सदर निविदेत १० निविदाधारकांनी भाग घेतला सदर निविदा तिसरी वेळ असल्याने शासन निर्णयानुसार एकही निविदापात्र ठरत असल्यास ती पात्र करण्यात यावी. त्यानुसार निविदा अटी-शर्तीनुसार मे.नितीराज इंजिनिरींगलि. यांची निविदा पात्रझाली.त्यानुसार दराचा लिफाफा उघडण्यात आला त्यात प्रति नग रु.६४४२.८०प्रमाणे इलेक्ट्रनिक वजनकाटे १९२ नगानुसार रु.१२,३७,०१७.६०इतक्या रक्कमचे होतात.

त्यानुसार आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत व एकाधिकार खरेदी योजनेसाठी हंगाम २०१९-२० मध्ये धान व भरडधान्यव इतर कृषिउपज मालाचे अचुक मोजमाप करणेसाठी आवश्यक GeM पोर्टलवर १९२ नग इलेक्ट्रनिक वजनकाटे प्रति नग रु.६४४२.८० प्रमाणे रक्कम रु. १२,३७,०१७.६०/- ची इलेक्ट्रनिक वजनकाटे GeM पोर्टलवर खालील तपशिलानुसार खरेदी करण्यात आलेले आहेत.

| प्रादेशिक कार्यालय | वजनकाटे क्षमता | इलेक्ट्रनिक वजनकाटे संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| नाशिक | १०० kg | २० | १,२८,८५६.०० |
| जव्हार | १०० kg | ५ | ३२,२१४.०० |
| नंदुरबार | १०० kg | ३० | १,९३,२८४.०० |
| जुन्नर | १०० kg | ० | ०.०० |
| धारणी | १०० kg | १५ | ९६,६४२.०० |
| यवतमाळ | १०० kg | १८ | १,१५,९७०.४० |
| चंद्रपुर | १०० kg | १५ | ९६,६४२.०० |
| भंडारा | १०० kg | २८ | १,८०,३९८.४० |
| गडचिरोली | १०० kg | ५१ | ३,२८,५८२.८० |
| अहेरी | १०० kg | १० | ६४,४२८.०० |
| **एकुण :-** | | **१९२** | **१२,३७,०१७.६०** |

वरील प्रमाणे १९२ इलेक्ट्रनिक वजनकाटे प्रति नग रु. ६४४२.८० प्रमाणे GeM पोर्टल वरुन मे.नितीराज इंजिनिरींग लि. यांचे रक्कम रु. १२,३७,०१७.६०/- इतक्या रकमेचे देयक प्राप्त झाल्यानंतर त्याना अदा करण्यात आले आहेत. करीता खरेदी केलेल्या १९२ नग इलेक्ट्रनिक वजनकाटे रक्कम रु. १२,३७,०१७.६०/- खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव क्रमांक ०९ :** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो की, हंगाम २०१९-२० मध्ये १९२ इलेक्ट्रॅनिक वजनकाटे प्रति नग रुपये ६४४२.८० प्रमाणे मे. नितीराज इंजिनिरींग लि. यांना अदा केलेल्या रक्कम रु. १२,३७,०१७.६० अदा करणेस कार्योत्तर मंजूर देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य.

Scanned with CamScanner

ठराव सर्वानुमते मंजूर.



**विषय क्रमांक १० : कोरोना पार्श्वभुमीवर आदीवासींना अन्नधान्य वाटप करण्या करीता प्लॅस्टिक बॅग खरेदीच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, महाराष्ट्रासह संपुर्ण भारतात कोरोना (Covid-१९) विषाणुच्या प्रादुर्भावामुळे संचारबंदी लागु झाल्याने एकाधिकार खरेदी योजनेतील शिल्लक असलेले अन्नधान्य विक्री न करता आदिम जमाती व गरजु आदिवासी कुटुंबांना आवश्यक त्या मालाची प्रक्रीया करुन वाटप करणेस मान्यता मिळणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. TDC/ADM/PA/MP Scheme/१२३२/२० दि.०१.०४.२०२० अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.त्यानुसार शासन पत्र क्र.एसटीसी.२१२०/प्र.क्र.३५/का.१० दि.०७.०४.२०२० व आदिवासी विकास विभाग पत्र क्र.एसटीसी.२१२०/प्र.क्र.३५/का.३ दि.१०.०४.२०२० अन्वये मान्यता प्राप्तझालेली आहे.

महामंडळाकडे शिल्लक असलेल्या मालास भरडाई करुन अन्नधान्य आदिवासींना वाटप करण्यासाठी ३ कि.ग्रॅ., ५ कि.ग्रॅ. व १० कि.ग्रॅ.प्लॅस्टिक बॅगची आवश्यकता असल्याने तातडीची गरज म्हणुन तसेच कोरोना विषाणुची पार्श्वभुमी असल्यामुळे व महामंडळाच्या अन्नधान्यामध्ये कुणी भेसळ करु नये म्हणुन महामंडळाचा शिक्का असलेल्या बॅग असणे आवश्यक होते. या कालावधीत ई-निविदा राबवुन प्लॅस्टिक बॅग खरेदी करणे शक्य नसल्याने उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासननिर्णयामध्ये दिलेल्या सुचनांनुसार सुरवातीला मुख्य कार्यालय स्तरावरुन दोन लिफाफे पध्दतीने HDPE Woven Fabric (०.७५ Micron) च्या ३ कि.ग्रॅ. साईज १२x१८ इंच व ५ कि.ग्रॅ.साईज १२x२२ इंच क्षमतेच्या (०.७५ Micron) च्या प्लॅस्टिक बॅग खरेदी करण्याचे ठरले.

त्यानुसार मुख्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.आविम/विप/प्लॅस्टिक बॅग/१२५५/२० दि.१५.०४.२०२० अन्वये पुरवठादारांकडुन बंद लिफाफ्यात दि.१६.०४.२०२० रोजी दरपत्रके मागविली होती.सदर दिवशी ०४ पुरवठादारांकडुन दरपत्रके प्राप्त झाली.ती दरपत्रके त्याचदिवशी दुपारी १.०० वा कार्यालयातील अधिकारी कर्मचारी याचे समक्ष उघडण्यात आली.त्यामध्ये ३ कि.ग्रॅ.च्या पिशवीसाठी रु.३.१९ प्रति बॅग व ५ कि.ग्रॅ. च्या पिशवीसाठी रु.३.९८ प्रति बॅग न्युनतम दर मे.क्रिस्टल पॉलिसॅक इंडस्ट्रिज, वरवंडी रोड, म्हसरुळ यांनी दिल्याने ते L१ ठरले. प्राप्त झालेल्या दरास सर्वांनी संमती दिली.

अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी ३ कि.ग्रॅ., ५ कि.ग्रॅ.च्या पिशव्यांव्यतिरीक्त १० कि.ग्रॅ. च्या पिशव्यांची सुध्दा आवश्यकता असल्याचे लक्षात आल्याने वरील प्रमाणेच उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासननिर्णयामध्ये दिलेल्या सुचनांनुसार दोन लिफाफे पध्दतीने HDPE Woven Fabric (०.७५ Micron) च्या १० कि.ग्रॅ. साईज १५x२२ इंच क्षमतेच्या (०.७५ Micron) च्या प्लॅस्टिक बॅग पुरवठादारांकडुन दर मागविण्या करीता पत्र

Scanned with CamScanner

क्र.आविम/विप/कोरोना/प्लॅ.बॅग/१२६४/२० दिनांक १७.०४.२०२० अन्वये प्लॅस्टिक बॅग खरेदीकरीता बंद लिफाफ्यात पुरवठादारांकडुन दरपत्रके दिनांक २०.०४.२०२० रोजी मागविली होती. सदर दिवशी सुध्दा ०४ पुरवठादारांकडुन दरपत्रके प्राप्त झाली.ती दरपत्रके त्याचदिवशी दुपारी १.०० वा कार्यालयातील अधिकारी कर्मचारी याचे समक्ष उघडण्यात आली. यावेळी सुध्दा मे.क्रिस्टल पॉलिसॅक इंडस्ट्रिज, वरवंडी रोड, म्हसरुळ यांनी १० कि.ग्रॅ.च्या पिशवीसाठी रु.४.४५ प्रति बॅग न्युनतम दर दिल्याने ते L१ ठरले.१० कि.ग्रॅ.पिशवीच्या च्या प्राप्त झालेल्या दरास सुध्दा उपस्थित सर्वांनी संमती दिली. त्यानुसार मे.क्रिस्टल पॉलिसॅक इंडस्ट्रिज, वरवंडी रोड, म्हसरुळ यांचेसोबत प्लॅस्टिक बॅग पुरवठा करणेबाबत दिनांक २०.०४.२०२० रोजी अटी-शर्तीसह करारनामा करण्यात येऊन, प्रादेशिक कार्यालय, जव्हार व नाशिकला प्लॅस्टिक बॅग खरेदी करणेबाबत पत्र क्र.आविम/विप/एखयो/को.प्रा/प्लॅ.बॅ.पुर. /१२९४/२० दिनांक २२ एप्रिल, २०२० अन्वये निर्देष दिले आहे.

**ठराव क्रमांक १० :-** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येते की, मे.क्रिस्टल पॉलिसॅक इंडस्ट्रिज, वरवंडी रोड, म्हसरुळ यांचेकडून कोरोना प्रभावित लोकांना धान्य वाटप करीता घेण्यात आलेल्या वरीलप्रमाणे प्लॅस्टिक बॅग खरेदीच्या कार्यवाहीस अटी-शर्तीसह मान्यता मान्यता देण्यांत येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. अशोक भारुराव मंगाम, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ११ : पणन हंगाम २०२०-२१ करीता ताडपत्री, मॉईचर मिटर, दोरखंड व बारदाना, खरेदीसाठी करणेस (घेणेस) मंजूरी मिळणेबाबत.**

पणन हंगाम २०२०-२१मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजना,एकाधिकार खरेदी योजनेत व कृषीउपज मालाच्या खरेदीसाठी व सुरक्षितेसाठी पुर्व तयारी करणे आवश्यकआहे. त्यासाठी खालील बाबीची खरेदी करावी लागेल.

**१.ताडपत्री खरेदी :**

पणनहंगाम २०१९-२० मध्ये प्रादेशिक कार्यालयाना दिलेल्या मान्यतेनुसार प्रादेशिक कार्यालय,भंडारा,चंद्रपुर व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांनी प्रत्येकी १० प्रमाणे २५० GSM च्या ३० ताडपत्र्या खरेदी केल्या आहेत. तसेच प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांनी ९०GSM च्या १० ताडपत्र्या खरेदी केल्या आहेत. मुख्य कार्यालयामार्फत ८६५ नग, ४०० GSM ताडपत्र्याची GeM पोर्टलवर ई-निविदा मागवुन खरेदी करण्यात आल्या आहेत. ताडपत्री पुरवठादार मे.लॅमीफॅब्स ॲण्ड पेपर्स प्रा.लि.चिखलठाणा,जि. औरंगाबाद यांनी दिनांक १३/३/२०२० ते दिनांक ३१/३/२०२१ पर्यंतच्या मुदतीची बँक गॅरन्टी सादर केली आहे.GeM पोर्टलच्या अटी-शर्तीनुसार २५% कमी/जास्त ताडपत्री खरेदी करणेचे नमुद आहे.त्यामुळे प्रादेशिक कार्यालयाची मागणी प्राप्त झाल्यास सदर मुदतीत खरेदी

Scanned with CamScanner

केलेल्या ताडपत्री व्यतिरीक्त २५% प्रमाणे अधिकच्या १७२ नग ताडपत्री खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

परंतु प्रादेशिक कार्यालयानी १४७० नग मागणी प्राप्त झालेली आहे. त्यापैकी १७२ नग ताडपत्रीची हंगाम २०१९-२० वाढीव २५% नुसार खरेदी करुन प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांना पुरवठा करण्यात आलेल्या आहेत. १७२ नग ताडपत्री वगळुन धान सुरक्षिते करीता साईज नुसार १२९८ नग त्यात (२५% कमी/जास्त) ताडपत्र्याची खरेदी करावी लागेल. सदर खरेदीची प्रक्रिया शासन निर्देशानुसार GeM पोर्टलवर निविदा राबविण्यात आलेली आहे, सदर प्रक्रियेस मागिल अनुभव पाहता तीन ते चार महिन्याचा कालावधी लागतो. त्यामुळे हंगाम २०२०-२१ करीता GeM पोर्टलवर निविदा प्रक्रिया राबवुन ताडपत्री खरेदीस मान्यता दयावी हि विनंती. त्यास रु.१.१४ कोटी अंदाजे खर्च येणार आहे. हा खर्च कृषी उत्पन्न बाजार समितीना देण्यात येणाऱ्या मार्केटसेस मधुन वसुल करण्याचे प्रस्तावित आहे.

**२. मॉईचर मिटर :**

पणन हंगाम २०२०-२१ साठी मॉईचर मिटर उपलब्ध करुन देणेबाबत प्रादेशिक कार्यालयाची मागणी प्राप्त झाल्यास त्यांचे मागणीनुसार GeM पोर्टलवर ई-निविदा मागवुन खरेदी करावी लागेल. त्यासाठी मॉईचर मिटरखरेदीसाठी GeM पोर्टलवर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता दयावी हि विनंती.

प्रादेशिक कार्यालय निहाय मागणी पुढील होणाऱ्या संचालक सभेत अवलोकनार्थ सादर करण्यात येईल.

**३. दोरखंड :**

खरेदी केंद्रावर खुल्याजागेत साठवणुक केलेलाधानसाठा पाऊसापासुन सुरक्षितेसाठी धानसाठा ताडपत्री टाकल्यानंतर सदर ताडपत्री वादळी वाऱ्याने उडुन धानसाठयाचे नुकसान होवु नये याकरीता ताडपत्र्या बांधने करीता दोरखंडाची आवश्यकता असते.करीता प्रादेशिक कार्यालयाची मागणी प्राप्त झाल्यास त्यांचे मागणीनुसार GeM पोर्टलवर ई-निविदा मागवुन१०mm जाडीचा खरेदी करावा लागेल. त्यासाठी दोरखंडखरेदीसाठी GeM पोर्टलवर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता दयावी हि विनंती.

प्रादेशिक कार्यालय निहाय मागणी पुढील होणाऱ्या संचालक सभेत अवलोकनार्थ सादर करण्यात येईल.

**४. एकदा वापरलेला बारदाना खरेदी :**

आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०२०-२१ करीता संदर्भ क्र.१ अन्वये एकदा वापरलेला बारदाना खरेदी करीता शासन स्थरावरुन बारदाना खरेदी करणेकरीता ई-निविदा प्रारुप तयार करण्यात येवुन खरेदी कार्यवाही करण्यात आलेली होती परंतु शासनाकडुन एकदा वापरलेला बारदाना खरेदीची कार्यवाही झालेली नाही.

संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयातील मुद्या क्र. ५.२ v) धान खरेदी प्रक्रियेत लागणारा जुना बारदाना उपलब्ध करुन घेण्याची संपुर्ण जबाबदारी दोन्ही अभिकर्ता संस्थांची राहील. बारदान्यासाठी केंद्र शासनाच्या प्रतिपुर्ती दरांच्या मर्यादेपेक्षा अधिक दर प्राप्त झाल्यास, अभिकर्ता संस्थांनी त्यांच्या प्रशासकीय विभागांमार्फत योग्य त्या समर्थनार्थ प्रस्ताव या विभागास सादर करावा

Scanned with CamScanner

असे नमुद आहे. दिनांक ६.१०.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता मा.महाव्यवस्थापक (विप) गुगल मीट या ॲपव्दारे वित्तीय सल्लागार व उपसचिव,अन्न,नागरी पुरवठा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या ऑनलाईन बैठकीत सुध्दा एकदा वापरलेला बारदाना खरेदीची कार्यवाही करावे असे निर्देश देण्यात आले.

संदर्भ क्र.३ अन्वये हंगाम २०२०-२१ साठी आधारभुत किंमत खरेदी योजने मध्ये खरेदी होणाऱ्या धान साठवणुकीसाठी महामंडळामार्फत प्रादेशिक कार्यालयांना ५०kg क्षमतेचा एकदा वापरलेला बारदाना पुरवठा करणेकरीता बारदाना खरेदीसाठी जिल्हानिहाय दर मागविण्यासाठी ई-निविदा क्र. २०२०_MSTDC_६१६०४६_१ दिनांक १३.१०.२०१९ रोजी सकाळी ११:०० वाजता https;//www.mahateders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्दी करण्यात आली होती. सदर निविदेत एकच निविदा धारक पात्र होत असल्याने सदरची निविदा रद्द करण्यात आली.

संदर्भ क्र.४ अन्वये ई-निविदा फार्म प्रारुप मधील अट क्र.२३ मध्ये मध्ये बदल करुन नव्याने ई-निविदा क्र.२०२०_MSTDC_६२३९१६_१ दिनांक २०.११.२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता https;//www.mahateders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्दी करण्यात आली ई-निविदा क्र.२०२०_MSTDC_६२३९१६_१ च्या वेळापत्रकानुसार दिनांक ११.१२.२०२० रोजी तांत्रिक लिफाफे डाऊनलोड/उघडण्यात आले. त्यात ४ निविदा धारकांनी भाग घेतला त्यात ३ निविदाधारक पात्र झालेले त्यानुसार दिनांक १४.१२.२०२० दुपारी वेळ ०३.११ वाजता दरांचे लिफाफे उडण्यात ७ डाऊनलोड करण्यात आले. त्यात खालील प्रमाणे जिल्हा निहाय प्राप्त झाले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | जिल्हा | प्राप्त प्रति नग दर रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | नाशिक | २७.७२ |
| २ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | पालघर | २७.७२ |
| ३ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | रायगड | २७.७२ |
| ४ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | ठाणे | २७.७२ |
| ५ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | अहमदनगर | २७.२७ |
| ६ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | पुणे | २७.०० |
| ७ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | जळगांव | २६.७२ |
| ८ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | नंदुरबार | २७.७२ |
| ९ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | धुळे | २६.७२ |
| १० | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | चंद्रपुर | ३४.२५ |
| ११ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | गडचिरोली | ३४.२५ |
| १२ | मे.गुलशन ट्रेडर्स, नागपुर | गोंदिया | ३२.३४ |
| १३ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | नागपुर | ३४.२५ |
| १४ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | यवतमाळ | ३४.२५ |
| १५ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | नांदेड | ३४.२५ |
| १६ | मे.श्री उध्दवेश एजन्सीज,नाशिक | अमरावती | ३४.२५ |

Scanned with CamScanner

मा.अध्यक्ष तथा मंत्री महोदय, आदिवासी विकास (म.रा.), मुंबई यांचेकडे टिपणी सादर करणेत घेऊन टिपणीवर शिफारस घेण्यात येऊन वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचेकडे मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यास अदयाप पावेतो मंजुरी मिळाली नाही. त्यास मंजुरी मिळाली तरच TDC ला संपुर्ण खर्च प्रतिपुर्ती दवारे मिळेल अन्यथा या खरेदीचा संपुर्ण खर्च TDC ला स्वत: करावा लागेल.

**ठराव क्रमांक ११ :** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो की, महामंडळाच्या खरेदी केंद्राना हंगाम २०१९-२० व २०२०-२१ करीता आवश्यक लागणाऱ्या ताडपत्री, मॉईचर मिटर, दोरखंड व बारदाना खरेदी (घेणेचे) अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक यांना देणेत येत आहे. तत्पूवर्ती सदर आवश्यक लागणारे साहित्य खरेदी करतांना कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करुन खरेदी प्रक्रीयेस व झालेल्या प्रक्रीयेस मंजूर देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. अशोक भारुराव मंगाम, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य.

**ठराव सर्वोनुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १२ : कोरोना पार्श्वभुमीवर आदीवासींना अन्नधान्य वाटप करण्या करीता धान भरडाई करण्यासाठी दरपत्रके मागवुन ई-निविदेत प्राप्त झालेल्या दरास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, महाराष्ट्रासह संपुर्ण भारतात कोरोना (Covid-१९) विषाणुच्या प्रादुर्भावामुळे संचारबंदी लागु झाल्याने एकाधिकार खरेदी योजनेतील शिल्लक असलेले अन्नधान्य विक्री न करता आदिम जमाती व गरजु आदिवासी कुटुंबांना आवश्यक त्या मालाची प्रक्रीया करुन वाटप करणेस मान्यता मिळणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. TDC/ADM/PA/MP Scheme/१२३२/२० दि.०१.०४.२०२० अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार शासन पत्र क्र. एसटीसी.२१२०/प्र.क्र.३५/का.१० दि.०७.०४.२०२० व आदिवासी विकास विभाग पत्र क्र.एसटीसी.२१२०/प्र.क्र.३५/का.३ दि.१०.०४.२०२० अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

महामंडळाकडे शिल्लक असलेल्या मालास भरडाई करुन अन्नधान्य आदिवासींना वाटप करण्यासाठी एकाधिकार खरेदी योजनेतील शिल्लक धानाची भरडाई करणे आवश्यक असल्याने लॉकडाऊनच्या कालावधीत ई-निविदा काढुन धानाची भरडाई करणे शक्य नसल्याने उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या सुचनांनुसार धानाची भरडाई करण्याचे ठरले.

प्रादेशिक कार्यालय, नाशिक व जव्हार कार्यक्षेत्रातील मिलर्सकडुन धान भरडाईकरीता दरपत्रके मागवुन त्याअनुषंगाने लेखापरिक्षणात आक्षेप येऊ नये म्हणुन मुख्यालयाकडुन अटी-शर्ती तयार करुन देण्यात आल्या. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे प्राप्त दरपत्रकामध्ये मे.एस.कुमार इंडस्ट्रिज, घोटी यांचे न्युनतम १९०/- दर प्राप्त झाले. तर प्रादेशिक कार्यालय, जव्हार येथे मे.महालक्ष्मी राईसमिल, चारोटी ता.डहाणु व मे.ओमसाई राईसमिल, चिंचघर ता.विक्रमगड यांचे

Scanned with CamScanner

न्युनतम १५५/- दर प्राप्त झाले. मात्र प्राप्त दरांबाबत महामंडळाचे संचालक, स्वर्गीय देवीदास पांडुरंग पाटील, मा.श्री.मधुकर निंबाजी काठे व संचालिका मा.सौ.मिनाक्षी वट्ठी मॅडम यांनी प्राप्त दराबाबत आक्षेप घेतल्याने सदर बाब मा.मंत्री महोदयांना दि.१९.०६.२०२० रोजीच्या कार्यालयीन टिपणीद्वारे अवगत करुन दिली असता मा.मंत्री महोदयांनी फेरनिविदा मागवुन दर निश्चित करण्यात यावे अशा सुचना दिल्या होत्या.

मा. मंत्री महोदयांनी दिलेल्या सुचनेनुसार प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचेकडे फेरनिविदा काढली असता सुरवातीस एकाही मिलर्सने दर दिले नाही. सदर निविदेस प्रथम व द्वितीय मुदतवाढ देण्यात आली तरी सुध्दा एकाही मिलर्सने भाग न घेतल्याने सदर ई-निविदा रद्द करण्यात आली. तद्नंतर अल्प मुदतीची (आठ दिवासांच्या) कालावधीसाठी मागविण्यात आली. त्यामध्ये मे. ओरायझा इंडस्ट्रिज, वलखेड ता.दिंडोरी यांनी भाग घेऊन रु.१४१/- प्रति क्विं. भरडाई दर दिला आहे. तसेच प्रादेशिक कार्यालय, जव्हार यांचेकडे काढलेल्या फेरनिविदेमध्ये सहा मिलर्सनी भाग घेतला होता त्यामध्ये अंबिका राईसमिल सफाळे ता.जि.पालघर यांनी रु.१५०/- प्रति क्विं. न्युनतम दर दिला असुन इतर पाच राईसमिलर्स हे प्राप्त रु.१५०/- न्युनतम दरात भरडाई करण्यास तयार असल्यास त्यांनाही भरडाई करण्याची परवानगी देणबाबत प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांनी विनंती केलेली होती.

धान भरडाई करणेसाठी मागविलेल्या फेर ई-निविदेमध्ये प्रादेशिक कार्यालय, नाशिक व जव्हार यांना अनुक्रम रु.१४१/- व रु.१५०/- असे न्युनतम दर प्राप्त झाल्यानंतर सदर दरांबाबत मा.मंत्री महोदयांना दि.०७.१०.२०२० अन्वये टिपाणीद्वारे प्राप्त झालेल्या दरांबाबात अवगत करुन एकाधिकार योजनेतील शिल्लक धान भरडाईस परवानगी मागितली असता त्यांनी प्रादेशिक कार्यालय, नाशिक व जव्हार यांना ई-निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरांनुसार एकाधिकार खरेदी योजनेतील शिल्लक धानाची भरडाई करण्यास संमती दिली आहे. ही बाब संचालक मंडळासमोर ठेवण्यात येत आहे.

मा. मंत्री महोदयांनी वरील प्रमाणे मान्यता दिल्यानंतर प्रादेशिक कार्यालय, जव्हार अंतर्गत ऑक्टोबर महिन्यात वाटप झालेल्या तांदुळाबाबत शहापुर येथे कातकरी आदिवासी बांधवांना निकृष्ठ दर्जाचा तांदुळ वाटप विरोधात तक्रार झाली त्यामुळे सदर निकृष्ठ दर्जाच्या तांदुळ वाटप प्रकरणी दि.२८.१०.२०२० रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे झालेल्या मिटींगमध्ये सदर अन्नधान्य वाटप करण्याचे थांबवुन तो तपासुण घेणेच्या सुचनेनुसारतुर्त अन्नधान्य वाटप करणे थांबविले आहे. त्याअनुषंगाने प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांना पत्र क्र.आविम/विप/एखयो/अन्न.धा.लॅब तपासणी/४०५३/२० दि.०८.१२.२०२० रोजी पत्र देऊन प्रादेशिक कार्यालय, जव्हार मार्फत संबंधित प्रकल्प कार्यालयांना वाटण्याकरीता पाठविण्यात आलेले अन्नधान्याची प्रयोगशाळेमध्ये तपासणी करुन सदर अन्नधान्य आदिम जमाती व गरजु आदिवासींना वाटप करणेसाठी योग्य आहे किंवा नाही याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय देण्यास कळविले आहे. त्यानुसार सदर तपासणी अहवाल प्राप्त झाला असुन, सदर तांदुळ अप्रमाणित असल्याचे दि. १५.१२.२०२० पत्र प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांचेकडुन प्राप्त झाले आहे. इतर वर्षाचे धान भरडाई करुन ते प्रयोगशाळेत तपासणी करुन ते खाण्यास योग्य असल्यास गरजु आदिवासींना वाटप करता येईल.

**करीता संचालक मंडळाकडुन खालील बाबींवर निर्णय होणे अपेक्षित आहे.**

Scanned with CamScanner

१. प्रादेशिक कार्यालय, नाशिक अंतर्गत ई-लिलावात प्राप्त झालेला दर रु. १४१/- प्रति क्विं.च्या भरडाई खर्चास व प्रादेशिक कार्यालय, जव्हार अंतर्गत प्राप्त झालेला दर रु. १५०/- प्रति क्विं. प्रमाणे येणाऱ्या भरडाई खर्चास मान्यता देणे.

२. जो माल खाण्यास योग्य नाही असे प्रयोगशाळेच्या अहवालावरुन ठरले आहे त्याची विल्हेवाट कशी करावी याबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक १२ :-** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, सदर भरडाई दरास शासनाची मान्यता मिळणे बाबत शासनास प्रस्ताव सादर करावा व शिल्लक माल प्रयोग शाळेच्या तपासणी अहवालानुसार खान्यास योग्य आहे किंवा नाही हे ठरल्यानंतरच भरडाई करण्यात यावी तसेच, येणाऱ्या तोटयाची पूर्तता करणेकरीता शासनाकडून निधीची मागणी करावी व तसा प्रस्ताव शासनास सादर करावा.

**सुचक** :- मा. अशोक भारुराव मंगाम, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १३ : एकाधिकार खरेदी योजनेच्या सध्याच्या विक्री पध्दतीत सुधारणा करणेबाबत.**

उपरोक्त विषयांन्वये सादर करण्यात येते की, सदर विषय निर्णय होण्याच्या अनुषंगाने दिनांक २९.०९.२०१९ च्या मा.संचालक मंडळ सभेत विषय सादर करण्यात आला होता परंतु त्यावेळी आचारसंहिता लागु असल्याने तसेच संविधानिक निर्णय असल्याने सदर विषय पुढील मा.संचालक मंडळ सभेत ठेवणेबाबत विषय क्र.३४ अन्वये ठराव घेण्यात आला होता.त्यानुसार सदर विषय या सभेत सादर करण्यात येत आहे.

एकाधिकार खरेदी योजनेत खरेदी केलेल्या मालाच्या विक्रीसाठी महामंडळाकडे निश्चित धोरण असावे याकरीता दि.१२.१०.२०१७ रोजी मा.संचालक मंडळ सभेत विषय क्र.१३ (ब) अन्वये ठराव पारित करण्यात आला होता.

सदर ठरावामध्ये एका वर्षापेक्षा जास्त दिवस झालेल्या विक्रीविना शिल्लक मालासाठी प्रादेशिक कार्यालय, स्तरावर नियुक्त समितीने ऑनलाईन ई-लिलाव आयोजित करावा.ई-लिलावात विक्री करतेवेळी ज्या लॉटला जास्त दर प्राप्त होतील अशा मालाला प्रादेशिक कार्यालय स्तरावरील प्रस्तावित समितीमार्फत मालाची विक्री करावी. यामध्ये महामंडळाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेऊन व बाजारातील दर विचारात घेऊन निर्णय घ्यावा. असा ठराव झाला.या ठरावामध्ये महामंडळाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी या वाक्यामुळे मालविक्री करण्यास प्रादेशिक कार्यालय स्तरावर अडचण निर्माण झाली व पाहिजे त्या प्रमाणात माल विक्री करता आली नाही.

दि. १४.०९.२०१८ रोजीच्या मा.संचालक मंडळाच्या सभेत हंगाम २०१३-१४ पासुन विक्रीविना शिल्लक कृषीउपज मालाच्या विक्रीबाबत योग्य निर्णय घेण्यासाठी मा.संचालक समिती नियुक्त करण्यात आली.यानंतर दि. २८.०९.२०१८ च्या मा.अध्यक्ष तथा मंत्री महोदय, आदिवासी विकास यांचे समवेत मा.संचालक मंडळाच्या नागपुर येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत व्रिकीविना शिल्लक मालाबाबत आयत्या वेळचा विषय ठेवण्यात आला.

Scanned with CamScanner

त्यामध्ये संबंधित प्रादेशिक कार्यालय, स्तरावर प्रादेशिक व्यवस्थापक यांनी ऑनलाईन विक्री करण्याकरीता NCDEX व Inditrade या संस्थांमार्फत विक्रीविना शिल्लक मालाच्या विक्रीसाठी ई-लिलावाचे आयोजन करुन विक्रीमालाचे दर मागवावे. ई-लिलावात ठेवलेल्या मालाच्या प्राप्त झालेल्या दराबाबत दि.२८.०९.२०१८ रोजी झालेल्या ठरावानुसार मा.संचालक समितीची सभा घेण्यात यावी. सदर मा.संचालक समितीसोबत विक्री मालाच्या प्राप्त दरांबाबत चर्चा करुन विक्री मालात प्राप्त दर जर BEP पेक्षा कमी येत असतील तर नियुक्त मा.संचालक समितीची संमती घेऊन सदर सभेचे इतिवृत्त सोबत जोडुन विक्रीविना शिल्लक मालाच्या कारणमिमांसेसह सविस्तर प्रस्ताव मुख्यालयामार्फत शासनाच्या मान्यतेसाठी पाठवण्यात यावा व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर संबंधित खरेदीदारांना ठरलेल्या अटी-शर्तीनुसार मालाची उचल द्यावी. असा ठराव संमत करण्यात आला होता.

उपरोक्त दोन्ही ठरावात दि. १२.१०.२०१७ रोजीच्या मा.संचालक मंडळ सभेत विषय क्र.१३ (ब) अन्वये झालेल्या ठरावामध्ये महामंडळाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी या वाक्यामुळे मालविक्री करण्यास अडचण निर्माण झाली व पाहिजे त्या प्रमाणात माल विक्री करता आली नाही. तसेच दि. २८.०९.२०१८ रोजी झालेल्या ठरावानुसार मा. संचालक समितीची सभा घेण्यात येऊन विक्री मालात प्राप्त दर जर BEP पेक्षा कमी आले तर प्रादेशिक व्यवस्थापक यांनी सविस्तर कारणमिमांसेसह सविस्तर प्रस्ताव मुख्यालयामार्फत शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्याबाबत निर्देश आहेत.

उपरोक्त दोन्ही पध्दतीमध्ये मालविक्री करतांना खुप कालावधी (वेळ) जात असल्याने व ई-लिलावात प्राप्त झालेल्या दरांची (ई-लिलावाची) वैधता संपत असल्याने व शासनाकडुन विक्रीमालाच्या प्रस्तावास मान्यता मिळेपर्यंत संबंधित खरेदीदारांना माल देता येत नसल्याने मालाच्या विक्रीमध्ये पाहीजे तशी गती मिळत नाही व कृषीउपज माल विक्रीविना पडुन महामंडळाचे नुकसान होत आहे.

सद्याच्या विक्री पध्दतीत बदल करुन नविन विक्री पध्दतीनुसार प्रादेशिक कार्यालयांकडुन शिल्लक मालाच्या विक्रीमध्ये ई-लिलावात स्पर्धा निर्माण होण्यासाठी NCDEX, Inditrade व Agribazaar या तीनही संस्थांमार्फत ई-लिलावाचे आयोजन करण्यात येते. विक्रीमालाला BEP पेक्षा जास्त दर प्राप्त झाल्यास लागलीच सदर मालाची प्रादेशिक कार्यालय स्तरावरच विक्री करण्यात येईल. तसेच BEP पेक्षा कमी दर प्राप्त झाल्यास विक्रीमालात येणारा तोटा सविस्तर कारणमिमांसेसह परिपुर्ण प्रस्ताव दुसऱ्याच दिवशी संबंधित प्रादशिक व्यवस्थापकांनी, आपल्या स्वयंस्पष्ट मालविक्रीच्या अभिप्रायासह मुख्यालयाला सादर करणे आवश्यक आहे. मुख्यालयमार्फत सदर प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येईल. शासनाकडुन पाठविलेल्या प्रस्तावावर १५ दिवसात मंजुरी प्राप्त न झाल्यास सदर प्रस्तावास शासनाच्या संम्मतीची वाट न पाहता शासनाची मुक संमती गृहीत धरुन महामंडळ येणारा तोटा सहन करुन त्वरीत माल विक्री करेल. त्यामुळे पुढील होणारा तोटा TDC ला टाळता येईल व शासनाकडे कार्योत्तर मंजुरीसाठी तसेच दि.०६ फेब्रुवारी, १९८२ च्या शासन निर्णयाप्रमाणे तोटे भरपाई प्रतिपुर्तीसाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल.

करीता एकाधिकार खरेदी योजनेत खरेदी केलेल्या व शिल्लक मालाच्या विक्रीसाठी यापुर्वी पारित केलेले ठराव रद्द करुन वरील प्रमाणे कार्यवाहीसाठी मान्यता मिळणेस्तव सादर.

Scanned with CamScanner

ठराव क्रमांक १३ : सर्वानुमते ठराव मंजूर करणेत येतो की, पोर्टलवर रजिस्टर केलेल्या संस्था मार्फत ई-टेंडर मध्ये आलेले दर हे बीईपी पेक्षा कमी असल्याने प्रादेशिक व्यवस्थापकांकडून मुख्य कार्यालयास पाठविली जातात परंतु त्यांना वेळीच मंजूरी मिळत नाही. उशिर झाल्यास स्थानिक पातळीवर विक्री बाबत निर्णय घ्यावा. सन २०१७ मध्ये आश्रमशाळा धान्य पुरवठा बंद करणे बाबत शासनाने जो निर्णय घेतला तो रद्द करणे आवश्यक वाटते असे मा.संचालक मंडळाने नमुद केले. आश्रमशाळा पुरवठा संबधी मा.मंत्री महोदयांशी चर्चा करुनच पुढील निर्णय घेणे उचित राहिल असे मा. मंत्री महोदयांना सभेस सुचित केले तुर्त सदर विषय पुढील सभेत मंजुरी करीता ठेवणे योग्य राहिल असे ठरले.

सुचक : मा. श्री. प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक सदस्य.

अनुमोदक :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य.

**ठराव सर्वोनुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १४ : आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान/भरडधान्य खरेदी करतांना हमालीवर होणाऱ्या जादा खर्चाबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सादर करणेत येते की, आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या धानाकरीता केंद्र शासनाकडील इग्रजी पत्रक्र.१९२(२५)/२०१९-FC A/Cs(file no.३६९६९२) Date ४/१२/२०१८ अन्वये केंद्र शासनाने अनुषंगीक खर्च मंजुर केले आहेत. मंडी लेबर चार्जेस (Handling charges) या बाबीकरीता धानाकरीता रु.११.७५ इतका व No.१९३(२)/२०१९-FC A/Cs (३६९९८१) दिनांक ६/७/२०२० अन्वये भरडधान्याकरीता रु.१०.८१ इतका दर त्यामध्ये निश्चित केला आहे.

आदिवासी विकास महामंडळाचे सभासद असलेल्या आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मार्फत सदर योजना राबविली जाते. उप अभिकर्ता संस्थांना कमिशन रक्कम रु.३१.२५ अनुषंगीक खर्च मंजुर केले आहेत. खरेदी केंद्रावर धानाची आवक झाल्यानंतर सदर धान वजन काटयावर टाकणे, वजन झालेनंतर पोत्यांची शिलाई करणे, थप्पी लावणे, गोदामात मालसाठवणुक करणे इत्यादी कामासाठी हमालांना जवळपास कृषी उत्पन्न बाजार समितीने ठरवुन दिलेल्या दरानुसार व परिस्थिती नुसार त्यापेक्षा जास्त हमाली द्यावी लागते. अनुषंगीक खर्चात मंजुर असलेल्या रु.११.७५ या दरात हमाल काम करण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे जादा होणारा खर्च संस्था त्यांना मिळणाऱ्या कमिशन खर्चातुन भागवितात.

शेतकरी हमी भावापासुन वंचीत राहु नये याकरीता आदिवासी विकास महामंडळाचे खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आलेले भरडधान्य खरेदी करणेसाठी जादा होणारा हमाली खर्च प्रादेशिक कार्यालयांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या इतर योजनेतील निधीतुन उपयोगात आणलेला आहे.

पणन हंगाम २०२०-२१ मध्ये **८४** खरेदी केंद्र हे आदिवासी विकास महामंडळाकडुन चालविण्यात आलेत.सदर खरेदी केंद्रावर धान वजन **३१३७७९.८४** क्विं. व भरडधान्य वजन

Scanned with CamScanner

९१९०० क्विं. ची खरेदी केलेली आहे. महामंडळास प्रशासकीय खर्चासाठी हमी दराच्या फक्त १% अनुषंगीक खर्चात मंजुर केले आहेत. सदर खर्चातुन हमालीवर जादा होणारा खर्च करणे महामंडळास आर्थिक दृष्टया परवडणारे नाही. महामंडळाचे कार्यक्षेत्र हे आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच दुर्गम भागात असल्याने तेथे माथाडी कामगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे स्थानीक हमालांकडुन काम करुन घ्यावी लागतात. नियमीत काम नसल्याने त्यासाठी त्यांच्या मागणीनुसार हमाली रकमा अदा कराव्या लागतात.प्रा.का. नाशिक, धारणी, यवतमाळ व नंदुरबार अंतर्गत जादा हमाली दर अदा करणेत आले असुन अंदाजे रक्कम रु.१२/- लक्ष जादा हमालीसाठी द्यावे लागले आहेत.

त्यामुळे विशेष बाब म्हणुन आदिवासी विकास महामंडळामार्फत सुरु असणाऱ्या खरेदी केंद्राना कृषी उत्पन्न बाजार समितीने ठरवुन दिलेल्या दरानुसार अथवा प्रत्यक्ष खर्च होणारा मंडी लेबर चार्जेस मंजुर करावा याबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक १०/६/२०२० रोजी प्रस्ताव दिला आहे. परंतु त्याबाबत त्यांनी निर्णय दिलेला नाही.जादा झालेल्या हमाली खर्चाची प्रतिपुर्ती शासनाकडुन होईल याची शाश्वती नाही.

तरी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेतकरी हमी भावापासुन वंचीत राहु नये याकरीता जादा होणाऱ्या हमाली खर्चाकरीता उचित निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक १४ :** सर्वानुमते ठराव करण्यांत येतो की, शासनाने निश्चित केलेले हमाली दर रु. ११.७५ व संस्थाना रुपये ३१.२५ प्रति क्विं. संस्थांना कमिशन मंजुर असुन ती अदा केल्या जाते. मात्र महामंडळाकडून खरेदी होत असलेल्या खरेदी केंद्रावर शासन निर्णया नुसार मंजुर हमाली खर्च हा कमी असल्याने स्थानिक जिल्हयातील हमाली दरानुसार ती अदा करावी व त्याचा झालेला अतिरिक्त खर्चाची मागणी शासनाकडून करुन घ्यावी. असे मा.मंत्री महोदयांना सुचित केले.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य.
**अनुमोदक** :- मा. केवळराम तुळशीराम काळे, संचालक सदस्य.

**ठराव सर्मानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १५ : आधारभुत किंमत खरेदी योजना पणन हंगाम २०१९-२० मधील केंद्र शासनाचे मंजुर दराने संस्था कमिशन अदायगी बाबत.**

उपरोक्त विषयान्वये सादर करणेत येते की, आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०१९-२० करीता केंद्र शासनाने केंद्र शासनाचे पत्र क्र. No.१९२ (२५)/२०१९-FC A/Cs (E-file no.३६९६४२) दिनांक ४/५/२०२० अन्वये धान/तांदुळाकरीता व केंद्र शासनाचे पत्र क्र. No.१९३(२)/२०१९-FC A/Cs (३६९९८१) दिनांक ६/७/२०२० अन्वये भरडधान्याकरीता तात्पुरते अनुषंगीक खर्चाचे दर मंजुर केले आहेत.

केंद्र शासनाकडुन हंगाम २०१९-२० मध्ये धान खरेदीकरीता रु.३१.२५ इतके संस्था कमिशनचे दर मंजुर केले आहेत. यापुर्वी संचालक मंडळाचे पारित ठरावानुसार एकाधिकार खरेदी योजनेत खरेदी केल्या जाणाऱ्या धान्याकरीता संस्था कमिशनचे दर ठरविले जात होते. दिनांक २९/९/२०१६

Scanned with CamScanner

रोजीच्या संचालक मंडळ सभेत हंगाम २०१७-१८ पासुन रु.३०/- प्रति क्वि. संस्था कमिशन आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना अदा करणेबाबत ठराव पारित करणेत आला असुन त्यानुसार संस्था कमिशन निधीची मागणी करणे व अदा करणेबाबत परिपत्रक क्र. आविम/विप/संस्था ख.कमिशन/दर/२२८२/१६ दिनांक २८/१०/२०१६ अन्वये प्रादेशिक कार्यालयांना सुचना दिलेल्या आहेत. हंगाम २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये रु.३०/- प्रति क्वि. दराने संस्था कमिशन अदा केलेले आहे.

केंद्र शासनाकडुन रु.३१.२५ दर मंजुर केले आहेत. त्यामुळे सदरचे दर महामंडळाचे पारित ठरावतील मंजुर दरापेक्षा अधिक असल्याने व सदर दरानुसार शासनाकडुन खर्च प्राप्त होणार असल्याने सदर दरानुसार संस्था कमिशनची अदायगी हंगाम २०१९-२० मध्ये करणेत आली आहे.

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०१९-२० करीता केंद्र शासनाने भरडधान्याचे (ज्वारी, बाजरी, मका व नागली) तात्पुरते अनुषंगीक खर्चाचे दर मंजुर केले आहेत. यापुर्वी केंद्र शासनाकडुन संस्था कमिशनचे दर मंजुर केले जात नसल्याने अभिकर्ता संस्थांना एकुण खरेदी रकमेच्या २.५०% प्रशासकीय खर्च मंजुर केलेल्या खर्चातुन आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना १ ते १.५०% पर्यंत अभिकर्ता संस्थेने स्वेच्छेने देणे बाबत राज्य शासनाने निर्देश होते. परंतुपत्र क्र. No.१९३(२)/२०१९-FC A/Cs (३६९९८१) दिनांक ६/७/२०२०अन्वये केंद्र शासनाने प्रशासकीय खर्च मंजुर केलेला नसुन संस्था कमिशनचे दर मंजुर केले आहेत. तसेच रु.३०/- प्रमाणे संस्था कमिशन अदा करणेबाबत प्रादेशिक कार्यालयांना निर्देश दिलेले आहेत.

केंद्र शासनाने मंजुर केलेल्या अनुषंगीक खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र | खर्चाचा तपशिल | अनुषंगीक खर्च दर प्र.क्वि. | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **ज्वारी संकरीत** | **मका** | **बाजरी** | **नागली** |
| १ | संस्था कमिशन | १५.०० | ११.७५ | ११.७५ | १५.०० |

भरडधान्याची खरेदी जिल्हाधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या गोदामात केली जाते. किंवा खरेदी केलेले भरडधान्य जिल्हाधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या गोदामात त्वरीत जावक होतो किंवा १ ते २ महिन्यामध्ये वाहतुक करुन पोहोच केला जाते. त्यामुळे उप अभिकर्ता संस्थांची जबाबदारी ही खरेदी पासून जावक पर्यंत राहते.

हंगाम २०१८-१९ पर्यंत महामंडळाचे खरेदी केंद्रावर भरडधान्याची खरेदी केली असल्याने संस्था कमिशन अदा करण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. हंगाम २०१९-२० मध्ये नाशिक, गडचिरोली व गोंदिया जिल्हयात आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत भरडधान्याची खरेदी झालेली आहे. त्यामुळे उप अभिकर्ता संस्थांना कमिशन अदा करणे आवश्यक आहे.

सदरचे दर हे धानाचे मंजुर संस्था कमिशनचे दरापेक्षा कमी आहेत. तसेच प्रशासकीय खर्च शासनाकडुन मिळणार नसल्याने रु.३०/- प्रमाणे संस्था कमिशन अदा करणे शक्य होणार नाही. त्यामुळे केंद्र शासनाने वरीलप्रमाणे मंजुर केलेल्या दरानुसार भरडधान्याचे संस्था कमिशन अदा करणे आवश्यक आहे. हया बाबत मागिल हंगामामध्ये सदर कमिशन हे धानावरील खरेदीच्या कमिशन नुसार अदा करावे अशी चर्चा झाल्यानुसार

केंद्र शासनाचे मंजुर दराप्रमाणे आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये दिनांक ३१/३/२०२० अखेरचे वस्तुनिष्ठ लेखेत किमती घेणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक १५ :-** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो की, हंगाम २०१९-२० मध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रात ज्या आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थामार्फत भरडधान्याची खरेदी झालेली आहे अशा संस्थाना त्याचे कमिशन मागिल २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये दिलेल्या दरानुसार अदा करावे व चालु वर्षामध्ये प्राप्त मंजूर दरानुसार देय कमिश्न व अतिरिक्त देणे असलेल्या कमिशनची मागणीचा प्रस्ताव शासनास सादरा करावा असे सर्वनुमते मंजूर करणेत आले.

**सुचक** :- मा.श्री. विकास दुलाजी वळवी, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा.श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १६ : महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (M.I.D.C), प्रादेशिक कार्यालय, नागपुर यांचेकडुन प्राप्त देवरी, जि. गोंदिया येथील जागेवर गोदाम तसेच शितगृह बांधकाम बांधकाम करण्याबाबत.**

देवरी जि. गोंदिया येथे गोदाम बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (M.I.D.C), प्रादेशिक कार्यालय, नागपुर यांचेकडुन एम.आय.डी.सी. देवरी येथे १६३८४ स्क्वेअर मिटर उपलब्ध जागा प्राप्त झालेली आहे. सदर ठिकाणी गोदाम बांधकामासाठी मा.मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविणेत आलेले आहे.

महामंडळास देवरी जि. गोंदिया येथील गोदाम बांधकामास सन २०१२ व २०१५ मधील प्राप्त निधीतुन प्रत्यक्ष रुपये २२०.८३ लक्ष इतका निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच देवरी जि. गोंदिया येथे दुसरे गोदाम बांधकामासाठी शासनाने सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या रु. १०.०० कोटी निधीमधुन रु. ३.०० कोटी विनियोगास मान्यता दिलेली आहे. देवरी येथे गोदाम बांधकामासाठी महामंडळाकडे एकुण रु. ५२०.८३ कोटी इतका निधी शिल्लक आहे.

देवरी, जि. कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात मोहफुलाची खरेदी होते. सदर खरेदी झालेले मोहफुले तसेच इतर गौणवनउपज साठवणुकीसाठी महामंडळाकडे शितगृह (Cold Storage ) नाही. जर महामंडळाने स्वतः आपल्याच जागेवर शितगृह बांधकाम केले तर महामंडळाचे खरेदी केंद्रामार्फत खरेदी होणारे मोहफुले तसेच इतर गौणवनउपज यांचे योग्य रितीने जतन होऊन विक्रीअभावी असलेला माल खराब होणार नाही व त्याचा दर्जा टिकुन राहील. तसेच छत्तीसगड मधील रायपुर व त्या भागातील खाजगी संस्थांनी त्यांचेकडे खरेदी झालेला मोहफुले साठवणुकीसाठी जर मागणी झाल्यास शितगृहामधील काही भाग भाडेतत्वावर देखिल देता येईल. त्यामुळे महामंडळास भाड्यापोटी उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होईल.

देवरी येथे उपरोक्त प्रमाणे ३००० मे.टन क्षमतेचे २ गोदाम बांधकामासह केंद्र शासनाकडुन प्राप्त निधी रु. २.४० कोटी मधुन महामंडळाकडील गौणवनउपज साठवणुकीसाठी शितगृह बांधकाम करणेबाबत प्रस्तावित करण्यांत येत आहे.

Scanned with CamScanner

केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनान्वये केंद्रशासनाने सन २०१३-२०१४ पासुन आधारभुत दरावर आधारीत गौणवनोपज खरेदी योजना सुरु केली असुन (Mechanism for Marketing of Minor Forest Produce through Minimum Support Price & Development of Value chain for MFP ) योजनेखाली केंद्रशासन ७५% व राज्य शासन २५% आर्थिक सहभाग आहे. गौणवनोपज प्रत सुरक्षित रहावी याकरीता केंद्र शासनाने गौणवनउपज साठवणुकीसाठी शितगृह (Cold Storage) ६०० M.T. करीता रु. २.४० कोटी रुपये मंजुर केलेले आहे. सदरचा निधी मागील ६ वर्षापासुन अखर्चित दिसत आहे. त्यामुळे वरील प्रमाणे केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेल्या निधीमधुन देवरी येथे प्रस्तावित गोदामाचे शेजारी ६०० मे.टन क्षमतेचे शितगृह बांधकाम केल्यास त्याचा महामंडळास उपयोग करुन घेता येईल. तसेच आवश्यकता भासल्यास शितगृह बांधकामासाठी येणा-या संभाव्य खर्च MSP व MSP for MFP या योजनेत प्राप्त निधीतुन करता येईल.

यापुर्वी याबाबत संचालक मंडळ सभेत मंजुरी घेतलेली आहे. या ठिकाणी शासनाने आधुनिक तंत्रज्ञानावर (BMH) तत्वावर गोदाम बांधकाम करावयाचे शासनाने ठरविले होते. मात्र ही बाब संचालक मंडळाच्या नजरेस आल्यानंतर त्यांनी याचा विरोध केला आहे.

याबाबतीत संचालक संचालक मंडळाने योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे.

बांधकाम करणेसाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांच्याकडे काम द्यावे किंवा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे / नागपुर यांच्या देखरेखी खाली काम करुन घ्यावे यावरही निर्णय झाल्यास काम त्वरीत चालु करता येईल.

सदर विषयावर चर्चेत भाग घेतांना मा. उपाध्यक्ष यांनी सुचविले की, BMH धरतीवर गोदाम बांधण्याऐवजी पारंपारीक पध्दतीने गोदाम बांधकाम केल्यास त्याची भविष्यातील किरकोळ दुरुस्ती, डागडुजी करणे महामंडळास सोईस्कर होईल. तसेच गोदामाचे शेजारी महामंडळामार्फत शितगृह बांधकाम केल्यास महामंडळास त्याचा निश्चितच फायदा होईल.

तसेच सदर बांधकामासाठी आदिवासी विकास विभागाअंतर्गत असलेले बांधकाम कक्षाकडुन यापुर्वी दिलेली कामात खुपच दिरंगाई झाल्याने या पुढील करण्यांत याणा-या बांधकामांसाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन घेण्यास हरकत नसावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव क्रमांक १६ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, देवरी जि. गोंदिया येथे पारंपारीक पध्दतीचे गोदाम बांधकामाची प्रक्रीया तातडीने हाती घेण्यात यावी. तसेच सदर गोदामाशेजारी शितगृह व शबरी महामंडळाद्वारे राईस मिल बांधकामासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

त्याचप्रमाणे सदरची बांधकामे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांच्या मार्फत करण्यांत यावीत. सदर कामासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे अथवा सार्वजनिक बांधकाम ( आदिवासी ) मंडळ यांचे मार्फत करण्यात यावे. आवश्यकते प्रमाणे यासाठी शासनाकडे निधीची मागणी करावी. या बाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** : मा. श्री. भरतलाल थुकेलसिग दुधनाग, संचालक सदस्य

Scanned with CamScanner

अनुमोदक : मा. श्री. धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य
ठराव बहुमताने मंजुर

**विषय क्रमांक १७ : महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (M.I.D.C), प्रादेशिक कार्यालय, नागपुर यांचेकडुन अहेरी जि. गडचिरोली येथे प्राप्त झालेल्या जागेवर गोदाम व धान मिलींग मशिन बसविणेची प्रक्रिया हाती घेण्यास मान्यतेबाबत.**

मौजे अहेरी, जि. गडचिरोली येथे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (M.I.D.C) कार्यक्षेत्रात असलेल्या ६२०० स्के.मिटर जागा एम.आय.डी.सी. नागपूर यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळास यांना हस्तांतरीत करण्यांत आलेली आहे. अहेरी कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर धानाची आवक होत असते. दरवर्षी हे धान गोदामे पुरेशी नसल्याने उघड्यावर साठविले जाते. अहेरीच्या आजुबाजुस अहेरी, इंदाराम, आलापल्ली, बोरी, वेलगुर, पेरमिली, मन्नेराजाराम, ताडगांव इत्यादी प्रकारचे धान खरेदी केंद्रे आहेत. सरासरी एका वर्षात सुमारे १.७५ लक्ष क्विंटल धान खरेदी होत असते. या ठिकाणी गोदामाची नितांत आवश्यकता आहे. त्याठिकाणी सुमारे ३००० मे.टन किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेचे गोदाम बांधता येऊ शकेल.

तसेच अहेरी या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर महामंडळामार्फत धान खरेदी होत असल्याने व धानाची भरडाई ही उत्तर गडचिरोलीमध्ये वडसा भागात जास्त असल्याने व धानाची मिलींगचा स्थानिक पातळीवर मोठा प्रश्न निर्माण होतो. खाजगी मिलधारकांनी येथे कमी प्रमाणात गुंतवणुक केलेली आहे. अशा परिस्थितीत अहेरी प्रादेशिक कार्यालयाच्या जागेवर २.५ मे.टन प्रती तास धान मिलींग मशिन बसविण्याचे प्रस्तावित करीत आहे. या सर्व बाबींचा खर्च खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

१. गोदाम बांधकाम खर्च सुमारे रु. ६.०० कोटी
२. मिलींग मशिन खर्च सुमारे रु. २.०० कोटी

मिलींग मशिन बसविणेसाठीचा सविस्तर खर्च खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

| S. No. | Particulars | Amount (Rs. In Lakhs) |
|---|---|---|
| 1 | Land Development, Road & Compound | 15.00 |
| 2 | Civil Works | 77.20 |
| 3 | Plant & Machineries | 56.07 |
| 5 | Working Capital Margin Money | 50.00 |
| 6 | Preliminary & Preoperative Expenses | 02.00 |
| 7 | Contingency @2% | 01.27 |
| | Total Project Cost | 201.54 |

सदरचा खर्च शासनाकडुन करण्यासाठी खालील स्त्रोतातुन प्रस्तावित करण्यांत येत आहे.

Scanned with CamScanner

१) राज्य शासनाकडुन प्राप्त झालेल्या निधीतुन
२) केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेल्या MSP च्या अखर्चित निधीतुन

सदरहू खर्च करण्यासाठी या पुर्वी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ यांचेकडे देण्यात आले होते. अहेरी येथील स्थान निरिक्षण करणेसाठी व त्या ठिकाणी योजना प्रस्थापित करणेसाठी प्रोफेसर भालचंद्र बिराजदार, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना पाठविण्यात आले होते. त्यांनी याबाबतचे आराखडे तयार केले आहेत. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे हे अभियांत्रिकी महाविद्यालय राज्य शासनाची स्वायत्त संस्था असल्याने व त्यांचेकडे चांगल्या दर्जाचे प्लॅन करुन घेण्याची क्षमता असल्याने तसेच ती राज्य शासनाचेच अंग असल्याकारणाने त्यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन घेण्याबाबत प्रस्तावित करावे असे वाटते. आवश्यकता भासल्यास त्यांना याबाबतचे सादरीकरण करणेसाठी बोलाविता येईल. तरी ही बाब चर्चेसाठी व आदेशार्थ सविनय सादर.

सदर विषयावर चर्चेत भाग घेतांना मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी माहीती दिली की, महामंडळाचे ताब्यात असलेल्या अहेरी येथील जागावर पारंपारीक पध्दतीने गोदाम बांधकाम करण्यात येऊन सदर गोदामाचे शेजारी महामंडळामार्फत मिलिंग मशिन बसविल्यास धान वाहतुकीवर येणारा खर्चात बचत होईल.

सदरची जागा रस्त्यालगत असल्याने तेथे भविष्यात उप प्रादेशिक कार्यालय सुध्दा बांधकाम करता येऊ शकेल. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे हे अभियांत्रिकी महाविद्यालय राज्य शासनाची स्वायत्त संस्था असुन त्यांचेकडील प्रोफेसर भालचंद्र बिराजदार व टिम यांनी जागेची पाहणी केलेली असुन त्यांना सदर कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) घेण्यास हरकत नसावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव क्रमांक १७ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, अहेरी येथे पारंपारीक पध्दतीचे गोदाम बांधकामाची प्रक्रीया तातडीने हाती घेण्यात यावी. तसेच स्थानिक पातळीवर धान भरडाईचा मोठा प्रश्न असल्याने सदर गोदामाशेजारी शबरी महामंडळामार्फत मिलींग मशिन बसविणेसाठी ही सभा मंजुरी देत आहे.

त्याचप्रमाणे सदरची बांधकामे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांच्या मार्फत करण्यांत यावीत. सदर कामासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे अथवा सार्वजनिक बांधकाम ( आदिवासी ) मंडळ यांचे मार्फत करण्यात यावे. आवश्यकते प्रमाणे यासाठी शासनाकडे निधीची मागणी करावी. या बाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य
**अनुमोदक** :- मा. श्री. प्रकाश तुळशिराम दडमल, संचालक सदस्य

**ठराव बहुमताने मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक १८ : केळापूर, ता. पांढरकवडा, जि. यवतमाळ येथील दाल मिल, जळीत गोदाम तसेच खुल्या जागेचे वापराबाबत.**

म.रा.सह.आदिवासी महामंडळाचे केळापूर, ता. पांढरकवडा, जि. यवतमाळ येथे स्वत:चे मालकीची दालमील आहे. सदरची दाल मील अनेक वर्षापासुन कालबाह्य झाल्याने बंद असुन लगत असलेले गोदाम देखिल पडक्या अवस्थेत आहे. सदरचे जळीत गोदाम दुरुस्तीसाठी महामंडळास सन २०१४-१५ चे भागभांडवलातुन शासन निर्णय क्र. आविम-२०१५/ प्र.क्र.१७ /का.३. दि. ३१ मार्च, २०१५ अन्वये रुपये २५.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिलेला होता.

सदर गोदाम दुरुस्तीसाठी मुख्यालयाचे आदेश जा.क्र.४०८५ दि. २८ जानेवारी, २०१६ अन्वये (PMC) मे. देवरे धामणे आर्किटेक्ट्स, नाशिक यांनी अंदाजपत्रक घेऊन त्यास VNIT नागपुर यांचेकडुन मार्च, २०१६ मध्ये तांत्रिक मान्यता मिळवुन दिलेली होती. तथापी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक ( श्री. जगदाळे सो.) यांचे कार्यकाळात संपन्न संचालक मंडळ सभेत झालेल्या चर्चेमध्ये गोदाम दुरुस्तीसोबतच दालमिल देखिल पुर्ववत सुरु करणेबाबत तसेच भाड्याचे ठिकाणी कार्यरत असलेले कार्यालय पांढरकवडा यांचे ताब्यात असलेल्या ७ एकर जागेमध्ये कार्यालय बांधकामासाठी संचालक मंडळाने सुचना केल्या होत्या. महामंडळाचे मागणी प्रमाणे केळापूर येथे उप प्रादेशिक कार्यालय बांधकामासाठी शासनाने सन २०१५-१६ चे भागभांडवलापोटी महामंडळास वितरीत केलेल्या रुपये १०.०० कोटी मध्ये रुपये १३५.८५ लक्ष इतक्या रक्कमेचा समावेश आहे. मात्र सदरचा निधी खर्च करणेस शासनाकडुन अद्याप प्रशासकीय मान्यता अप्राप्त असुन सदरची रक्कम महामंडळाकडे अखर्चित दिसत आहे.

मौजे केळापूर येथे पडीत असलेले गोदाम, बंदावस्थेत असलेली दालमील तसेच मोकळी जागा यासाठी ग्रामपंचायतीचे विविध करांचा भरणा करणेसाठी महामंडळास नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

सदरची केळापूर येथील गोदाम व जागा हे रोड लगत असल्याने जळीत गोदाम दुरुस्ती तसेच दाळमील दुरुस्ती केल्यास महामंडळास उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होऊ शकते.

केळापूर जागेच्या लगत असलेले श्री. जगदंबा संस्थान, केळापूर संस्थेची जागा आहे. सदर संस्थेने सदरची जागा विकत देणेबाबत किंवा जागेच्या बदल्यात इतर ठिकाणी जागा देणेबाबत विनंती केलेली आहे. नमुद जागेवर सदर संस्थेस विकासात्मक व सार्वजनिक कामाकरीता मागणी केलेली असुन तेथे आदिवासी विद्यार्थ्यांना MPSC-UPSC परिक्षेकरीता कोचिंक क्लास चे स्टडी रुम (वाचन केंद्र), मेडीटेशन हॉल निर्माण करण्याचा मानस असल्याचे कळविले आहे.

श्री. जगदंबा संस्थान, केळापूर यांनी महामंडळास सादर केलेला प्रस्ताव मोघम स्वरुपाचा असून त्याबाबत या संस्थेकडुन अधिकची माहीती मागविण्यांत आलेली आहे. मात्र जर ही संस्था जागेच्या मोबदल्यात चांगल्या प्रकारची जागा, वॉल कंपाऊंड, गोडाऊन ऑफिस तसेच आपल्या जागेत अस्तित्वात असलेल्या इमारती एवढीच इमारतीचे बांधकाम करुन देत असल्यास याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

तरी याबाबत योग्य ते मार्गदर्शन मिळण्यास सादर.

Scanned with CamScanner

सदर विषयावर चर्चेत भाग घेतांना मा. श्री. पुरके सर, उपाध्यक्ष, यांनी निर्देश दिले की, केळापुर येथील महामंडळाची मोकळी जागा, जळीत गोदाम तसेच बंद असलेली दाळमिल याचे अंदाजपत्रक काढुन घ्यावे. यावर मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी माहिती दिली की, सदरच्या जागेची मी प्रत्यक्षात पाहणी केलेली असुन उप प्रादेशिक कार्यालय, पांढरकवडा यांना सदर जागेचे अंदाजपत्रक कार्यालयास सादर केलेले आहे.

त्यावर श्री. पुरके सर, उपाध्यक्ष, यांनी पुढे असे म्हटले की, श्री. जगदंबा संस्थान, केळापूर यांनी महामंडळास सादर केलेला प्रस्तावानुसार जर संस्था जागेच्या मोबदल्यात चांगल्या प्रकारची जागा, वॉल कंपाऊंड, गोडाऊन ऑफिस देत असेल तर त्या जागेची पाहणी करुन उपयोगिता व महामडंळास फायद्याची आहे का यांचेकरीता स्थानिक संचालक व महामंडळाचे अधिकारी यांची टिम घेऊन अहवाल तयार करावा. सदरचा अहवाल पुढील संचालक मंडळ सभेत मान्यतेसाठी सादर करावा.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव क्रमांक १८ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, श्री.जगदंबा संस्थान, केळापूर यांनी महामंडळास सादर केलेला प्रस्तावानुसार संस्था जागेच्या मोबदल्यात जी जागा, वॉल कंपाऊंड, गोडाऊन ऑफिस देत आहे. त्या जागेची पाहणी करणेसाठी स्थानिक संचालक व महामंडळाचे अधिकारी यांची टिम घेऊन संस्था देत असलेली जागा महामंडळास उपयुक्त आहे किंवा कसे या बाबत अहवाल तयार करणे साठी ही सभा मंजुरी देत असुन. या बाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी, संचालक सदस्य
**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक १९ : उप प्रादेशिक कार्यालय, धारणी कार्यालयाचे वाढीव इमारत/घरभाडेस अदायगी करणेस मान्यता मिळणे बाबत.**

प्रादेशिक कार्यालय, धारणी अंतर्गत असलेले उप प्रादेशिक कार्यालय, धारणी या कार्यालयाकरीता श्री.लाभसिंग इंदरसिंग रंधावा यांच्या मालकीची (१२९.३२ sqr.) क्षेत्रफळ असलेली इमारत सन २०१७ ते सन २०१८ पर्यंत रूपये ८५००/- (अक्षरी रूपये. आठ हजार पाचशे मात्र) प्रमाणे भाडेतत्वावर घेण्यात आलेली होती व त्या उप प्रादेशिक कार्यालय, धारणी यांनी सदर कालावधीचा करारनामा केलेला होता.

सन २०१८ मध्ये सदर इमारतीचा करारनामा संपुष्टात आल्याने सदर इमारतीचे मालक श्री. लाभसिंग इंदरसिंग रंधावा यांनी सन २०१९ पासुन सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपुर यांचे प्रमाणपत्रानुसार सदर इमारतीचे भाडे प्रतिमहा रूपये १६८००/- (अक्षरी रूपये. सोळा हजार आठशे मात्र) याप्रमाणे घरभाडे वाढीबाबत मागणी केली. उप प्रादेशिक व्यवस्थापक, धारणी यांनी इमारत मालक श्री. लाभसिंग इंदरसिंग रंधावा यांच्याशी दिनांक ३१/०१/२०१९ रोजी भाडे बाबत वाटाघाटी करून त्यामध्ये झालेल्या वाटाघाटीनुसार रूपये १३०००/- (अक्षरी रूपये. तेरा हजार मात्र) प्रतितहा

Scanned with CamScanner

भाडे निश्चित झालेले असुन याप्रमाणे वाढीव घरभाडे मिळणेस प्रादेशिक व्यवस्थापक, धारणी यांनी मुख्यालयास प्रस्ताव सादर केलेला होता.

महामंडळाचे पोटनियम/उपविधी क्र. २४ (ब) १ प्रामाणे दिलेल्या कार्यपध्दतीनुसार महामंडळाचे कारभार चालविण्याकरीता कोणतही इमारत किंवा जमीन विकत स्वःच्या मालकीची अगर भाडयाने घेणे, जमीन, इमारती, विकत, खरेदी अगर लिजवर अगर अक्वायर करून कोणा इसमाकडुन घेणे किंवा महाराष्ट्र राज्यात कोठेही इमारत उभी करून बांधुन आणि बांधकाम करून महामंडळाचे उपयोगासाठी दुकाने अगर गोदामे, ऑफिस किंवा कचेऱ्या किंवा राहण्याच्या जागा याबाबत अधिकार संचालक मंडळाला आहेत.

करीता उप प्रादेशिक कार्यालय, धारणी कार्यालयाच्या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपुर यांचे प्रमाणपत्रानुसार माहे एप्रिल, २०१९ ते माहे मार्च, २०२१ पर्यंत रूपये १३०००/- (अक्षरी रूपये तेरा हजार मात्र) प्रमाणे वाढीव घरभाडे अदायगी करणेस कार्योत्तर/प्रशासकीय मान्यता मिळणेस तथा पुढील निर्णय होणेस विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक १९ :** उप प्रादेशिक कार्यालय, धारणी कार्यालयाच्या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपुर यांचे प्रमाणपत्रानुसार माहे एप्रिल, २०१९ ते माहे मार्च, २०२१ पर्यंत रूपये १३०००/- (अक्षरी रूपये तेरा हजार मात्र) प्रमाणे वाढीव घरभाडे अदायगी करणेस कार्योत्तर/प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. केवळराम तुळशीराम काळे, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २० : महामंडळाच्या सादनिकांची दुरूस्ती करणेस व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.**

वरील विषयान्वये आदिवासी विकास महामंडळाच्या मालकीच्या सदनिका (फ्लॅट) खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | सोसायटीचे नाव | फ्लॅट क्रमांक | एकुण सदनिका | सद्यास्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | पुरणस्मृती को. ऑप हौसिंग सोसा. नरहर नगर, आंबेडकर नगर समोर, नाशिक | २३-१ | ०२ | वापरात |
| २. | सुगंधी कॉ. ऑप. हॉ. सोसा. लि. नरहर नगर, पुणे रोड, नाशिक | २३-३ | ०२ | रीक्त |
| ३. | सुवर्णप्रभा अपार्टमेंन्ट, टागोर नगर नरहर नगर, आंबेडकर नगर समोर, नाशिक | २७-२, | ०१ | रीक्त |
| ४. | रेणुकानगर सहकारी गृह निर्माण संस्था लि. वडाळा नाका, पुणे रोड, नाशिक | डि/३-१४,१५,१६ | ०३ | रीक्त |
| | **एकुण** | - | **०८** | |

वरील प्रमाणे अ.क्र. १ ते ३ मधील एकुण ५ सदनिकांची दुरूस्ती करणेसाठी दिनांक ०९ मार्च, २०१२ शासन निर्णयान्वये सन २०११-१२ च्य मंजुर भागभांडवल निधीमधुन रू. १५.०० (अक्षरी रूपये. पंधरा लक्ष मात्र) निधी उपलब्ध करून दिलेला आहे. परंतु या शासन निर्णयानुसार रेणुकानगर येथील सदनिकांची (फ्लॅटची) दुरूस्ती करीता निधी प्राप्त झालेला नाही.

तथापी महामंडळाचे संचालक महोदय हे मुख्य कार्यालय, नाशिक येथे वेळोवेळी सभेसाठी उपस्थित / दौऱ्यावर असतांना राहत असतात तसेच प्रादेशिक कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी हे सुध्दा कार्यालयीन कामकाजासाठी बैठकीसाठी वेळोवेळी मुख्य कार्यालयास उपस्थित राहतात. त्यामुळे त्यांची राहण्याची गैरसोय होऊ नये याकारणास्तव त्यांना राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणुन महामंडळाच्या सर्व एकुण ८ सदनिकांची दुरूस्ती करणे प्रस्तावित असल्याने दिनांक १५/०२/२०२० च्या पत्रानुसार अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेकडुन दुरूस्ती खर्चाचे अंदाजपत्रक मागविण्यात आलेले आहे. त्यानुसार दिनांक १२/०६/२०२० रोजी कार्यकारी अभियंता सा.बां. (आ.) विभाग, धुळे महामंडळाच्या सदनिकांची दुरुस्ती खर्चाचे अंदाजपत्रक या कार्यालयास सादर केलेले असुन दुरूस्ती खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | सोसायटीचे नाव | सदनिका (फ्लॅट) क्रमांक | दुरूस्ती खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रेणुकानगर सहकारी गृह निर्माण संस्था लि. वडाळा नाका, पुणे रोड, नाशिक | डि/३- १४ | रू. २,४८,०००/- |
| | | डि/३- १५,१६ | रू. ४,१२,०००/- |
| २. | पुरणस्मृती को. ऑप हौसिंग सोसा. नरहर नगर, आंबेडकर नगर समोर, नाशिक | २३-१ | रू. २,४३,०००/- |
| | | २३-३ | रू. २,४३,०००/- |
| ३. | सुगंधी कॉ. ऑप. हॉ. सोसा. लि. नरहर नगर, पुणे रोड, नाशिक | २७-२ | रू. २,९८,०००/- |
| | | २८-६ | रू. २,९८,०००/- |
| ४. | सुवर्णप्रभा अपार्टमेंन्ट, टागोर नगर नरहर नगर, आंबेडकर नगर समोर, नाशिक | १६-२ | रू. ३,२००००/- |
| | **एकुण** | **०८** | **रूपये २०,६२०००/-** |

उपरोक्त नुसार महामंडळाच्या मालकीच्या एकुण ८ सदनिकांची दुरूस्ती करणेसाठी कार्यकारी अभियंता सा.बां. (आ.) विभाग, धुळे यांचे अंदाजपत्रकानुसार एकुण लागणारा खर्च रक्कम रूपये २०,६२,०००/- (अक्षरी रूपये. वीस लाख बासष्ट हजार मात्र) मात्र दिलेला आहे.

तथापी महामंडळाचे पोटनियम/उपविधी क्र. २४ (ब) १ प्रामाणे दिलेल्या कार्यपध्दतीनुसार महामंडळाचे कारभार चालविण्याकरीता कोणतीही इमारत किंवा जमीन विकत स्वःच्या मालकीची अगर भाडयाने घेणे, जमीन, इमारती, विकत, खरेदी अगर लिजवर अगर अक्वायर करून कोणा इसमाकडुन घेणे किंवा महाराष्ट्र राज्यात कोठेही इमारत उभी करून बांधुन आणि बांधकाम करून महामंडळाचे उपयोगासाठी दुकाने अगर गोदामे, ऑफिस किंवा कचेऱ्या किंवा राहण्याच्या जागा, भाडे अदा करणे, फर्निचर व इतर आवश्यक गोष्टी बोर्डाला योग्य व सोयीची वाटेल, अशाप्रकारे अधिकार संचालक मंडळाला आहेत.

Scanned with CamScanner

तरी महामंडळाच्या मालकीच्या एकुण ८ सदनिकांची दुरूस्ती करणेकामी व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २० :** महामंडळाच्या मालकीच्या एकुण ८ सदनिकांची दुरूस्ती करणेकामी व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास अंदाजित रक्कम रूपये २०,६२,०००/- (अक्षरी रक्कम रुपये वीस लक्ष बासष्ट हजार मात्र) यास प्रशासकीय मान्यता सदर संचालक मंडळ सभा मान्यता देत आहे. पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य
**अनुमोदक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २१ : म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळामार्फत गडचिरोली जिल्हात ७ गोदामे बांधकामाबाबत सद्यस्थिती..**

मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडुन गडचिरोली जिल्हामध्ये गोदाम बांधकामासाठी ७ ठिकाणी जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सदर जागेचे सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर यांनी ७ गोदामे बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रक्रीया पुर्ण केलेली आहे.

निविदा क्रमांक ७३३३ जुलै, २०१९ मध्ये पुर्ण केलेली आहे. निविदेत ठेवलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४,८५,१८,७११/- च्या तुलनेत देकार ५.०६% कमी दराची असल्याने निविदा रक्कम २३,६३,६८,८६०.४३/- ची प्राप्त निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन स्विकृत करण्यांत आलेली आहे. निविदेनुसार ७ गोदामांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | गडचिरोली जिल्ह्यातील गोदाम बांधकाम करावयाचे प्रस्तावित केलेली ठिकाणे | तालुका | निविदेप्रमाणे किंमत (रुपये लाखात) | बांधकामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ५ |
| १ | सोनसरी | कुरखेडा | ३४५.०७ | पारंपारीक गोदाम बांधकाम प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. |
| २ | अरततोंडी (k) | कुरखेडा | ३४३.६७ | पारंपारीक गोदाम बांधकाम प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. |
| ३ | रेगडी | चार्मोशी | ३४६.६९ | पारंपारीक गोदाम बांधकाम प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. |
| ४ | सिरोंचा | सिरोंचा | ३१७.४१ | पारंपारीक गोदाम बांधकाम प्रक्रीया हाती घेण्यात आली आहे. |
| ५ | गेवर्धा | कुरखेडा | ३४४.१४ | BMH तत्वावर गोदाम बांधकामाचे डिझाईन मंजुरीसाठी VNIT नागपूर यांचेकडे सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी सादर केले आहे. |
| ६ | पोटगांव | देसाईगंज | ३४३.६७ | पर्यायी जागा अप्राप्त |
| ७ | झिंगानुर | सिरोंचा | ३२०.३३ | पर्यायी जागा अप्राप्त |
| | **एकुण** | | **२३६१.०१** | |

गडचिरोली जिल्ह्यातील ७ गोदामे बांधकामासाठी शासनाकडुन अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही.७ पैकी २ ठिकाणी जागा अप्राप्त असतांना सर्व ७ गोदामासाठी निविदा प्रसिध्द करुन निविदा स्विकृत केलेली आहे. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपुर यांनी ७ गोदामासाठी प्राप्त प्रशासकीय मान्यता किंमतीचे अधिन राहुन २५% रक्कम ( अंदाजित रु. ७५०.०० लक्ष ) निधी वर्ग करण्यास केलेल्या विनंतीनुसार आज अखेर रोजी रु.०७.५० कोटी इतका निधी महामंडळाकडे असलेल्या अखर्चित रक्कमेतुन अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत उपरोक्त तक्त्यामध्ये अ.क्र. १ ते ५ येथील गोदाम प्रक्रीया हाती घेण्यात आलेली आहे.

सदर विषयावर चर्चेत भाग घेतांना मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी माहिती दिली की, मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडुन महामंडळास प्राप्त झालेल्या जागेपैकी ४ ठिकाणी

Scanned with CamScanner

सार्वजनिक बांधकाम कक्ष (आदिवासी), चंद्रपूर यांचे मार्फत पारंपारीक पध्दतीचे व गेवर्धा या ठिकाणी BMH तत्वावर गोदाम बांधकामाची प्रक्रीया सुरु करण्यांत आलेली आहे. यावर मा.श्री.दुधनाग सो. संचालक यांनी गेवर्धा येथे BMH तत्वावर गोदाम बांधकाम करणेस आक्षेप नोंदवुन त्याऐवजी पारंपारीक पध्दतीचे गोदाम बांधकाम करणेबाबत सुचना मांडली.

पुढे मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी माहिती दिली की, खरेदीचे प्रमाण जास्त असलेल्या भागात गोदाम बांधकामासाठी १४ ठिकाणी शासकिय जागा मिळणेबाबत मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे पाठपुरावा सुरु असुन प्राप्त होणा-या जागेवर गोदाम बांधकामासाठी रुरल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड (RIDF) मधुन रुपये ५०.०० कोटी मिळणेबाबतची मागणी नोंदविण्यात आलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव क्रमांक २१ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, गडचिरोली जिल्ह्यात तसेच आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात ज्या ज्या भागात खरेदीचे प्रमाणे अधिक आहे मात्र साठवणुकीसाठी गोदामे नाहीत अशा भागात शासकीय जागा मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच ज्या जागा प्राप्त होत आहे तेथे गोदाम बांधकामासाठी शासनाकडुन निधीची मागणी करण्यांत यावी.

तसेच गेवर्धा, जि. गडचिरोली येथे BMH तत्वावर गोदाम बांधण्याऐवजी पारंपारीक पध्दतीचे गोदाम बांधकाम करुन घेण्यात यावे. याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

विषय क्रमांक २२ : नंदुरबार येथील महामंडळाची जागा हस्तांतरणाबाबत

म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाची मालकीची नंदुरबार शहरामध्ये भुमापन क्रमांक ५७१/ब/१/अ येथे ६७ आर इतकी जागा आहे. स्थित जागेवर या महामंडळाचे उप प्रादेशिक कार्यालय देखिल कार्यरत आहे.

सदरची जागा कार्यालयीन इमारत तसेच गोदाम बांधकाम करणेच्या उद्देशाने महामंडळाने घेतलेली होती. तथापी सदर जागेचा काही भाग स्थानिक रहिवासी यांचेकडुन निवासी बांधकाम करुन अतिक्रमण केलेले आहे. सदरची जागा रहिवासी हद्दीमध्ये असल्याने तेथे कार्यालयीन इमारत व गोदाम बांधकाम करणे शक्य होणार नाही.

सबब सदरची जागा नंदुरबार नगरपरिषद कार्यालयास हस्तांतरीत करुन त्या जागेच्या मोबदल्यांत आजच्या मुल्यांकनानुसार त्यांचे मार्फत नंदुरबार शहरात इतर ठिकाणी कार्यालयीन इमारत व गोदाम उभारणीसाठी जागा मिळाल्यास उपयुक्त होईल. सदरची कार्यवाही हाती घेणेबाबत तसेच संबंधीत कार्यालयास पाठपुरावा करणेकामी मा. व्यवस्थापकीय संचालक यांना प्राधिकृत करणेसाठी सदरचा विषय संचालक मंडळ सभेपुढे सादर करणेत येत आहे.

सदर विषयावर चर्चा करतांना मा. श्री. विकास वळवी, संचालक यांनी सूचना मांडली कि, सदरची जागा अत्यंत उपयुक्त असुन वेळेवर पाठपुरावा न झाल्याने तसेच सदर जागा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने तेथे अतिक्रमण देखिल वाढत आहे. त्यामुळे सदरची जागा नंदुरबार नगरपालिकेस हस्तांतर करुन त्या बदल्यात शासकीय कार्यालये असलेल्या भागात जागा नगरपालिके मार्फत मिळाल्यास महामंडळास खुप फायद्याचे होईल.

यावर मा. श्री. पुरके सो. उपाध्यक्ष, यांनी म्हटले की, महामंडळाची जागा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने त्यांचे आजचे मुल्यांकन जास्त होईल. त्यामुळे सदर जागेचे सक्षम प्राधिकरणाकडुन मुल्यांकन करुन घेऊन त्या किंमतीनुसारच नगरपालिकेकडुन पर्यायी जागा प्राप्त करुन घ्यावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव क्रमांक २२ :** सर्वानुमते ठराव संमत करण्यात येतो की, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाची मालकीची नंदुरबार शहरामध्ये भुमापन क्रमांक ५७१/ब/१/अ येथे ६७ ही जागा स्थानिक रहिवासी यांनी त्यांचे वैयक्तिक वापरासाठी अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे. त्यामुळे सदरची जागा नगरपालिका, नंदुरबार यांना हस्तांतरीत करून ज्या भागात शासकीय कार्यालये स्थित आहेत अशा ठिकाणी जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही हाती घेण्यात यावी. जागा हस्तांतरण करणेपुर्वी सदर जागेच आजचे मुल्यांकन करुन घेऊन त्या किमतीच्या प्रमाणात पर्यायी जागा उपलब्ध करुन घेण्याची दक्षता घ्यावी. याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, म.रा.सह. आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. मगन नुरा वळवी, संचालक सदस्य
**अनुमोदक** :- मा. विकास दुलाजी वळवी, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २३ :** महामंडळाचे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत विविध न्यायाधिकरणात यापुर्वी दाखल असलेल्या व सुरु असलेल्या केसेस चालविण्यासाठी तसेच, कोर्टकेसच्या अनुषंगाने माहे मार्च २०१९ नंतर खालीलप्रमाणे वकील फी व इतर अनुषांगीक झालेला एकुण खर्च रक्कम रु.३१,१२,०६१/- मात्र (अक्षरी रक्कम रु.एकतिस लाख बारा हजार एकसष्ट मात्र) इतक्या खर्चासाठी मान्यता मिळणेबाबत. तसेच, पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी अदाजे २५ लाख रुपयांची तरतुद करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये, महामंडळचे विविध प्रादेशिक कार्यालय स्तरावर विविध न्यायालयात महामंडळाविरोधात दावे दाखल केलेले आहेत. सदर दावे चालविणेसाठी वकील फी व त्याकरीता येणारे इतर अनुषांगिक खर्च यांसाठी आवश्यकतेनुसार (किंवा वकीलांच्या मागणीनुसार) हा प्रादेशिक कार्यालयांना निधी वर्ग करण्यात येतो.

मार्च - २०१९ पासुन अद्यापपावेतो न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने वकील फी, व इतर अनुषांगिक खर्च हा **एकुण रक्कम रु.-३१,१२,०६१/- (अक्षरी रक्कम रु.एकतीस लाख बारा हजार एकसष्ट मात्र)** झालेला आहे.

करीता महामंडळाचे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत विविध न्यायाधिकरणात दाखल असलेल्या केसेस चालविण्यासाठी उपरोक्त प्रमाणे वकील फी व इतर अनुषांगिक झालेला खर्चासाठी कार्योत्तर मंजुरी मिळावी, ही विनंती.

तसेच, पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी न्यायालयीन प्रकरणांसाठी अंदाजे **रक्कम रु. २५ लाख** रुपयांची तरतुद या कामासाठी ठेवावी, ही विनंती...

**ठराव क्रमांक २३ :** विविध न्यायाधिकरणात दाखल असलेल्या केसेस चालविण्यासाठी उपरोक्त प्रमाणे वकील फी व इतर अनुषांगिक झालेला सदर खर्च **एकुण रक्कम रु.-३१,१२,०६१/- (अक्षरी रक्कम रु.एकतीस लाख बारा हजार एकसष्ट मात्र)** आणि सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात होण्याऱ्या अंदाजित खर्च रक्कम रुपये २५/- लक्ष यास प्रशासकीय मान्यता सदर संचालक मंडळ सभा मान्यता देत आहे. पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री.धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २४ : मा. मंत्री, आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांचे अस्थापनेला शासकीय कामकाजासाठी महामंडळाने वर्ग करण्यात आलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती खर्चासाठी निधी वर्ग करणेस कार्योत्तर / प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

मा. मंत्री आदिवासी विकास विभाग तथा मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांचे अस्थापनेला शासकीय कामकाजासाठी महामंडळाने वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ इपी ००६ व वाहन क्र. एम एच १५ एए ९९९० वर्ग करण्यात आलेले असुन सदर वाहनाच्या इंधन/ऑईल खर्चासाठी मा. मंत्री, महोदय यांचे कार्यालयाकडुन निधी मागणी केला जात आहे. तरी सदर खर्चासाठी रूपये ३.०० (अक्षरी रूपये. तीन लाख मात्र) चा निधी मागणी दिनांक १०/११/२०२० च्या पत्रान्वये प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांनी केलेली आहे.

वित्त विभाग शासन निर्णय क्र. शासाउ-१०.१०/प्र.क्र.९६./१०सा.उ. मंत्रालय मुंबई दिनांक १३/०३/२०१२ मधील सोबतच्या जोडपत्र- १ नुसार मा. अध्यक्ष यांना उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल साठी प्रतिवर्ष अनुज्ञेय असलेला खर्च रूपये ७२,०००/- मात्र दिनांक २८/०२/२०२० रोजी प्रादेशिक कार्यालय, जव्हार यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

मा. अध्यक्ष मा. उपाध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तसेच यांचे खाजगी सचिव यांचे यांचेकरीता मंत्रालय, मुंबई येथे महामंडळाने वर्ग केलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती साठी लागणाऱ्या खर्चाचा निधी शासनाकडुन उपलब्ध होत नाही. तसेच सदर खर्च दिनांक १३/०३/२०१२ च्या शासन निर्णयाच्या तरतूदीपेक्षा जास्त होत असुन सदर खर्च महामंडळाला करावा लागत असल्याने याचा भुर्दंड महामंडळाला सहन करावा लागतो. याबाबत भारतीय लेखा तथा लेखापरिक्षण विभाग, नवी दिल्ली यांनी दिनांक ०९.०६.२०१७ नुसार त्यांच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये त्यांनी हा मुद्या उपस्थितीत केलेला आहे.

तथापी मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री आदिवासी विकास विभाग यांचे कामकाजासाठी महामंडळाने वर्ग करण्यात आलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती करीता माहे फेब्रुवारी, २०२० पासुन रूपये १३,९५,६५७/- मात्र रक्कमेचा निधी मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांच्या मान्यतेनुसार मुख्य कार्यालयाकडुन वर्ग / अदायगी करण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती (वाहन क्र. एम एच १५ इपी ००६ दुरूस्ती) खर्च भागविणेकरीता मागणी केलेला निधी प्रादेशिक कार्यालय, जव्हार यांना रूपये ३.०० मात्र वर्ग करणेस प्रशासकीय मंजुरी मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २४ :** मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री आदिवासी विकास विभाग यांचे कामकाजासाठी महामंडळाने वर्ग करण्यात आलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती करीता माहे फेब्रुवारी, २०२० पासुन ते आजपर्यंत झ ालेला खर्च रूपये १३,९५,६५७/- (अक्षरी रक्कम रुपये दहा लक्ष पंच्यान्नव हजार सहाशे सत्तावन्न मात्र) इतक्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत

Scanned with CamScanner

आहे. तसेच मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांच्याकडील वाहन क्र. एम एच १५ इपी ००६ दुरूस्ती करणेसाठी लागणारा अंदाजित खर्च रक्कम रूपये ३ लक्ष मात्र इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असुन पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, मुख्य कार्यालय, नाशिक यांना प्रदान करण्यात येत आहे.

सुचक :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

अनुमोदक :- मा. श्री. धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २५ : मा. मंत्री आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचेकरीता नविन इनोव्हा (INNOVA CRYSTA- PEARL WHITE) वाहन खरेदी करणेस झालेल्या खर्चास कार्योत्तर/प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

मा. मंत्री, आदिवासी विकास यांना पुरविण्यात आलेले वाहन अतिशय जुने झाले असुन वारंवार नादुरूस्त होत असते. मा. मंत्री महोदयांना शासकीय दौऱ्यानिमीत्त / कामकाजानिमित्त आदिवासी दुर्गम भागात जावे लागते त्यामुळे त्यांना नविन वाहन खरेदी करणे आवश्यक असल्याने मा. मंत्री, आदिवासी विकास यांच्या वापरासाठी इनोव्हा पर्ल व्हाईट (INNOVA CRYSTA-PEARL WHITE) हे वाहन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांनी रूपये २२,५१,०००/- (अक्षरी रूपये. बावीस लाख एक्कावन हजार फक्त) इतक्या रक्कमेस मधुबन टोयोटा, मुंबई यांच्याकडुन खरेदी करावे. वाहनाची किंमत वित्त विभागाने मान्यता दिलेल्या रूपये २०,००,०००/- पेक्षा रूपये २,५१,०००/- ने जास्त आहे.

त्यामुळे सदरचे वाहन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचेकडुन खरेदी करण्यात यावे. त्यांनतर विभागाच्या अर्थसंकल्पिय तरतुदीतुन रूपये २०,००,०००/- इतक्या खर्चाची प्रतिपुर्ती महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांना करण्यात येईल. आणि २०,००,०००/- पेक्षा जास्तीची रक्कम महामंडळाकडुन प्राप्त होणार असल्याने सदरचा खर्च महामंडळाने उचलावा असे दिनांक १३ ऑगस्ट, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देऊन निर्देश दिलेले आहेत.

दिनांक १३ ऑगस्ट, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार मा. मंत्री, आदिवासी विकास यांच्या वापरासाठी इनोव्हा पर्ल व्हाईट (INNOVA CRYSTA- PEARL WHITE) हे वाहन खरेदी करणेस व त्यासाठी येणारा खर्च रूपये २२,५१,०००/- (अक्षरी रूपये. बावीस लाख एक्कावन हजार मात्र) खर्चास मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांनी दिलेल्या मान्यतेनुसार सदर वाहन खरेदी करण्यात आलेले आहे.

मा.मंत्री महोदय, आदिवासी विकास यांच्या वापरासाठी नविन इनोव्हा पर्ल व्हाईट (INNOVA CRYSTA- PEARL WHITE) खरेदी करणेस झालेला खर्च रूपये २२,५१,०००/- (अक्षरी रूपये. बावीस लाख एक्कावन हजार मात्र) यास कार्योत्तर/प्रशासकीय मान्यता मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

Scanned with CamScanner

ठराव क्रमांक २५ : मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचे वापरा करिता नविन इनोव्हा पर्ल व्हाईट (INNOVA CRYSTA- PEARL WHITE) खरेदी करणेस झालेला खर्च रूपये २२,५१,०००/- (अक्षरी रूपये. बावीस लाख एक्कावन हजार मात्र) यास प्रशासकीय मान्यता सदर संचालक मंडळ सभा देत आहे.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. वसंत चि. पुरके, उपाध्यक्ष

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २६ : हिवाळी अधिवेशन - २०१९ चे व्यवस्थेवरील खर्चास प्रशासकीय/कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य शासनाचे विधीमंडळाचे हिवाळी आधिवेशन -२०१९ नागपुर येथे होते. नागपुर येथील हिवाळी अधिवेशन करीता मा. मंत्री आदिवासी विकास तथा अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ व मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास, तथा उपाध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तसेच महामंडळाचे विद्यामान संचालक सदस्य, तसेच मंत्रालयातील आदिवासी विकास विभागाचे इतर अधिकारी /कर्मचारी उपस्थितीत राहतात.

मा.मंत्री व राज्यमंत्री महोदयांचे कुटीर (निवास) कार्यालय व खाजगी भाडयाने घेतलेल्या निवासस्थानावरील बिछायती भाडयाने घेतलेल्या साहित्यावरील खर्च, भाडे तत्वावरील इलेक्ट्रॉनिक वस्तुवरील खर्च, स्टेशनरीवरील खर्च तसेच आदिवासी विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे निवास व भोजन खर्च, वाहन व्यवस्था इत्यादी व्यवस्था महामंडळामार्फत करण्यात येते.

त्यानुसार हिवाळी अधिवेशन - २०१९ कालावधीत मा. मंत्री, महोदय आदिवासी विकास तथा अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ, नाशिक व मा. राज्यमंत्री, महोदय आदिवासी विकास, तथा उपाध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ, नाशिक तसेच महामंडळाचे विद्यामान संचालक सदस्य, तसेच मंत्रालयातील आदिवासी विकास विभागाचे इतर अधिकारी /कर्मचारी यांचे व्यवस्थेकरीता विभागीय कार्यालय, नागपुर यांचेमार्फत एकुण रक्कम रूपये ९,९९,३४२/- (अक्षरी रूपये. नऊ लाख नव्यान्नव हजार तीनशे बेचाळीस मात्र) खर्च झालेला आहे.

हिवाळी अधिवेशन - २०१९ चे व्यवस्थेवरील खर्चाकरीता मुख्य कार्यालयाने प्रस्तावित केलेली रक्कम रूपये १०.०० (अक्षरी रूपये दहा लाख मात्र) निधी तुर्त अग्रीम स्वरूपात विभागीय कार्यालय, नागपुर यांना वर्ग करण्यात आलेला आहे.

करीता हिवाळी अधिवेशन - २०१९ चे व्यवस्थेवरील झालेला एकुण खर्च रक्कम रूपये ९,९९,३४२/- (अक्षरी रूपये नऊ लाख नव्यान्नव हजार तीनशे बेचाळीस मात्र) यास कार्योत्तर/प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव विषय सविनय सादर.

Scanned with CamScanner

**ठराव क्रमांक २६ :** हिवाळी अधिवेशन - २०१९ चे व्यवस्थेवरील झालेला एकुण खर्च रक्कम रूपये ९,९९,३४२/- (अक्षरी रूपये नऊ लाख नव्यान्नव हजार तीनशे बेचाळीस मात्र) यास प्रशासकीय मान्यता सदर संचालक मंडळ मान्यता देत आहे.

सुचक :- मा. श्री. विठ्ठल देवराम देशमुख, संचालक सदस्य

अनुमोदक :- मा. श्री. केवळराम तुळशीराम काळे, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २७ : आदिवासी विकास भवन इमारतीचे पाणी पुरवठयाच्या टाकीमध्ये जलपरी (इलेक्ट्रिक मोटार) बसविणेसाठी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

वरील विषयान्वे, आदिवासी विकास भवनामध्ये ०८ कार्यालये कार्यरत असुन या सर्व कार्यालयांना इमारतीचे मागील बाजुस असलेल्या (Underground) पाण्याच्या टाकीतुन इलेक्ट्रिक मोटारव्दारे इमारतीचे वरील टाकीत पाणी उचलुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सदर पाणी पुरवठयाची इलेक्ट्रिक मोटार बरीच जुनी झाल्याने वारंवार नादुरूस्त होत असल्याने इमारतीस सुरळीत पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होते.

सदरची इलेक्ट्रिक मोटार जुनी झाल्याने नविन मोटार बसविणे आवश्यक झालेले आहे. तरी महामंडळास्तरावरून इमारतीच्या पाणी पुरवठयासाठी पाण्याच्या टाकीत जलपरी बसवुन देणेबाबत मा. आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे पत्र क्र. रवका-२०१९/दुरूस्ती मोटार/प्र.क्र.१५/का.२ (४) दिनांक १३/११/२०१९ नुसार या कार्यालयास निर्देश दिलेले आहे.

त्यानुसार महामंडळाने नविन इलेक्ट्रिक मोटार (जलपरी) (Underground) पाण्याच्या टाकीमध्ये बसविणेत आलेली असुन त्याकरीता सर्व करांसह रूपये १६४९०/- (अक्षरी रूपये. सोळा हजार चारशे नव्वद मात्र) खर्च झालेला आहे. तरी सदर खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव तथा पुढील अवलोकनार्थ सविनय सादर.

**ठराव क्रमांक २७ :** महामंडळाने नविन इलेक्ट्रिक मोटार (जलपरी) (Underground) पाण्याच्या टाकीमध्ये बसविणेत आलेली असुन त्याकरीता सर्व करांसह रूपये १६४९०/- (अक्षरी रूपये सोळा हजार चारशे नव्वद मात्र) झालेल्या खर्चास सदर संचालक मंडळ सभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. विठ्ठल देवराम देशमुख, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

विषय क्रमांक २८ : सन २०१९-२०२० चा वार्षिक अहवाल छपाई करणेस, सन २०२०-२०२१ करीता कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेस व सन २०२१ ची दैनंदिनी (डायरी) छपाई व हंगाम २०२०-२०२१ करीता हुंडी पुस्तक छपाई करणेस प्रशासकीय/कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.

**अ. सन २०१९-२०२० चा वार्षिक अहवाल छपाई करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचा सन २०१९-२०२० चा ४७ वा वार्षिक अहवाल छपाई करावयाचा असुन छपाई केलेला वार्षिक अहवाल सहाकर कायद्यानुसार महामंडळाच्या संलग्न सभासद संस्थांना (आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था) वाटप करणे तसेच शासनास अहवाल पाठविणे बंधनकारक आहे.

तरी सन २०१९-२०२० या वर्षाचा ४७ वा वार्षिक अहवाल १०० नग उच्च प्रतिचे व १४०० नग साधारण दर्जाचे असे एकुण १५०० नग छपाई करून घेणेस व त्यासाठी होणारा अंदाजित खर्च रूपये ३,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यतेस सादर.

**ब. मुख्य कार्यालयासाठी सन २०२०-२०२१ करीता आवश्यक लागणारी कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव सादर.**

मुख्य कार्यालयातील तिन्ही विभागाकरीता (प्रशासन/वित्त/विपणन) सन २०२०-२०२१ मध्ये लागणारी स्टेशनरी खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदरची स्टेशनरी शासन निर्णयानुसार GeM पोर्टलवरून खरेदी करावयाची असुन याकरीता अंदाजे रक्कम रूपये ३,००,०००/- लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर स्टेशनरी खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यतेस सविनय सादर.

**क. सन २०२१ ची दैनंदिनी (डायरी), छपाई करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

महामंडळाची सन २०२१ ची दैनंदिनी छपाई करण्याचे प्रस्तावित असल्याने सदर दैनंदिनी छपाई करणेस अंदाजे खर्च रूपये ३,००,०००/- मात्र च्या जवळपास लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर दैनंदिनी छपाई करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यतेस सविनय सादर.

Scanned with CamScanner

ड. हंगाम २०२०-२०२१ करीता हुंडी पुस्तक छपाई करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

खरेदी हंगाम २०२०-२१ दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० पासुन सुरू झालेला असुन हंगाम २०२०-२०२१ करीता प्रादेशिक कार्यालय, नाशिक, भंडारा, जव्हार, यवतमाळ, चंद्रपुर, धारणी गडचिरोली, जुन्नर, नंदुरबार व अहेरी यानी हुंडी पुस्तकाची विपणन विभागाकडे मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाणे प्रादेशिक कार्यालयांना खरेदी करीता त्वरीत हुंडी पुस्तकांचा पुरवठा करावयाचा असल्यामुळे हुंडी पुस्तकांची त्वरीत छपाई करणेबाबत विपणन विभागाने कळविलेले आहे.

हुंडी पुस्तक हा महत्वाचा दस्त असुन आर्थिक व्यवहाराशी निगडित आहे. तसेच सर्व प्रादेशिक कार्यालयाचे हुंडी पुस्तक एकाच नमुन्यात छपाई करणे अपेक्षित आहे. सन २०२०-२०२१ ची हुंडी पुस्तक छपाई करणेस अंदाजे रूपये १,५०,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय मान्यतेस सविनय सादर.

**ठराव क्रमांक २८ :** सन २०१९-२०२० चा वार्षिक अहवाल छपाई, महामंडळाची सन २०२१ ची दैनंदिनी छपाई, प्रशासन, वित्त व विपणन विभागाकरीता सन २०२०-२०२१ मध्ये लागणारी स्टेशनरी व हंगाम २०२०-२१ करिता हुंडी पुस्तक करणेस व त्याकरीता येणाऱ्या एकत्रित अंदाजित खर्च रक्कम रुपये १०,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा लक्ष पन्नास हजार मात्र) इतक्या खर्चास सदर संचालक मंडळ सभा मान्यता देण्यात येत आहे व पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. प्रकाश तुळशीराम दडमल, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक २९ :** तत्का. मा. उपाध्यक्ष, व मा. उपाध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांचेकडे कार्यालयाचे वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ ई एक्स ४६४३ हे वर्ग करणेस व त्याकरीता झालेल्या खर्चास कार्योत्तर/प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

आदिवासी विकास महामंडळांचे तत्का. मा. उपाध्यक्ष, (मंत्री/राज्यमंत्री दर्जा प्राप्त) यांचे कार्यालयीन वापराकरीता महामंडळाने नविन वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ ई एक्स ४६४३ हे खरेदी करून विभागीय कार्यालय, नागपुर येथे वर्ग केलेले आहे.

आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : आविम-२०१५/प्र.क्र.१६१(भाग-१)/का.३ मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक २५ जुन, २०१९ नुसार महामंडळाच्या उपाध्यक्ष पदी श्री. उत्तमराव राघोजी इंगळे, यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. तत्का. मा. उपाध्यक्ष यांनी कार्यालयीन कामकाजासाठी/दौऱ्याकरीता चांगल्या स्थितीतील वाहन उपलब्ध करून देणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार कार्यालयाचे वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ ईएक्स ४६४३ हे मा. उपाध्यक्ष यांचेकडे वर्ग करणेबाबत पत्र क्र.२५५०/२०१९ दिनांक २६/०६/२०१९ नुसार महाव्यवस्थापक (गोंडवन), नागपुर यांना निर्देश देण्यात आलेले होते.

तरी तत्का. मा. उपाध्यक्ष यांना कार्यालयाचे (इनोव्हा) क्र. एम एच १५ ई एक्स ४६४३ हे वर्ग करणेस व दिनांक २८/०६/२०१९ पासनु ते दिनांक ३०/०१/२०२० पर्यंत इंधन/ऑईल/दुरूस्तीसाठी झालेला एकुण खर्च रूपये १,६४,९०५/- मात्र खर्चास कार्योत्तर/प्रशासकीय मंजुरी मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

तथापी आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : आविम-२०१५/ प्र.क्र.१६१(भाग-१)/का.३ मंत्रालय मुंबई- ४०० ०३२. दि. ०५ मार्च, २०२० नुसार महामंडळाच्या उपाध्यक्ष पदी प्रा. वसंत चि. पुरके, यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मा. उपाध्यक्ष यांनी वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ ईएक्स ४६४३ हे चांगल्या स्थितीत दुरूस्ती करून मुख्यालय यवतमाळ येथे पाठविण्यात यावे असे दिनांक ११/०३/२०२० रोजी महाव्यवस्थापक (गोंडवन) नागपुर यांना निर्देश दिलेले आहेत.

वित्त विभाग शासन निर्णय क्र. शाआउ-१०.१०/ प्र.क्र.९६/१०/सा.उ., दिनांक १३ मार्च, २०१२ नुसार राज्य सार्वजनिक उपक्रमाचे अंशकालीन व राज्यमंत्री/मंत्री दर्जा प्राप्त अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळाचे सदस्य यांना तसेच राज्य स्तरीय समिती/परिषद/आयोग यांचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहन सुविधा चालकासह उपलब्ध करून दिल्यास इंधन व तेलावरील खर्च प्रतिवर्ष रूपये ७२,०००/- पर्यन्त मर्यादित अनुज्ञेय आहे.

मा.उपाध्यक्ष यांना महामंडळाचे (इनोव्हा) क्र. एम एच १५ ई एक्स ४६४३ हे उपलब्ध करून देणेस त्यासाठी लागणाऱ्या इंधन/ऑईल/दुरूस्ती खर्चास मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदर वाहन मा. उपाध्यक्ष यांचेकडे वर्ग करण्यात आलेले आहे. सदर वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती खर्चासाठी दिनांक २२/०६/२०२० पासुन ते दिनांक ०७/१२/२०२० पर्यंत रूपये १,६४,१५९/- मात्र खर्च झालेला आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २७ :** तत्का. मा. उपाध्यक्ष यांना कार्यालयाचे (इनोव्हा) क्र. एम एच १५ ई एक्स ४६४३ हे वर्ग करणेस व दिनांक २८/०६/२०१९ पासनु ते दिनांक ३०/०१/२०२० पर्यंत इंधन/ऑईल/दुरूस्तीसाठी झालेला एकुण खर्च रूपये

Scanned with CamScanner

१,६४,९०५/- मात्र खर्चास कार्योत्तर/प्रशासकीय मंजुरी सदर संचालक मंडळ सभा देत आहे.

सद्यस्थितीतील विद्यमान मा. उपाध्यक्ष यांचेकडे वर्ग करण्यात आलेले आहे. सदर वाहनांचे इंधन/ऑईल/दुरूस्ती खर्चासाठी दिनांक २२/०६/२०२० पासुन ते दिनांक ०७/१२/२०२० पर्यंत झालेला खर्च रूपये १,६४,१५९/- मात्र यास संचालक मंडळ सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

अनुमोदक :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ३० : मा. मंत्री आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंत्रालयीन कार्यालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या स्टेशनरी व इतर साहित्याचे देयकास मंजुरी मिळणे बाबत.**

मा. मंत्री आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंत्रालय मुंबई येथील कार्यालयास लागणारी स्टेशनरी व इतर साहित्य मा. मंत्री महोदय यांचे स्वीय्य सहाय्यक यांनी मुंबई येथे स्थानिक पातळीवर वित्तीय नियमान्वये कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करून खरेदी केले असुन कार्यालयास पुरवठा करून त्याचे देयके उदायगी तथा प्रतिपुर्ती होणेसाठी महामंडळाकडे पाठविलेले आहे. **तपशिल पुढीलप्रमाणे :**

| अ. क्र. | पुरवठा धारकाचे नाव | पत्र क्र. व तारीख | बिल नंबर व तारीख | बिलाची एकुण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | मे. परम एन्टरप्रायजेस, मुंबई | ०२/०३/२०२० | ०४५/०२/०३/२०२० | रू २४,२७२/- |
| | | २५/०६/२०२० | ०५१/२५/०६/२०२० | रू ३६,९०६/- |
| | | २२/०९/२०२० | ०७४/२२/०९/२०२० | रू ३७,७०१/- |
| | | १०३३/०७/१२/२०२० | ००७७/०७/१२/२०२० | रू २,१२,८७२/- |
| | | १७५१/२९/१२/२०२० | ०७८/२८/१२/२०२० | रू ८८,५००/- |
| | | | ०८०/१३/०१/२०२१ | रू ४८,२९८/- |
| | | | **एकुणांत रक्कम -** | **रू ४,४८,५४९** |

सदर वस्तु सुस्थितीत मिळाल्याबाबत मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय यांचे स्वीय्य सहाय्यक यांनी सदर पत्रामध्ये नमुद केलेले आहे.

वरील तपशिलाप्रमाणे मा. मंत्री आदिवासी विकास तथा मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे मंत्रालय मुंबई येथील कार्यालयास लागणाऱ्या स्टेशनरी व इतर साहित्याची खरेदी करणेस एकुण झालेला खर्च रूपये ४,४८,५४९/- (अक्षरी रूपये. चार लाख आठेचाळीस हजार पाचशे एकोणपन्नास मात्र) खर्च झालेला असुन रूपये ६१,१७८/- मात्र मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांच्या मान्यतेनुसार अदायगी करण्यात आलेला आहे.

Scanned with CamScanner

करीता वरील प्रमाणे झालेला एकुण खर्च रूपये ४,४८,५४९/- (अक्षरी रूपये. चार लाख आटेचाळीस हजार पाचशे एकोणपन्नास मात्र) कार्योत्तर/प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक ३० :** मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक मंत्रालयीन कार्यालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या स्टेशनरी व इतर साहित्याचे देयकास रूपये ४,४८,५४९/- (अक्षरी रूपये. चार लाख आटेचाळीस हजार पाचशे एकोणपन्नास मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री.सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक ३१ : मा.अध्यक्ष, मा.संचालक सदस्य यांचेवर झालेल्या खर्चाबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहाकरी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक चे मा.अध्यक्ष, मा.संचालक सदस्य हे कार्यालयीन कामकाजासाठी नाशिक दौऱ्यावर आले असता त्यांची निवास, भोजन, चहापाणी इ. व्यवस्था प्रादेशिक कार्यालय, नाशिक या कार्यालयाकडुन केली गेली असल्याने झालेला एकुण खर्च रक्कम रुपये ११,७६,२१७.०० (अक्षरी रक्कम रुपये अकरा लक्ष शहात्तर हजार दोनशे सतरा मात्र) इतक्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस सविनय सादर. प्रादेशिक कार्यालय, भंडारा अंतर्गत मा.संचालक सदस्य यांचेवर झालेला खर्च रक्कम रुपये ६३,२१०/- (अक्षरी रक्कम रुपये त्रेसष्ट हजार दोनशे दहा मात्र) इतक्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस सविनय सादर.

तसेच केंद्र शासनाचे आदिवासी विकास विभागाचे सहसचिव Dr.Naval Jit Kapoor यांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर झालेला खर्च रक्कम रुपये १६,१४९.०० (अक्षरी रक्कम रुपये सोळा हजार एकशे एकोणचाळीस मात्र) इतक्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस सविनय सादर.

**ठराव क्रमांक ३१ :** मा.संचालक सदस्य आणि केंद्र शासनाचे आदिवासी विकास विभागाचे सहसचिव Dr.Naval Jit Kapoor यांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर झालेला खर्च यांचेवर झाले असे एकुण रक्कम रुपये १२,३९,३३७/- (अक्षरी रक्कम रुपये बारा लक्ष एकुण चाळीस हजार तीनशे सदोतीस मात्र) इतक्या खर्चास सदर संचालक मंडळ सभा मान्यता देत आहे आणि पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराम मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

विषय क्रमांक ३२ : सेवानिवृत्त अधिकारी / कमर्चारी यांचे विभागीय चौकशी, घट-तुट व न्यायालयीन प्रकरणी प्रलंबित असलेल्या उपदान, रजारोखिकरण व इतर आर्थिक लाभांची अदायगी करणेबाबत.

आदिवासी विकास महामंडळाचे आस्थापनेवर नियमित सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर सेवेत असताना व सेवानिवृत्तीनंतर त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही (महामंडळ व शासन स्तर) सुरु असल्यामुळे तसेच गोदामपाल व प्रतवारीकार या संवर्गातील कर्मचाऱ्यांची धानाबाबतची घट-तुट निश्चिती बाबत आदेश पारित न केल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांकडुन एकुण किती रक्कमेचा अपहार झालेला आहे याबाबत नियमानुसार वसुलीची कार्यवाही न केल्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणारे उपदान व रजा रोखिकरण तसेच इतर आर्थिक लाभांची अदायगी झालेली नाही.

आदिवासी विकास महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या एकाधिकार खरेदी योजना व आधारभुत किंमत खरेदी योजनामध्ये खरेदी करण्यात येणाऱ्या धानाची मोजणी वेळेत न झाल्यामुळे गोदामपाल व प्रतवारीकार या संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांबाबत घट-तुट निश्चित होवु शकली नाही. हंगाम संपल्याबरोबर धानाची उचल न झाल्यामुळे तसेच धानाची मोजमाप उशिराने झाल्याने अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ विलंबाने प्रदान केले जात आहेत.

उपदान प्रदान अधिनियम, १९७२ नुसार कोणत्याही सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे उपदान रोखुन ठेवता येत नाही. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास ३० दिवसाचे कालावधीत उपदानाची रक्कम अदायगी करणेबाबत तरतुद असुन त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

कर्मचाऱ्याने कार्यालयाचे आर्थिक नुकसान व अफरातफर केलेली असल्यास अशी रक्कम उपदानातुन राखुन ठेवता येते मात्र सेवानिवृत्त कर्मचारी यांचे उपदान रोखुन ठेवावयाच्या रक्कमेबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडुन संबंधित कर्मचारी व नियंत्रक प्राधिकारी अतिरीक्त आयुक्त लेबर यांना याबाबत लेखी स्वरुपात कळवावे लागते.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदींनुसार उपदान राखुन ठेवणेबाबत शासनास अधिकार आहेत. परंतु महामंडळास सदरचे सेवानियम लागु नसल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आर्थिक लाभांची अदायगी करणेकरीता अडचणी निर्माण होत असतात.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडुन मा.न्यायालयामध्ये दावे दाखल केले जातात त्यामुळे अशा प्रकरणी उपदान प्रदान अधिनियम, १९७२ मधील तरतुंदीनुसार कार्यवाही न केल्यामुळे सदरचे दाव्यांचा निर्णय मा. न्यायालयाकडुन संबंधित कर्मचाऱ्याचे बाजुने दिला जात असल्याने व मा. न्यायालयाचे निर्णयानुसार कार्यवाही करणे क्रमप्राप्त असल्याने परिणामी महामंडळाचे आर्थिक नुकसान होत असुन संबंधित कर्मचाऱ्यांना व्याजाची आकारणी नुसार रक्कम अदा करावी लागते.

तसेच कर्मचाऱ्यांकडुन महामंडळाची येणे- देणे रक्कम असल्यास अशी रक्कम निश्चित करुन वसुली बाबत दिवाणी दावा दाखल करावा लागेल.

मागील वर्षापर्यंतच्या एकाधिकार खरेदी योजना व आधारभुत किंमत खरेदी योजनामध्ये खरेदी करण्यात आलेल्या धानाची मोजणी करण्यात आलेली असुन गोदामपाल व प्रतवारीकार या संवर्गातील तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवरील घट-तुट निश्चित करणेची कार्यवाही सुरु आहे.

उपदान प्रदान अधिनियम, १९७२ नुसार कोणत्याही सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे उपदान रोखुन ठेवता येत नसल्याने या कार्यालयाचे आस्थापनेवरील सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे प्रलंबित

Scanned with CamScanner

उपदान प्रकरणांबाबतचा सविस्तर तपशिल निर्णयाकरीता दिनांक १४.०९.२०१८ व दिनांक १४.०९.२०१८ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळ सभेसमोर सादर करण्यात आलेला असुन याबाबत आगामी संचालक मंडळ सभेसमोर सदरचा विषय सादर करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा समावेश खालील तपशिलामध्ये करण्यात आलेला असुन त्यामधील मा. न्या. गायकवाड समितीच्या अहवालाचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे उपदान, रजारोखिकरण व इतर आर्थिक लाभांची अदायगी करणेकरीता शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.

उपरोक्त नमुद मुद्यांचे अनुषंगाने निर्णयास्तव सविनय सादर.

Scanned with CamScanner

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यरत ठिकाण | सेवानिवृत्ती दिनांक | वसुलपात्र रक्कम | उपदान व रजा मंजुरी रक्कम | विभागीय चौकशीची सद्यस्थिती | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.यु.एस.तोडसाम | प्रतवारीकार | जव्हार | राजीनामा २०.१२.२००८ | रुपये-२,९२,६००/- | उपदान रु- २,३५,२४०/- रजारोखिकरण प्रस्ताव अप्राप्त आहे. | विभागीय चौकशी नाही | श्री. तोडसाम यांचेवर घट-तुट बाबत महामंडळाकडील येणे-देणे रक्कम रुपये-२,९२,६००/- इतकी असुन वसुलीची कार्यवाही झालेली नाही. प्रस्तुत प्रकरणी प्रा.व्य., जव्हार यांचेकडुन अहवाल मागविण्यात आलेला आहे. |
| २ | श्री.सी.एस.जगताप | व्यवस्थापक | मु.का. नाशिक | २८.०२.२०११ | रुपये-१,०४,२९,००३/- | उपदान रु-१०,६२,०००/- रजारोखिकरण रु-५,३१,१००/- | विभागीय चौकशी पुर्ण झालेली असुन वसुली आदेश निर्गमित केले आहेत. | श्री. जगताप हे शबरी आदिवासी विकास महामंडळामध्ये कार्यरत असतांना गैरव्यवहार / अनियमितता केलेली असल्याने याबाबत विभागीय चौकशी अहवालाचे निष्कर्षानुसार एकुण रक्कम रुपये-१,०४,२९,००३/- वसुलीबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत. मात्र वसुलीची कार्यवाही झालेली नाही. |
| ३ | श्री.एम.एस.महाजन | लेखापाल | जव्हार | ३१.०७.२०११ | रुपये-७,५३,१६०/- | उपदान रु-५,७८,७४५/- रजारोखिकरण रु-१,११,१३८/- | विभागीय चौकशी नाही | महामंडळाचे अपहार केलेल्या रक्कम रु-७,५३,१६० चे वसुलीबाबत नोटीस दि.३१.०१.२०१८ रोजी बजावण्यात आलेली असुन सदर नोटीसचा खुलासा प्राप्त झालेला असुन श्री. महाजन यांनी रक्कम वसुली अमान्य असल्याचे कळविलेले असुन याबाबत विधीतज्ञ यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही सुरु करण्यात येत आहे. |
| ४ | श्री.जे.ए.नैताम | प्रतवारीकार | अहेरी | ३१.१२.२०१२ | निरंक | प्रस्ताव अप्राप्त आहे. | विभागीय चौकशी नाही | प्रा.का.चंद्रपुर यांचेकडुन सदर नस्ती गहाळ झालेली असल्याने प्रकरण प्रलंबित आहे. याबाबत प्रा.का.चंद्रपुर व उपप्राका, अहेरी यांचेकडुन प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यरत ठिकाण | सेवानिवृत्ती दिनांक | वसुलपात्र रक्कम | उपदान व रजा मंजुरी रक्कम | विभागीय चौकशीची सद्यस्थिती | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री.बी.एम.दाणी | उपप्रादे व्यव | भंडारा | ३०.०६.२०१४ | वसुली पात्र रक्कम अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. | उपदान रु-१०,२६,०००/- रजारोखिकरण रु-५,१३,०००/- | विभागीय चौकशी पुर्ण झालेली आहे. | नेरीयन राईस मिल, नेरी हंगाम २०१३-१४ मध्ये बँक गॅरंटी न घेता दिलेल्या धानाच्या वसुली संदर्भात विभागीय चौकशी पुर्ण झालेली असुन श्री. दाणी यांना खुलासा सादर करणेकरीता अंतिम नोटीस दिलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी FIR दाखल करण्यात आलेले आहे. |
| ६ | श्री.एस.यु.सलाम | प्रतवारीकार | गडचिरोली | ३१.०७.२०१४ | वसुली पात्र रक्कम अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. | प्रस्ताव अप्राप्त आहे. | विभागीय चौकशी पुर्ण झालेली आहे. | घट-तुट निश्चित करणेबाबत मुळ नस्ती विपणन विभागास सादर करण्यात आलेली असुन अभिप्राय अप्राप्त आहेत. |
| ७ | श्री.एम.टी.सिडाम | उपप्रादे व्यव | अहेरी | ३०.०६.२०१५ | वसुली पात्र रक्कम अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. | उपदान रु-११,९१,५२०/- रजारोखिकरण रु-५,९५,७६०/- | विभागीय चौकशी पुर्ण झालेली आहे. | बनावट बँक गॅरंटी प्रकरणी विभागीय चौकशी पुर्ण झालेली असुन श्री. सिडाम यांना खुलासा सादर करणेकरीता अंतिम नोटीस दिलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी FIR दाखल करण्यात आलेले आहे. |
| ८ | श्री.बी.टी.पवार | उपप्रादे व्यव | जव्हार | ३१.१०.२०१५ | वसुली पात्र रक्कम अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. | उपदान रु-१३,४८,७२०/- रजारोखिकरण रु-६,७४,३६०/- | विभागीय चौकशी पुर्ण झालेली आहे. | राजेश राईस मिल, किन्हवली यांचे बाबत २०१३-१४ मधील भरडाईबाबत तांदुळ जमा न करणेबाबत व कारवार गोदाम वेळेवर न सोडण्याबाबत विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात आलेली असुन चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार श्री.पवार यांना अंतिम खुलासा सादर करणेकरीता नोटीस बजावण्यात आलेली आहे तसेच त्यांचा खुलासा प्राप्त झालेला असुन त्यानुसार कार्यवाही करण्यात आहे. |
| ९ | सौ.टी.आर.दुबळा | टंकलिपीका | जव्हार | ३१.१०.२०१५ | निरंक | रु-६,५२,२००/- अर्जित रजा ह्या शिल्लक नाहीत. | विभागीय चौकशी नाही | एकुण ५६१ दिवस अनधिकृत गैरहजेरीबाबत प्रा.व्य. जव्हार यांचेकडुन प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. |

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यरत ठिकाण | सेवानिवृत्ती दिनांक | वसुलपात्र रक्कम | उपदान व रजा मंजुरी रक्कम | विभागीय चौकशीची सद्यस्थिती | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | श्रीमती. ए. आर. राजगोंड | शिपाई | जुन्नर | राजीनामा ३१.१२.२०१५ | निरंक | प्रस्ताव अप्राप्त आहे. | विभागीय चौकशी नाही | प्रा.व्य.जुन्नर यांना बिनपगारी रजा २७२८ दिवस कालावधीबाबत त्रुटींची पुर्तता करणेकरीता निर्देश देण्यात आलेले आहेत. |
| ११ | श्री.एच.डी.उईके | प्रतवारीकार | गडचिरोली | ३०.०६.२०१६ | वसुल पात्र रक्कम निश्चित केलेली नाही | प्रस्ताव अप्राप्त आहे. | विभागीय चौकशी पुर्ण झालेली आहे. | प्रा.व्य.गडचिरोली यांचेकडुन उपदान व रजा रोखिकरण प्रस्ताव अप्राप्त आहे. |
| १२ | श्री.एन.एस.मांदळे | महाव्यव | नाशिक | ३१.१२.२०१६ | वसुली पात्र रक्कमे बाबत विभागीय चौकशीचा आदेश पारित झालेला नाही. | उपदान रु-१७,८१,१००/- रजारोखिकरण रु-८,९०,५५०/- | विभागीय चौकशी पुर्ण झालेली आहे. | तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने उपदान रक्कम अदायगी करण्यात आलेली असुन रजारोखिकरण रक्कम ही प्रलंबित ठेवण्यात आलेली आहे.<br>मा. न्या. गायकवाड समितीच्या अहवालाचे अनुषंगाने श्री.एन.एस.मांदळे यांचेवर फोजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. नियमबाह्य अनुकंपा प्रकरणी चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आलेला असुन त्यानुसार आदेश निर्गमित होणे बाकी आहे. |
| १३ | श्री.ए.ए.आगळे | संस्था व्यव | जव्हार | ३१.१२.२०१६ | वसुल पात्र रक्कम निश्चित केलेली नाही | प्रस्ताव अप्राप्त आहे. | विभागीय चौकशी पुर्ण झालेली आहे. | नेरीयन गोदाम, नेरी ता. मोहाडी येथे साठवणुक केलेला एकुण १२.२४५ क्विंटल धान साठा अफारातफर प्रकरणी विभागीय चौकशीचो सुरु केलेली असुन चौकशी पुर्ण झालेली आहे. चौकशी अहवालातील निष्कर्षांनुसार अंतिम नोटीस बजावण्यात आलेली आहे. आलेला असुन सदरचा खुलासा अद्याप अप्राप्त आहे. |
| १४ | श्री.पी.आर.निकम | व.सहा | जव्हार | ३१.०७.२०१७ | रु-१३,९०,८६७/- | उपदान रु-७,९१,५००/- रजारोखिकरण रु-३,९५,७५०/- | आदेश पारित केलेले आहेत. | प्रा.व्य.जव्हार यांचेकडुन खुलासा मागविण्यात आलेला आहे. |

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यरत ठिकाण | सेवानिवृत्ती दिनांक | वसुलपात्र रक्कम | उपदान व रजा मंजुरी रक्कम | विभागीय चौकशीची सद्यस्थिती | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | श्री.बी.डी.पाटील | प्रतवारीकार | जव्हार | ३०.०९.२०१७ | रु-२,०४,८९,४४०/- | उपदान रु-७,२७,०४०/- रजारोखिकरण रु-३,४८,९८०/- | विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. | उपप्राका. शहापुर येथे कार्यरत असतांना स २०१०-११ ते २०१६-१७ मध्ये आधारभू योजनेअंतर्गत धान्यात घट आणणे, गैरव्यव करणे, डि ओ. नुसार पार्टीस माल न देणे इत्या प्रकरणी विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. |
| १६ | श्री.डी.एन. आहाके | वीजतंत्री | चंद्रपुर | ३०.०४.२०१८ | वसुली रक्कम अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. | उपदान रु-६,८७,१६०/- रजारोखिकरण रु-३,४३,५८०/- | विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. | मा. न्या. गायकवाड समितीच्या अहवाला अनुषंगाने श्री. आहाके यांचेवर फौजदारी गु दाखल करण्यात आलेले आहेत. त्यांचे उपदान रजा रोखिकरण अदायगी बाबत शासनाकडु मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. श्री.अहाके हे दिनांक २०.१२.२०२१ रोजी मयत ‍ाले आहेत. |
| १७ | श्री. ओ. एम. सुरपाम | कनिष्ठ सहाय्यक | भंडारा | ३१.०१.२०१९ | वसुली रक्कम अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. | उपदान रु-७,२६,०००/- रजारोखिकरण रु-३,६३,०००/- | विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. | विभागीय चौकशी प्रस्तावित असुन त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. |

**ठराव क्रमांक ३२ :** सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा समावेश तपशिलामध्ये नमुद केलेनुसार त्यामधील मा. न्या. गायकवाड समितीच्या अहवालात नमुद अपचारी / अधिकरी / कर्मचारी वगळता उर्वरित अधिकारी / कर्मचारी यांचे उपदान, रजारोखिकरण व इतर आर्थिक लाभांची अदायगी शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार व शासकीय नियमावलीनुसार करणेकरीता हरकत नाही. श्री.डी.एन.अहाके, विजतंत्री हे दिनांक २०.१२.२०२१ रोजी मयत झाले असल्याकारणाने नियमानुसार खाते चौकशी व प्रथम खबर अहवाल (FIR) वर कार्यवाही करावी तसेच त्यांचे महामंडळाकडील प्रलंबित असलेले उपदान, रजारोखीकरण व इर आर्थिक लाभांची अदायगी नियमानुसार करणेबाबत चर्चा करणेत येऊन यापुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. सौ.मिनाक्षीताई वट्टी, संचालिक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री.केवळराम तुळशीराम काळे, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

Scanned with CamScanner

**विषय क्रमांक ३३ : आदिवासी विकास महामंडळाचे आस्थापनेवरील पदे नामनिर्देशनाद्वारे भरणेकरीता मंजुरीबाबत..**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक यांचे आस्थापनेवरील विविध संवर्गातील सरळसेवेची ५६९ पदे व बाह्यस्रोताद्वारे टंकलिपीक संवर्गाची ८ व क्लिनर या संवर्गाची ७ पदे अशी एकुण ५८४ पदांची पदभरती करणेकरीता महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ शासन निर्णय आस्था-२०१२/ प्र.क्र.२५१/का-२५ दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१३ नुसार शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सरळसेवेने भरावयाच्या एकुण पदांपैकी ३६१ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन एकुण १४ संवर्गातील गुणवत्ता व कागदपत्रे पडताळणीनुसार पात्र ठरलेल्या एकुण २३० उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आलेले असुन सद्यस्थितीत एकुण १६६ उमेदवार कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ आणि शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडील पद भरतीबाबत / गैरव्यवहाराबाबत विभागीय आयुक्त यांच्या उच्चस्तरीय चौकशी समितीमार्फत केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिनांक १५.०५.२०२० चे शासन पत्रान्वये दिलेले असुन सदरची पदभरती प्रक्रिया रद्द करण्यात आलेली असुन शासन निर्देशांचे अनुसरून अन्य कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत मागील ३ वर्षामध्ये सरासरी एकुण ४० लक्ष क्विंटल धान खरेदी आदिवासी विकास महामंडळामार्फत करण्यात आलेली असुन दरवर्षी धान खरेदीच्या प्रमाणात वाढ होत आहे. धान खरेदी करीता विपणन निरीक्षक, प्रतवारीकार व गोदामपाल या संवर्गातील कर्मचारी यांची आवश्यकता असुन सदर संवर्गातील पदे रिक्त असल्यामुळे खरेदीच्या कामकाजामध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

विपणन निरीक्षक, प्रतवारीकार व गोदामपाल या संवर्गातील सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचारी यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | मंजुर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे | विपणन विभागाने मागणी केलेली पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | विपणन निरीक्षक | ७२ | ० | ७२ | ३५ |
| २ | प्रतवारीकार / गोदामपाल | ३१२ | १३५ | १४६ | ५० |
| | एकुण : | ३८४ | १३५ | २१८ | ८५ |

**विषय क्रमांक ४३: कार्यालयीन खाते चौकशी व मा. न्या. गायकवाड समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने सन २००४-०५ ते २००८-०९ या कालावधीतील तत्का. प्रादेशिक व्यवस्थापक/ उपप्रादेशिक व्यवस्थापक व तत्का. विजतंत्री यांच्या चौकशी करणे कामी नेमणुक केलेल्या ०४ कंत्राटी चौकशी अधिकारी व अजुन ०१ कंत्राटी चौकशी अधिकारी नेमणुक करणेस व त्यासाठी झालेल्या/येणाऱ्या खर्चास प्रशासकीय/ कार्योत्तर मान्यता मिळणे बावत.**

कार्यालयीन खाते चौकशी व मा. न्या. गायकवाड समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने सन २००४-०५ ते २००८-०९ या कालावधीतील तत्का. प्रादेशिक व्यवस्थापक/उपप्रादेशिक व्यवस्थापक व तत्का. विजतंत्री (एकुण. ३० ते ३५ अधिकारी/कर्मचारी यांच्या) यांच्या खाते चौकशी सुरु केलेल्या असून काही चौकशा लावणे बाकी आहे.

सदर अहवालाच्या व कार्यालयीच्या अनुषंगाणे चौकशी करणेकरीता महामंडळामध्ये खालीलप्रमाणे कंत्राटी पध्दतीने चौकशी अधिकाऱ्यांची (शासन निर्णयानुसार) अटी/शर्ती नुसार नेमणुका केलेल्या आहेत.

१) श्री. मधुकर गिरी, ( से.नि. शिक्षण अधिकारी )
२) श्री. र. स. भालेराव, ( से.नि. सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी )
३) श्री. सुभाष हरी दुसाने, ( से.नि. मुख्य प्रशासकीय अधिकारी )
४) श्री.भिमराव दगा नेरकर, (से.नि. अध्यक्ष जिल्हा ग्राहक मंच)

वरील चार अधिकारी कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणुन महामंडळावरती कार्यरत आहेत. परंतु यापैकी श्री. मधुकर गिरी ( से.नि. शिक्षण अधिकारी ) यांना वयाचे ७० वर्ष पुर्ण झालेले असल्यामुळे त्यांना यापुढे (शासन निर्णयानुसार ) चौकशीचे कामकाज देता येत नाही.

तसेच मा. न्या. गायकवाड समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने अजुन १५ अधिकारी/कर्मचारी यांच्या खाते चौकशी करावयाचे असल्याने उपरोक्त **०४** चौकशी अधिकारी व्यतिरीक्त अजून १ ते २ चौकशी अधिकारी (कंत्राटी) यांची आवश्यकता असुन त्यांचे मानधन अदायगी करणेकरीता अंदाजे **रूपये ६.०० लाख** (अक्षरी- रूपये **सहा लाख** मात्र) जवळपास खर्च अपेक्षित आहे.

१) श्री. मधुकर गिरी, ( से.नि. शिक्षण अधिकारी )
२) श्री. र. स. भालेराव, ( से.नि. सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी )
३) श्री. सुभाष हरी दुसाने, (से.नि. मुख्य प्रशासकीय अधिकारी )

Scanned with CamScanner

४) श्री.भिमराव दगा नेरकर, (से.नि. अध्यक्ष जिल्हा ग्राहक मंच)

उपरोक्त अधिकारी यांच्या नेमणुक केलेल्या व यांच्या व्यतिरीक्त अजून १ चौकशी अधिकारी यांना कंत्राटी चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करणेस व त्यांचे ( शासन निर्णयानुसार) मानधन अदायगी करणेकरीता झालेल्या / होणाऱ्या खर्चास प्रशासकीय/कार्योत्तर मान्यता मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक ४३ :** मा. न्या. गायकवाड समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने खाते चौकशी करणेकामी आजतागायत नियुक्ती केलेले ४ चौकशी अधिकारी यांना व आगामी नियुक्ती होण्याऱ्या चौकशी अधिकारी यांना नियुक्ती देणेस तथा त्यांचे शासन निर्णयानुसार मानधन अदा केलेल्या व यापुढील अदायगीस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

**अनुमोदक** :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

विषय क्रमांक ४४ : **हंगाम २०२०-२०२१ करीता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे आधारभुत किंमत खरेदी योजना धान व भरडधान मालाच्या हुंडया चालु खाते क्र.१०७६३/१, १०७६३/१२ व १०७६३/१३ वर वटविणे बाबत.**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मुख्य अभिकर्ता म्हणुन आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०००-२००१ पासुन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यास हंगाम २०२०-२०२१ मध्येही आधारभुत किंमत खरेदी योजना महामंडळास राबवावी लागणार आहे.

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कडुन हंगामात प्राप्त होणारा अग्रीम व खरेदी केलेल्या मालाचे साप्ताहीक विवरण (ज्या विवरणावर संबधित जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असते) सादर केल्यानंतर प्राप्त होणारी १००% खरेदी किंमत तसेच धान व भरडधान्यावरील अनुषंगिक खर्च तसेच धान व भरडधान्याची उर्वरीत किंमत सदर खात्यात भरणा केली जाते. यातुन हंगामात खरेदी केलेल्या धान व भरडधानाच्या हुंडया वटविण्यात येतात.

महामंडळाने खालील प्रमाणे हंगाम निहाय हुंडया वटविण्यासाठी खाते उघडेलेले आहे.

| अ.क्र. | हंगाम | खाते क्रमाक | शेरा |
|---|---|---|---|
| १. | २०००-०१ ते २०१४-१५ | १०७६३/०१ | |
| २. | २०१५-१६ | १०७६३/१२ | |
| ३. | २०१६-१७ | १०७६३/१३ | |

वरील खातेवर मागील वर्षी प्रमाणे यापुढेही बँक खाते चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळ मान्यतेस सादर तथा हंगाम २०२०-२०२१ (दि.०१/१०/२०२० ते दि.३१/०३/२०२१) व आर्थिक वर्ष २०२०-२१ (दि.०१/०४/२०२१ ते

Scanned with CamScanner

दि.३०/०९/२०२१) मधील आधारभुत किंमत खरेदी मालाच्या हुंडया खाते क्र.१०७६३/१३ वर वटविणेकरीता संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

**ठराव क्रमांक ४४ :** सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, हंगाम २०२०-२०२१ (दि.०१/१०/२०२० ते दि.३१/०३/२०२१) व आर्थिक वर्ष २०२०-२१ (दि.०१/०४/२०२१ ते दि.३०/०९/२०२१) मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेच्या हंगाम निहाय हुंडया वटविणेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे असलेल्या आधारभुत किंमत खरेदी योजनेचे खालील खात्यावर

| अ.क्र. | हंगाम | खाते क्रमाक |
|---|---|---|
| १. | २०००-०१ ते २०१४-१५ | १०७६३/०१ |
| २. | २०१५-१६ | १०७६३/१२ |
| ३. | २०१६-१७ | १०७६३/१३ |

उपरोक्त बँक खात्यावर व्यवहार करणेसाठी मागील वर्षी प्रमाणे यापुढेही बँक खाते चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास व हंगाम २०२०-२०२१ मधिल आधारभुत किंमत खरेदी योजनेच्या मालाच्या हुंडया खाते क्र.१०७६३/१३ वर वटविण्यास व यासंबंधीचे पुढील कार्यवाही करण्याचे तथा सदरचे खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापक (वित्त) यांना देण्यात येत आहे. करीता सदर सभा मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्री.केवलराम तुळशीराम काळे.
**अनुमोदक** :- मा.श्रीमती.मिनाक्षी अर्जुनराव वटटी.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ४५ : केंद्र शासनाच्या किमान आधारभुत गौणवनोपज खरेदी योजनाच्या (MSP MFP) हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/१४ वर वटविणे बाबत.**

भारत सरकार जनजाती कार्य मंत्रालय यांचे पत्र क्र.२/२१/२०१३-CP&R दि.२४.०३.२०१४ अन्वये गौणवनोपज आधारभुत किंमत (M.S.P.- Minimum Support Price) माध्यमातुन गौणवनोपज M.F.P. विपणन आणि मुल्य साखळी विकास यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन ७५% हिस्सापोटी रु.८,२५,००,०००/- व राज्य शासनाच्या २५% हिस्सापोटी रु. १,३३,८३,७५०/- असा एकुण निधी रु. ९,५८,८३,७५०/- महामंडळाला सन २०१४-१५ पर्यंत प्राप्त झाला आहे.

सदरची योजना अंमलबजावणीकरीता महामंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याने कर्जाद्वारे स्वतंत्र निधी उभारण्याची आवश्यकता नाही. हंगाम २०१९-२०२० मध्ये किमान आधारभुत गौणवनोपज खरेदी योजनाच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील स्वतंत्र चालु खाते क्रमांक २०६३२/१४ वर वटवण्यात आल्या आहेत.

Scanned with CamScanner

करीता आर्थिक वर्ष २०२०-२०२१ (दि.०१/१०/२०२० ते दि.३१/०३/२०२१) व आर्थिक वर्ष २०२१-२१ (दि.०१/०४/२०२१ ते दि.३०/०९/२०२१) मध्ये गौणवनोपज आधारभुत किंमत खरेदी योजनाच्या मालाच्या हुंडया महामंडळाकडील उपलब्ध निधीतुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., प्रादेशिक कार्यालय येथे स्वतंत्र चालु खाते क्र. २०६३२/१४ वर वर्टाविण्याचे मान्यतेस सादर व त्याखात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळावी.

तथापी सदर योजना राबविण्यासाठी इतर बँके कडुन कोणताही खर्च न घेता संगणक आज्ञावली (Software) खरेदी करीता तयार करुन दिले तर बँकेत नवीन खाते उघडुन नवीन खात्यावर हुंडया वटविण्याचे मान्यतेस सादर.

**ठराव क्रमांक ४५ :** सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, हंगाम २०२०-२०२१ (दि.०१/१०/२०२० ते दि.३१/०३/२०२१) व आर्थिक वर्ष २०२१-२०२१ (दि.०१/०४/२०२१ ते दि.३०/०९/२०२१) मध्ये गौणवनोपज आधारभुत किंमत खरेदी योजनाच्या मालाच्या हुंडया महामंडळाकडील उपलब्ध निधीतुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., प्रादेशिक कार्यालय येथे स्वतंत्र चालु खाते क्र. २०६३२/१४ वर वटविण्याचे मान्यतेस व त्याखात्यावर व्यवहार करण्यास मान्यता अधिकार व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापक (वित्त) यांना देण्यात येत आहे. करीता सदर सभा मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्री.धनराज हरीभाऊ महाले.

**अनुमोदक** :- मा.श्री.मगन नुरा वळवी.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

विषय क्रमांक ४६ : **महामंडळाचा गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदीच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/११ वर वटविणे बाबत.**

एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदी करीता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडे रु.२६/- कोटी एवढा निधी उपलब्ध आहे. हंगाम २०२०-२०२१ मधील एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत गौणवनोपज खरेदी करीता पुरेसा निधी उपलब्ध आहे.

हंगाम २०१९-२०२० मध्ये एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदी मालाच्या हुंडया महामंडळाकडील उपलब्ध निधीतुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील चालु खाते क्रमांक १०७६३/११ वर हंगाम २०१९-२०२० मध्ये खरेदी निरंक असल्याने हुंडया वटविण्यात आलेल्या नाही. सदर योजनेसाठी कर्जाद्वारे स्वतंत्र निधी उभारण्याची आवश्यकता भासलेली नाही. त्यामुळे कर्जावरील व्याजाची बचत झालेली आहे.

करीता हंगाम २०२०-२०२१ मध्ये खरेदी झाल्यास, आर्थिक वर्ष २०२०-२०२१ (दि.०१/१०/२०२० ते दि.३१/०३/२०२१) व आर्थिक वर्ष २०२०-२१ (दि.०१/०४/२०२१ ते दि.३०/०९/२०२१) मधील एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील चालु खाते क्र.१०७६३/११ यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

Scanned with CamScanner

तथापी सदर योजना राबविण्यासाठी इतर बँके कडुन कोणताही खर्च न घेता संगणक आज्ञावली (Software) खरेदी करीता तयार करुन दिले तर बँकेत नवीन खाते उघडुन नवीन खात्यावर हुंडया वटविण्याचे मान्यतेस सादर.

ठराव क्र.४६ :- सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, हंगाम २०२०-२०२१ मध्ये खरेदी झाल्यास, आर्थिक वर्ष २०२०-२०२१ (दि.०१/१०/२०२० ते दि.३१/०३/२०२१) व आर्थिक वर्ष २०२०-२१ (दि.०१/०४/२०२१ ते दि.३०/०९/२०२१) मधील एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील चालु खाते क्र.१०७६३/११ यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता, पुढील कार्यवाही करण्याचे तथा सदरचे खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापक (वित्त) यांना देण्यात येत आहे. करीता सदर सभा मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्री.विकाय दुलाजी वळवी.
**अनुमोदक** :- मा.श्रीमती. ताराबाई शंकर माळेकर.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ४७ : आधारभुत किंमत खरेदी योजनेचे हंगाम २०२०-२०२१ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र.००२७०५०१४८५५ व प्रादेशिक कार्यालयाचे खात्यावर हुंडया वटविणे बाबत.**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मुख्य अभिकर्ता म्हणुन आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०००-२००१ पासुन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

शासनाचे निर्देश प्राप्त झाल्याने हंगाम २०२०-२०२१ मध्येही आधारभुत किंमत खरेदी योजना महामंडळा मार्फत राबवीण्यात येत आहे.

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कडुन हंगामात प्राप्त होणारा अग्रीम व खरेदी केलेल्या मालाचे साप्ताहीक विवरण (ज्या विवरणावर संबधित जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असते) सादर केल्यानंतर प्राप्त होणारी १००% खरेदी किंमत तसेच धान व भरडधान्यावरील अनुषंगिक खर्च तसेच धान व भरडधान्याची उर्वरीत किंमत सदर खात्यात भरणा केली जाते. यातुन हंगामात खरेदी केलेल्या धान व भरडधानाच्या हुंडया वटविण्यात येतात.

मगील हंगाम २०१९-२०२० मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेमध्ये शेतकऱ्याची धान खरेदीची अदायगी शासन नियुक्त एन.ई.एम.एल.(NeML) यांचे संगणक अज्ञावली व्दारे Publice Finance Management System (PFMS) करण्यात आली आहे. यासाठी खालील प्रमाणे ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक येथे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयांचे खाते उघडण्यात आले व त्यावर व्यवहार करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | खाते क्रमाक |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय, नाशिक | ००२७०५०१४८५५ |
| २ | प्रादेशिक कार्यालय, नाशिक | ००२७०५०१४८६९ |
| ३ | प्रादेशिक कार्यालय, जव्हार | ००२७०५०१४८७४ |
| ४ | प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार | ००२७०५०१४८६८ |
| ५ | प्रादेशिक कार्यालय, धारणी | ००२७०५०१४८९३ |
| ६ | प्रादेशिक कार्यालय, भंडारा | ००२७०५०१४८६५ |
| ७ | प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली | ००२७०५०१४८६२ |
| ८ | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर | ००२७०५०१४८६४ |
| ९ | प्रादेशिक कार्यालय, जुन्नर | ०९५४०५००१६८८ |

हंगाम २०१९-२०२० मध्ये आधारभुत किमत खरेदी योजनेच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँके ऐवजी ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक मधुन वटविण्यात आल्या. हंगाम २०१९-२०२० मध्ये अंदाजे ४९,१८,४५३.३९ क्विंटल रक्कम रु.८९२,६९,९२,९०३.०० एवढया रक्कमेचा धान खरेदी करण्यात आला असुन त्यावरील हुंडी डिसकॉटींग चार्जस (बँक चार्जस) शेकडा ०.३५% प्रमाणे रक्कम रु.३,१२,४४,४७५.०० एवढया निधीची महामंडळाची बचत झाली आहे. मात्र NeML या संस्थेस शासनाच्या आदेशानुसार रक्कम र.४३,६७,९५३.०० मात्रची संगणक आज्ञावली वापर बाबत रक्कम अदा करण्यात आली आहे.

करीता हंगाम २०२०-२०२१ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेच्या खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक येथे मुख्य कार्यालय व सर्व प्रादेशिक कार्यालयांचे खाते येथील उपरोक्त तपशिला प्रमाणे चालु खाते यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

**ठराव क्रमांक ४७** : सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, हंगाम २०२०-२०२१ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेच्या खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक येथे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयांचे खालील खाते क्रमांक

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | खाते क्रमाक |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय, नाशिक | ००२७०५०१४८५५ |
| २ | प्रादेशिक कार्यालय, नाशिक | ००२७०५०१४८६९ |
| ३ | प्रादेशिक कार्यालय, जव्हार | ००२७०५०१४८७४ |
| ४ | प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार | ००२७०५०१४८६८ |
| ५ | प्रादेशिक कार्यालय, धारणी | ००२७०५०१४८९३ |
| ६ | प्रादेशिक कार्यालय, भंडारा | ००२७०५०१४८६५ |
| ७ | प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली | ००२७०५०१४८६२ |
| ८ | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर | ००२७०५०१४८६४ |
| ९ | प्रादेशिक कार्यालय, जुन्नर | ०९५४०५००१६८८ |

आधारभुत किंमत खरेदी योजनेच्या खरेदीच्या हुंडया उपरोक्त खात्यावर व्यवहार करणेसाठी व त्यावर हुंडया वटविण्यास यासंबंधीचे पुढील कार्यवाही करण्याचे तथा सदरचे खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय

Scanned with CamScanner

संचालक व महाव्यवस्थापक (वित्त) यांना देण्यात येत आहे. करीता सदर सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.सुनिल चंद्रकांत भुसारा.
अनुमोदक :- मा.श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ४८ : केंद्र शासनाच्या किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) बाजार हस्तक्षेप तुर खरेदी योजना हंगाम २०२०-२०२१ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र.००२७०५०१४५२५ खात्यावर हुंडया वटविणे बाबत.**

हंगाम २०१८-२०१९ मध्ये केंद्र शासनाचे किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) बाजार हस्तक्षेप तुर खरेदी करण्यात आली होती. सदर खरेदीच्या हुंडया ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र. 002705014525 खात्यावर हुंडया वटविण्यात आल्या होत्या. हंगाम 2019-2020 मध्ये शासनाचे निर्देश प्राप्त नसल्याने नाफेड तुर खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर खातेवर व्यवहार नाही.

हंगाम २०२०-२०२१ मध्ये केंद्र शासनाने महामंडळास मुख्य अभिकर्ता म्हणुन नेमणुक करण्यात आल्यास खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक खाते क्र. ००२७०५०१४५२५ खात्यावर हुंडया वटविणे, चालु खाते यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

**ठराव क्रमांक ४८ :** सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, सन २०२०-२०२१ मध्ये केंद्र शासनाच्या किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक येथे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयांचे खाते येथील येथे असलेल्या केंद्र शासनाने महामंडळास मुख्य अभिकर्ता म्हणुन नेमणुक करण्यात आल्यास खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक खाते क्र. 002705014525 खात्यावर हुंडया वटविणे, चालु खाते यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापक (वित्त) यांना देण्यात येत आहे. करीता सदर सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.धनराज हरीभाऊ महाले.
अनुमोदक :- मा.श्रीमती. मिनाक्षी अर्जुनराव वटटी.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**आयत्या वेळचा विषय क्रमांक ०१ : सन २०१८-२०१९ चे संवैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन स्विकृत करणे बाबत.**

केंद्र शासनाने केलेल्या ९७ व्या घटनादुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड. एम नुसार व राज्य शासनाचे अध्यादेश दि.१४/०२/२०१३ अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणानुसार महामंडळाचे सहकार कायद्यान्वये बंधनकारक असलेले संवैधानिक लेखापरिक्षण सहकार आयुक्त यांच्या नामतालिकेवरील "अ" सुचित समाविष्ट असणारे सनदी लेखापाल ए. एस. के.

वाय. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे यांची सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.१४.०९.२०१८ च्या संचालक मंडळ सभा सदर मंजुर ठराव क्र.३२, दि.२८.०९.२०१८ संचालक मंडळ सभा मंजुर ठराव क्र.०१ व दि.२९.०९.२०१८ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव क्र.०३ पारीत करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा यांच्या मान्यतेने व मुख्य कार्यालयाचे आदेश क्र.आविम/लेखा-२/ लेखापरिक्षण /४३९० / २०१८ नाशिक दि.२३.१०.२०१८ अन्वये ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे यांची नेमणुक करण्यात आली होती.

ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे यांचे दि.२४/१०/२०१८ चे पत्रानुसार दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण केले आहे व त्याचे लेखापरीक्षण अहवाल मुख्य कार्यालास दि.२०/१०/२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

सन २०१८-२०१९ सदर वर्षात महामंडळास "ब" वर्ग मिळाला आहे. प्राप्त लेखापरिक्षण अहवालाच्या गोषवाऱ्यातील मुद्यास मान्यता मिळावी. लेखापरीक्षण अहवाल स्विकृत झाल्या नंतर विहीत "ओ" नमुण्यात तीन महीन्याचे आत त्याचा दोष दुरुस्ती अहवाल संचालक मंडळा समोर सादर करण्यात येईल. करीता मान्यतेस सादर.

**ठराव क्रमांक ०१ :** सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, सन २०१८-२०१९ चे संवैधानिक लेखापरीक्षण ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, पुणे यांचेकडुन लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अहवालातील अनियमितता व आक्षेप / हरकती बाबत प्रशासनाने नियम संगत कार्यवाही करावी याबाबीस अधिन राहुन लेखापरीक्षण अहवाल स्विकृत करण्यात येत आहे.

त्याचा दोषदुरुस्ती अहवाल विहित "ओ" नमुन्यात व विहित कालावधीत पुर्ण करुन संचालक मंडळाच्या मान्यतेने सादर करावा यावा. करीता सदर सभा मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री.अशोक भाऊराव मंगाम.

**अनुमोदक** :- मा.श्री.भरत थुकेलसिंग दुधनाग.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**आयत्या वेळेचा विषय २ : उप प्रादेशिक कार्यालय, मोखाडा कार्यालयास नविन इमारत भाडे तत्वावर घेणेस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

उप प्रादेशिक कार्यालय, मोखाडा कार्यालयासाठी श्री. जे डी पाटील, यांच्या मालकीची इमारत भाडे तत्वावर घेण्यात आलेली होती. श्री. पाटील यांनी त्यांचे वयक्तिक कारणास्तव सदर इमारत खाली करणेबाबत उप प्रादेशिक व्यवस्थापक प्रादेशिक कार्यालय, मोखाडा यांना कळविलेले होते.

उप प्रादेशिक व्यवस्थापक, मोखाडा यांनी सदर कार्यालयासाठी श्री. रघुवीर धोंडु डिंगोरे, रा. मोखाडा यांच्या मालकीची मुख्य बाजारपेठेतील इमारतीचा शोध घेऊन त्याचे बांधकाम विभागाच्या प्रमाणपत्रानुसार निश्चित केलेले भाडे प्रतिमहा रूपये १२,०००/- मात्र यामध्ये इमारत मालकाशी वाटाघाटी करून प्रतिमहा रूपये १०,०००/- मात्र प्रमाणे भाडे तत्वावर देणेस इमारत मालकाने संमती दर्शविलेली आहे. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, मोखाडा कार्यालयास वरील प्रमाणे नविन इमारत भाडे तत्वावर घेणेस प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, जव्हार यांनी मुख्यालयास प्रस्ताव सादर केलेला होता.

महामंडळाचे पोटनियम/उपविधी क्र. २४ (ब) १ प्रामाणे दिलेल्या कार्यपध्दतीनुसार महामंडळाचे कारभार चालविण्याकरीता कोणतही इमारत किंवा जमीन विकत स्वःच्या मालकीची अगर भाडयाने घेणे, जमीन, इमारती, विकत, खरेदी अगर लिजवर अगर अक्वायर करून कोणा इसमाकडुन घेणे किंवा महाराष्ट्र राज्यात कोठेही इमारत उभी करून बांधुन आणि बांधकाम करून महामंडळाचे उपयोगासाठी दुकाने अगर गोदामे, ऑफिस किंवा कचेऱ्या किंवा राहण्याच्या जागा याबाबत अधिकार संचालक मंडळाला आहेत.

उप प्रादेशिक कार्यालय, मोखाडा कार्यालयासाठी श्री. रघुवीर धोंडु डिंगोरे, रा. मोखाडा यांच्या मालकीची इमारत भाडे तत्वावर घेणेस प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांनी वाटाघाटी करून प्रस्तावित केलेले भाडे प्रतिमहा रूपये १०,०००/- मात्र यास प्रशासकीय मान्यता मिळणेस पुढील निर्णय होणेस विषय सविनय सादर.

**आयत्या वेळेचा ठराव क्रमांक २ :** उप प्रादेशिक कार्यालय, मोखाडा कार्यालयासाठी श्री. रघुवीर धोंडु डिंगोरे, रा.मोखाडा यांच्या मालकीची इमारत भाडे तत्वावर घेणेस वाटाघाटी करून प्रस्तावित केलेले भाडे प्रतिमहा रूपये १०,०००/-

Scanned with CamScanner

माञ यास प्रशासकीय मान्यता सदर संचालक मंडळ सभा देत आहे. पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहे.

सुचक :- मा. श्री.सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

अनुमोदक :- मा. श्री.मिनाक्षी अर्जुनराव वट्टी, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**आयत्या वेळेचा विषय ३ : मा. मंत्री, आदिवासी विकास यांचेकरीता नविन इनोव्हा (INNOVA CRYSTA- PEARL WHITE) वाहनाचे इंधन खर्च उपलब्ध करून देणेस प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

शासन निर्णय क्र. आदिवासी विकास विभाग क्र. वाहन-२०२०/प्र.क्र.३४/का.१, दिनांक १३/०८/२०२० अन्वये मा. मंत्री, आदिवासी विकास यांच्या कार्यालयीन वापरासाठी वाहन खरेदीस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार CRYSTA2.4ZX (7 STR) PC (MANUAL) BS6, 2020 (DIESEL) PEARL WHITE हे वाहन खरेदी करण्यात आले असुन सदर वाहनाकरीता मा. मंत्री (आ.वि) यांचे खाजगी सचिव यांनी इंधन खर्चाची मागणी केली आहे.

सद्यास्थितीत विभागाकडे वाहनावरील इंधनाकरीता फक्त सचिव व सह सचिव यांच्या वाहनाकरीता इंधन, देखभाल व दुरूस्ती खर्च केला जात असुन त्यासाठी निधीची तरतुद करण्याज आली आहे. मा. मंत्री, आदिवासी विकास यांच्या करीता खरेदी करण्यात आलेल्या वाहनाकरीता आर्थिक वर्षात तरतुद करण्यात आलेली नाही. याबाबत आगामी अधिवेशन पुरवणी मागणीव्दारे तरतुद करण्याबाबातची कार्यवाही करण्यात येत आहे.

तथापी सध्या मा. मंत्री, आदिवासी विकास यांच्या वापरातील नविन वाहनाकरीता इंधनाचा खर्च उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने सद्यास्थितीत याबाबतचा खर्च महामंडळाने उपलब्ध करून द्यावा असे मा. सह सचिव, आदिवासी विकास महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ०५/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास निर्देश दिलेले आहे.

करीता उपरोक्त विषयाचे अवलोकन होऊन मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे वाहनाकरीता इंधन खर्च उपलब्ध करून देणेस प्रशासकीय मंजुरी मिळणेस तथा पुढील निर्णयास्तव विषय सविनय सादर.

Scanned with CamScanner

आयत्या वेळेचा ठराव क्रमांक ३ : मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे वाहनाकरीता इंधन खर्च उपलब्ध करुन दिलेला व पुढील (कालावधीकरिता) होणारा इंधन खर्च महामंडळामार्फत उपलब्ध करुन देणेस प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य

अनुमोदक :- मा. श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक सदस्य

ठराव सर्वानुमते मंजुर

**आयत्यावेळचा विषय क्रमांक ०४ : पणन हंगाम २०२०-२१ मध्ये आधारभुत किंमतखरेदी योजनेत येत असलेल्या अडचणी लक्षात घेता अन्न, नागरी पुरवठा विभागाकडुन याबाबत महामंडळाचे नुकसानकमीकरणेच्या दृष्टीने उपाययोजना करणेबाबत. अथवा आदिवासी विकास महामंडळाकडुन योजना पुर्णतः काढुन टाकणेबाबतचा प्रस्ताव. :-**

पणन हंगाम २०१९-२० मध्ये आधारभुत किंमतखरेदी योजनेअंतर्गतसुमारे ४९.०० लक्ष क्वि.धानाचीखरेदीकरण्यात आलेली आहे.सदर धान खरेदीकरतांना आदिवासी विकास महामंडळाची कुठलेही दोष नसतांना अस्तित्वात असलेल्या कार्यप्रणालीमुळे मोटयाप्रमाणावर आर्थिक फटका बसल्याचे दिसुन येते.त्याची कारणमिमांसा व आढावा मा.संचालक मंडळासमोर खालीलप्रमाणे मांडण्यात येत आहे.

१. <u>आदिवासी विकास महामंडळाकडे भरडाई न झालेले सुमारे २.५० लक्ष क्वि. धान पडुन असल्याबाबत व काही प्रमाणात धान खराब झाल्याबाबत.</u>

आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील गडचिरोली जिल्हयातील अतिदुर्गम भागात धान खरेदी करावे लागते व हे धान भरडाई झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांचे गोदामामध्ये साठविले होते. मात्र अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडुन या तांदुळाला गडचिरोली जिल्हया व्यतीरिक्त इतर जिल्हे न जोडल्यामुळे तांदुळाची वेळीच उचल झाली नाही.शासकीय गोदाम तांदुळाने पुर्ण भरलेले असल्याकारणाने पुढील मिलींग थांबली.बरेच महिने बिना मिलिंगचे धान राहील्याने व पावसाळा चालु झाल्यान खरेदी केंद्रावरील खुल्या जागेवर साठविलेले धान पावसाने भिजुन नुकसान झाले.प्राथमिक अंदाजानुसार रु.३०/- कोटी पेक्षा जास्त नुकसान या कारणास्तव आदिवासी विकास महामंडळास झाल्याचे दिसते. याबाबत या कार्यालयानेच नव्हे तर जिल्हाधिकारीकार्यालय, गडचिरोली यांच्याकडुनही १२ पेक्षा जास्त स्मरणपत्र देण्यात येवुन सुध्दा त्यावर कार्यवाही न झाल्याने अशा प्रकारचे नुकसान झाले हे ही एक महत्वाचे कारण वरिल उल्लेख केल्या प्रमाणे आहे. अशा प्रकारचे नुकसान पुन्हा होवु नये याबाबत अन्न, नागरी पुरवठा विभागास अवगत करुन देणे अत्यंत आवश्यक आहे.

२. <u>आदिवासी विकास महामंडळास रोजंदारीकर्मचाऱ्यांच्या मजुरीपोटी येत असलेला खर्च.</u>

साधारणतः प्रत्येकहंगामामध्ये आदिवासी विकास महामंडळास ३२० रोजंदारीचेकर्मचारी दैनिकभृतीवर घ्यावे लागतात. त्यासाठी रु.४.५० कोटी पेक्षा जास्त रक्कमत्यांचे मजुरीपोटी अदा करावी लागते.ही योजना चालविण्यासाठी दैनिकभृतीवरील

Scanned with CamScanner

कर्मचारी घ्यावेच लागतात मात्र त्यांचे मजुरीवर होणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती शासनस्तरावरुन होत नाही.त्यामुळेहा खर्च महामंडळास स्वतःच्या निधीतुन भागवावा लागतो.

३. <u>बारदाना पोटी झालेले नुकसान</u>

अ) एकदा वापरलेल्या बारदाना खरेदीच्या धोरणापोटीसुमारे ५.५० कोटीते रु.१०/- कोटीचा फटका महामंडळास बसत असल्याचे निदर्शनास येत आहे. धानासोबत शेतकऱ्यांनी दिलेल्या बारदानासाठी (५० कि.ग्रॅ. क्षमतेचा) महामंडळाचे मा.संचालकांनी प्रति नग रु.२०/- देण्याचे ठरविले आहे. व त्यापोटी राज्यशासनाच्या म्हणन्यानुसार केंद्रशासनाकडुन प्रत्येक बारदानापोटी रु.६.३३ येवढाच निधी प्राप्त होतो.राज्य शासन प्रति नग बारदाना इतकीच रक्कम देणार असल्याने उर्वरीत खर्च महामंडळास करावा लागणार आहे.हंगाम २०२०-२१ मध्ये देखिल सदर दर लागु असल्याने यात प्रति बारदाना रु.३.५० पासुन रु.१३/- पर्यंतचा फटका शेतकऱ्यांचा बारदाना काही भागात खरेदी केल्यामुळे हंगाम २०१९-२० व २०२०-२१ मध्ये बसल्याचे निदर्शनास येते.

ब) शेतकऱ्यांच्या बारदाना प्रमाणेच पुरवठादारांकडुन घेतलेल्या बारदानास मागील वर्षीरु.२३.६४ प्रती नग दिलीगेली असल्या कारणाने व या व्यवहारापोटी राज्य शासनाकडुन कुठलीही प्रतिपुर्ती न मिळाल्याने प्रति बारदाना रु. ६.५० ते रु.१६.५० इतका फटका महामंडळास बसण्याचा अंदाज बारदानापोटी होण्याचे निदर्शनास येते.हंगाम २०२०-२१ साठी ई-निविदेमध्ये प्रति नग रु.२६.७२ ते रु.३४.२५ पर्यंत दर प्राप्त झालेले आहेत.त्याची मंजुरी अद्याप वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयाकडुन मिळालेली नाही. जर मंजुरीविना हे बारदाने घेतलेतर शासनाकडुनत्याची प्रतिपुर्ती होणार नाही. त्यामुळे महामंडळास अजुनही नुकसान सोसावे लागते.

४. <u>आधारभुत किंमतखरेदी योजना राबवितांना नाशिक, ठाणे, पालघर व रायगड या जिल्हयात भरडाईसाठी येत असलेल्या अडचणीबाबत.</u>

वर उल्लेख केलेल्या जिल्हयांमध्ये हंगामाच्या सुरवातीपासुनच राईस मिलर्स मिळत नसल्यामुळे व काही भागात मिलर्स मिळुनसुध्दा इतर कारणास्तव ते महामंडळाची भरडाई करण्यास उशीर करीत असल्या कारणामुळे धान भरडाई होण्यास विलंब होतो. त्यामुळे गोदामाचे भाडेही वाढते व धानात येणारीतुट देखिल वाढते. अशा प्रकारची वर्षानुवर्षे चालणारी अडचण लक्षात घेवुन धान भरडाईच्या सुरवातीपासुनच इतर जिल्हयांना भरडाईसाठी या जिल्हयांचे धान इतर जिल्हयातील मिलर्सला भरडाईसाठी देण्यास होणाऱ्या विलंबामुळे महामंडळाचे नुकसान होते. व वाजवीपेक्षा जास्त ताण महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर पडतो.तरी याबाबत हंगामाच्या सुरवातीपासुनच जिल्हयाबाहेरील मिलर्सकडुन भरडाई करण्यास महामंडळाला परवानगी मिळणे अपेक्षित आहे.

५. <u>हंगाम २०१९-२० मध्ये महामंडळास मिळणारे अपेक्षित कमिशन</u>

सुमारे रु.८.५० कोटी इतकी कमिशनपोटी रक्कम या हंगामातील धान खरेदीसाठी महामंडळास मिळणे अपेक्षित आहे.व वरील मुद्दयांमध्ये उल्लेख केलेल्या बाबी लक्षात घेता रु.३५/- ते रु. ५५/-कोटीच्या आसपास महामंडळास निव्वळ नुकसान होण्याचे अनुमान आहे.इतक्या मोटया प्रमाणावर होत असलेले नुकसान महामंडळास मानवणारे नाही त्यामुळे या नुकसानीबाबत अन्न, नागरी पुरवठा विभागास व मा. मुख्य सचिव, यांच समोर या बाबीची मांडणी करुन होणाऱ्या नुकसानीची प्रतिपुर्ती करुन घेणे अथवा ही योजना यापुढे

Scanned with CamScanner

महामंडळा मार्फत न राबविणे अशा प्रकारच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी योग्यते निर्देश मिळणेसाठी विषय मा. संचालक मंडळा समोर ठेवण्यात येत आहे.

**आयत्या वेळेचा ठराव क्रमांक ०४** :- वरील विषयाबाबत मा. संचालक सदस्यांनी चर्चा करुन सदर विषय हा गहण अभ्यासपूर्वक सादर करणे आवश्यक वाटते, तसेच महामंडळाकडे नफयाच्या योजना कशा येतील, याबाबत शासनस्तरावर आपल्या अडचणी मांडून योग्य निर्णय घेणे उचित राहिल करीता सदर विषय हा मा.मंत्री महोदयांशी चर्चा करुन निकाली काढावा या करीता हा विषय आगामी सभेत ठेवणेस मंजूरी देणेत येत आहे.

**सुचक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. अशोक भारुराव मंगाम, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक ०५ : महामंडळाच्या अंतर्गत असलेल्या गोदामाला पेस्टकट्रोल करणेबाबत.**

सध्या महामंडळा मार्फत धान/भरडधान्य व इतर धान्य एकाधिकार/आधारभूत किंमतखरेदी योजने अंतर्गत खरेदीहोत आहे. महामंडळाचेगोदामे व खरेदीकेंद्र हे दुर्गम भागात आहे. त्यामुळे मालाची वेळीच उचल होत नसल्यानेगोदामात मोठयाप्रमाणात धानाची/मालाची साठवणूक केली जाते.धान/माल खराब होवू नये म्हणून परिणामी महामंडळाचे नुकसान होवू नये म्हणून धान्याचे गोदामांना पेस्ट कंट्रोलींग व धुरीकरणकरणे आवश्यक बाब आहे.

यापुर्वी महामंडळाचेगोदामातील धान/माल खराब होवू नये म्हणून सर्व प्रकारचे धान्यांना पेस्टकंट्रोल किंवा धुरीकरणाचे काम हे वखार महामंडळाकडून करून घेतले जात आहे. वखार महामंडळ हे शासनाचे असल्यान त्यांचेकडून कामकरून घेतांना कोणतीही अडचण अथवा लेखापरिक्षणात आक्षेप घेतला जात नाही.

SKY Pest Controls, Nshik यांनी सदर कामकरणे बाबत कार्यालयास अर्ज सादरकेलेला आहे. सदर संस्था ही खाजगी धान्य पेस्टकंट्रोल व धुरीकरण करणारी संस्था आहे. तत्पुर्वी सदर संस्थेकडून गोदामे पेस्टकंट्रोल करून घ्यावे किंवा कसे याबाबत उचित निर्णयास्तव सादर.

एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०१३-१४ ते २०१९-२० हंगामातील खरेदी झालेल्या अन्न धान्य, कडधान्य दिनांक ३१/०३/२०२० अखेर प्रादेशिक कार्यालय निहाय एकुण५२,६९७.९२ क्विं. रक्कम रूपये बीईपी दर १२.७८ कोटी मालसाठा शिल्लक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे. मात्र हा माल सध्या मोठया प्रमाणात खराब झाला आहे.त्यामुळे खराब मालास पेस्टकंट्रोल करून वाचवीण्या पेक्षात्याची विल्हेवाट लावणे अधिक सोईचे होईल. तरी जर पेस्टकंट्रोल वापरावयास लागेलतर निविदे द्वारे अत्यावश्यक ठिकाणी खरेदी केली जाईल. तरी मंजुरीससादर

Scanned with CamScanner

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालयचे नाव | गोदाम संख्या | शिल्लक माल वजन (क्विं.) | मालाची BEP प्रमाणेकिंमत रुपयेकोटीत | प्रति गोदाम खर्च रक्कम रु. | पेस्टकंट्रोलकरीता येणारा अपेक्षीत खर्च रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ३२ | ३०,१३९.६२ | ९.२० | १४०००/- | ४,४८,०००.०० | |
| २ | जव्हार | ९४ | २२०३८.८५ | ३.४८ | | १३,१६,०००.०० | |
| ३ | नंदुरबार | ४४ | ४२७.११ | ०.०९ | | ६,१६,०००.०० | |
| ४ | उप.प्रा.का.अहेर | ३४ | ९२.३४ | ०.०१ | | ४,७६,०००.०० | |
| | एकुण | २०४ | ५२,६९७.९२ | १२.७८ | - | २८,५६,०००.०० | |

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक ०५ :-** वरील विषयावर साधकबाधक चर्चा होवून, गोदाम शिल्लक असलेल्या धानाचा अंदाज घेवूनच निर्णय घेणे उचित होईल. करीता सदर विषय पुढील सभेत सविस्तर सादर करण्यात यावा असे सर्वानुमते मंजूरी देणेत आली आहे.

**सुचक** :- मा. श्री. केवळराम तुळशीराम काळे, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. श्री. धनराज हरिभाऊ महाले, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**आयत्या वेळेचा विषय क्र ०६ : हंगाम २०१९-२० व २०२०-२१ मध्ये मिलर्सना धान भरडाईसाठी धानासोबत दिलेल्या एकदा वापरलेल्या बारदानाचे दर निश्चितीबाबत व २०१८-१९ चे दर कमी करणेबाबत.**

आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०१६-१७, २०१७-१८ व २०१८,१९ मध्ये वेळोवेळी झालेल्या संचालक मंडळ सभेत ठराव मंजुर करण्यात येवुन धान खरेदीसाठी एकदा वापरलेला बारदाना मुख्य कार्यालय, नाशिक स्थरावर ई-निविदा राबवुन, प्रादेशिक कार्यालय स्थरावर ई-निविदा राबवुन व शेतकऱ्यांकडुन बारदाना खरेदी करण्यात आलेला आहे.

**हंगाम-२०१६-१७**

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालय | ई-निविदा राबवुन एकदा वापरलला बारदाना खरेदी नग | प्रति नग रुपये | एकुण रक्कम | शेतकऱ्यांकडुन धानासोबत खरेदी बारदाना | प्रति नग रुपये | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जव्हार | ०.०० | ०.०० | ०.०० | २३४६४९ | १५.०० | ३५१९७३५.०० |
| २ | भंडारा | ९९२७४८ | १६.४५ | १६३३०७०४.६० | ३०४७५२ | १५.०० | ४५७११८०.०० |
| | | १००००० | १४.३५ | १४३५००० | | | |
| ३ | चंद्रपुर | ३०००० | १४.३५ | ४३०५०० | ० | ०.०० | ०.०० |
| ४ | गडचिरोली | २५०२७९ | १९.०० | ४७५५३०१.०० | ५७२८०९ | १५.०० | ८५९२१३५.०० |
| | | ३३४३५० | १४.५५ | ४८६४७९३.०० | | | |
| ५ | उप प्रा.अहेरी | ० | ०.०० | ०.०० | २९४२३२ | १५.०० | ४४१३४८०.०० |
| | एकुण : | १७०७३७७ | | २७८१६२९८.६० | १४०६४४२ | | २१०९६६३०.०० |

Scanned with CamScanner

हंगाम-२०१७-१८

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालय | ई-निविदा राबवून एकदा वापरलेला बारदाना खरेदी नग | प्रति नग रुपये | एकुण रक्कम | शेतकऱ्यांकडून धानासोबत खरेदी बारदाना | प्रति नग रुपये | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ४२९४२ | २२.०० | १०१०९२४.०० | ० | ०.०० | ०.०० |
| २ | जव्हार | ३५०००० | २२.५० | ७८७५०००.०० | ३१६३६ | १५.०० | ४७४५४०.०० |
| ३ | भंडारा | ५३९००० | २४.२९ | १३०८८८१०.०० | ६७७९२८ | १५.०० | १०१६८९२०.०० |
| | | ४२९४० | २४.०० | १०३०५६०.०० | | | |
| ४ | चंद्रपुर | १३००० | २४.०० | ३१२००० | ० | ०.०० | ०.०० |
| ५ | गडचिरोली | ८०३५०० | २३.९९ | १९२७५९६५.०० | ६९३६२८ | १५.०० | १०४०४४२०.०० |
| एकुण :- | | १७३४३८२ | | २३३४५७४३.०० | १३९७९६८ | | २०९९९१८०.०० |

हंगाम-२०१८-१९

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालय | ई-निविदा राबवून एकदा वापरलेला बारदाना खरेदी नग | प्रति नग रुपये | एकुण रक्कम | शेतकऱ्यांकडून धानासोबत खरेदी बारदाना | प्रति नग रुपये | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ७०००० | २३.६४ | १६५४८००.०० | ० | ० | ०.०० |
| २ | जव्हार | ४५४५०० | २३.६४ | १०७४४३८०.०० | ३६३३९० | २०.०० | ७२६७८००.०० |
| ३ | भंडारा | २९६२००० | २३.६४ | ७००२१६८०.०० | ११५२३८८ | २०.०० | २३०४७७६०.०० |
| ४ | चंद्रपुर | ९९९८७ | २३.६४ | २३६३६९२.६८ | ० | ० | ०.०० |
| ५ | गडचिरोली | १२२५८५० | २३.६४ | २८९७९०९४.०० | ७८२२८५ | २०.०० | १५६४५७००.०० |
| ६ | उप.प्रा.अहेरी | ४७९००० | २३.६४ | ११३२३५६०.०० | ३८२९७३ | २०.०० | ७६५९४६०.०० |
| एकुण : | | ४४७३३३७ | | १०५७४९९६८.६८ | २६८१०३६ | | ५३६२०७२०.०० |

हंगाम २०१९-२० मध्ये शेतकऱ्यांकडुन प्रादेशिक कार्यालय अंतर्गत धानासोबत अंदाजित ३०,००,१०८ नग बारदाना खरेदी करण्यात आलेला आहे. सदर आकडेवारी मध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांकडुन घेतलेल्या बारदाना खरेदीची मंजुरी शासनाकडे मागण्यात आली होती. त्यानुसार अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांनी दिनांक २० ऑक्टोबर,२०२० अन्वये केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे मंजुरी दिली आहे. तसेच केंद्र शासनाच्या दिनांक १३ डिसेंबर,२०१८ व दिनांक १९ मे,२०२० रोजीच्या बारदाना खरेदी संदर्भात असलेल्या निर्देशाचे पालन करणेबाबत सुचना आहेत.

शेतकऱ्यांकडुन धानासोबत घेतलेल्या बारदानाची माहिती सादर करणेबाबत कार्यालयाचे पत्र क्र.३६०३ दिनांक २९.१०.२०२० अन्वये खरेदी केंद्रनिहाय, शेतकरी निहाय बारदाना माहिती सादर करणेबाबत प्रादेशिक कार्यालयांना कळविले आहे. परंतु प्रा.का.चंद्रपूर वगळता उर्वरीत प्रादेशिक कार्यालयाची माहिती अप्राप्त आहे. प्रादेशिक कार्यालयांकडुन माहिती प्राप्त झाल्यानंतर सदरचा अहवाल शासनास सादर केलेनंतर केंद्र शासनाचे मंजुर प्रति नग रु.६.३३ दरानुसार प्रतिपूर्ती शासनाकडुन होणार आहे.

हंगाम २०१६-१७ मध्ये शेतकऱ्यांकडील बारदाना प्रति नग रु.१५/- दराने १४,०६,४४२ नग बारदाना रक्कम रु.२,१०,९६,६३०/- चा खरेदी करण्यात आलेला आहे व ई-निविदे मार्फत प्रति नग रु.१६.४५ ते प्रति नग रु.१९ प्रमाणे १७,०७,३७७ नग बारदाना रु.२,७८,१६,२९९/- चा खरेदी करण्यात आलेला आहे असा एकुण ३१,१३,८१९ नग बारदाना रक्कम रु.४,८९,१२,९२९/- चा खरेदी करण्यात आलेला आहे सदर बारदानाचा सरासरी दर प्रति नग रु.१५.७१ आहे. सदर हंगामात

Scanned with CamScanner

शासनाकडुन प्रति नग रु.६.३३ व मिलर्स कडुन प्रति नग रु.६.०० असे एकुण १२.३३ वसुल होतात. सदर हंगामात प्रति नग रु.३.३८ प्रमाणे रु.१,०५,२४,७०८/- महामंडळास तोटा सहन करावा लागेल.

हंगाम २०१७-१८ मध्ये शेतकऱ्यांकडुन बारदाना प्रति नग रु.१५/-दराने ६,७४,७८४ नग बारदाना रक्कम रु.१,०१,२१,७६०/- चा खरेदी करण्यात आलेला आहे व ई-निविदे मार्फत प्रति नग रु.१३.९९ ते प्रति नग रु.२४.७५ प्रमाणे १७,९४,३८२ नग बारदाना रु. २,९३,४५,७५९/- चा खरेदी करण्यात आलेला आहे असा एकुण २४,६९,१६६ नग बारदाना रक्कम रु.३,९४,६७,५१९/- चा खरेदी करण्यात आलेला आहे सदर बारदानाचा सरासरी दर प्रति नग रु.१६/- आहे. सदर हंगामात शासनाकडुन प्रति नग रु.६.३३ व मिलर्स कडुन प्रति नग रु.६.०० असे एकुण १२.३३ वसुल होतात. सदर हंगामात प्रति नग रु.३.६७ प्रमाणे रक्कम रु.९०,६१,८३९/- महामंडळास तोटा सहन करावा लागेल.

हंगाम २०१८-१९ मध्ये शेतकऱ्यांकडुन बारदाना प्रति नग रु.२०/- प्रमाणे २५,४५,९३५ नग बारदाना रक्कम रु.१,०१,२१,७६०/- चा खरेदी करण्यात आलेला आहे व ई-निविदे मार्फत प्रति नग रु.२३.६४ प्रमाणे ४४,७३,३३७ नग बारदाना रु. १०,५७,४९,६८७/- चा खरेदी करण्यात आलेला आहे असा एकुण ७०,१९,२७२ नग बारदाना रक्कम रु.१५,६६,६८,३८७/- चा खरेदी करण्यात आलेला आहे सदर बारदानाचा सरासरी दर प्रति नग रु.२२.३१/- आहे. सदर हंगामात शासनाकडुन प्रति नग रु.६.३३ व मिलर्स कडुन प्रति नग रु.१०.०० असे एकुण १६.३३ वसुल होतात. सदर हंगामात प्रति नग रु.५.९८ प्रमाणे रक्कम रु.४,१९,७५,२४७/- महामंडळास तोटा सहन करावा लागेल.

राईस मिलर्स असोसिएशन, गोंदिया यांनी दिनांक ६.११.२०२० अन्वये हंगाम २०१८-१९ चा बारदाना हंगाम २०१६-१७ व २०१७-१८ प्रमाणे प्रति नग रु.५/- ते रु.६/- प्रमाणे वसुल करावे अशी विनंती केलेली आहे. तसेच महामंडळाचे मा.श्री भरतसिंग टी. दुधनाग, संचालक यांनी आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत महामंडळाने जुना बारदाना व उपयोगी बारदाना मध्ये खरेदी संस्था केंद्रांवर उघडयावर अंदाजे ८०-९० % धान खरेदी केले होते. मिलिंग करिता मिलर्सला जुना बारदानामध्ये धान देण्यात आले असुन मिलर्सकडुन बारदाना परत न घेता सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये त्या बारदान्याचे दर रु.६ प्रति नग ठरुन कपात करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे हंगाम २०१८-१९ च्या बाकी जुना बारदाना परत न घेता रु.१०/- प्रति नग प्रमाणे कपात करण्यात येत असुन मिलर्स असोसिएशन ची याबाबत तक्रार आहे. त्याची रु. १०/- प्रति नग कपात करु नये अशी मागणी असुन बारदाना परत करु असा त्यांचा प्रस्ताव आहे. जुना वापर झालेला बारदाना निकृष्ट व निरुपयोगी असल्याने परत घेणे योग्य होणार नाही. तसेच त्यांना प्रति नग रु. १०/- हे दर मान्य नाही. करीता यावर पुन्हा विचार करुन मागिल दर रु.६ प्रति नग ठरविल्याप्रमाणे हे दर निश्चित करण्यास काही हरकत नाही असे सुचविले आहे.

**चर्चेसाठी प्रस्ताव :-**

एकदा वापरलेले बारदानाचा व्यवहार करतांना प्रत्येक बारदानामागे TDC ला नुकसान होत आहे. तो कमी करावा म्हणुन रु.६/- प्रती नग पासुन रु.१०/- प्रती नग किंमत वाढवली. मात्र आता मिलर्स त्याला विरोध करत आहे मागणीप्रमाणे रु.१०/-चा दर रु.६/- केल्यास हंगाम २०१८-१९ साठी ७०.१९ लाख बारदानासाठी अधिकचा रु. २.८८ कोटी खर्च सहन करावा लागेल.

हंगाम २०१९-२० व हंगाम २०२०-२१ साठी प्रति नग किती वसुल करावयाचे हे ठरवावे लागेल जर मिलर्सकडुन कमी वसुली व शेतकरी बारदानाला जास्त मोबदला असे धोरण ठेवले तर बारदाना नुकसानी पोटीच मिळणारे TDC ला कमीशन बरेच कमी होईल.

Scanned with CamScanner

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक ०६ :** सदर विषयावर सांगोपांग चर्चा होवून ठराव सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो की, वरील प्रमाणे महामंडळाकडून शेतकऱ्यांना अदा केलेल्या एकदा वापरलेल्या बारदानाची पूर्ण रक्कम मागणी बाबत प्रस्ताव शासनास सादर करावा. तसेच भरडाई करीता जावक धाना सोबतच्या एकदा वापरलेल्या बारदानाचे दर पूर्वी नागपूर येथील २९सप्टेंबर, २०१९ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक बोर्डाच्या सभेमधील मंजूर ठराव क्रमांक ४० नुसार ठरविल्याप्रमाणे रु. १०/- प्रतिनग एवजी संबंधित मिलर्स तयार नसल्याने तो प्रतिनग रु. ८/- प्रमाणे वसुल करणेबाबत ठराव सर्वानुमते मंजूर करणेत येत आहे.

**सुचक** :- मा. अशोक भारुराव मंगाम, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**आयत्या वेळेचा विषय क्र.०७ : खावटी अनुदान योजना.**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अनुसूचित जमातीच्या कुटूंबियांना सहाय्य करण्यासाठी १०० टक्केअनुदान योजना १ वर्षासाठी (सन २०२०-२१) सुरु करण्या करीता **शासन निर्णय क्र.खाअयो-२०२०-२१/प्र.क्र.३७/का.३.दिनांक ०९ सप्टेंबर, २०२०** अन्वये खावटी अनुदान योजनेसाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.या योजनेच्या अमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची नियुक्तीकेली आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने खावटी अनुदान योजना राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.

**आयत्या वेळेचा ठराव क्रमांक ०७ :-** सर्वानुमते ठराव मंजूर करणेत येतो की, कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अनुसूचित जमातीच्या कुटूंबीयांना सहाय्य करण्यासाठी १०० % अनुदान योजना १ वर्षासाठी (सन २०२०-२१) करीता शासन निर्णयानुसार अंमलजवणी करणेबाबत सर्वानुमते मंजूरी देवून नोंद घेण्यात आली.

**सुचक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य.

**अनुमोदक** :- मा. श्री. मगन नुरा वळवी, संचालक सदसय.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक ०८ : हंगाम २००९-१० मध्ये धानाच्या सुरक्षितेसाठीखुल्या जागेवरील धानाची मा. व्यवस्थापकीय संचालक हयांच्या मंजुरीने वाहतुक अन्य गोदामात करण्यासाठी केलेल्या व अदा केलेल्या वाहतूक देयकाना मान्यता देणेबाबत.**

आधारभूत किंमतखरेदी योजनाहंगाम २००९-१० मध्येखरेदी झालेला धान अवकाळी पावसामुळे धानाचे नुकसानहोऊ नये म्हणुनखुल्या जागेवरील धानसाठासुरक्षित ठिकाणी साठवणुक करण्यासाठीतसेच पुरेशीगोदामे उपलब्ध नसल्याने प्रादेशिककार्यालय, भंडारा व गडचिरोली येथील धानसाठाखाजगी वाहतुक ठेकेदारांमार्फत अंतर्गत वाहतुक करुन गोदामातसुरक्षित साठवणुक करणेकरीता पत्र क्र.आविम/विप/आखयो/०९-१०/उ.साठाअंतर्गत वहा.सुरक्षितता/कार्यवाही/१८७/१०, दि.१९ एप्रिल, २०१० निर्देश देण्यात आलेहोते.

त्यानुसार प्रादेशिककार्यालय, भंडारा, व गडचिरोली अंतर्गत खाजगी वाहतुक ठेकेदारांनी धानाची वाहतुक केलीहोती.सदरठेकेदारांना एकुण रु.१.४६ अग्रीम देण्यात आला आहे.त्यापैकीखालील ४ वाहतूक ठेकेदारांची देयके प्राप्त असुन उर्वरित वाहतुक ठेकेदारांचे देयके अप्राप्त आहेत.

| अं. क्र. | प्रा.का.चे नाव | वाहतुक ठेकेदाराचे नाव | एकुण वाहतुक देयक रक्कम | अग्रीम रक्कम | अदाकेलेले वाहतुक रक्कम | अदाकरणे बाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | भंडारा | जय बालाजी ट्रान्सपोर्ट, गोंदिया | १,६५,११,०१८/- | १,००,००,०००/- | --- | ६५,११,०१८/- |
| २ | गडचिरोली | श्री साईबाबा ट्रान्सपोर्ट, गोंदिया | २७,०७,९४१/- | २०,००,०००/- | --- | ७,०७,९४१/- |
| ३ | | प्रमोदसी. अग्रवाल, गोंदिया | २१,२५,२९१/- | १६,००,०००/- | --- | ५,२५,२९१/- |
| ४ | | मनोज ट्रान्सपोर्ट, गोंदिया | १४,३९,१४१/- | १०,००,०००/- | --- | ४,३९,१४१/- |
| एकुण | | | २,२७,८३,३९१/- | १,४६,००,०००/- | --- | ८१,८३,३९१/- |

त्यावेळी परिस्थितीजन्य निर्णय घेवुन खुल्या जागेवरील धान सुरक्षित करण्यात आले होते.राज्य शासनाने अंतर्गत वाहतूकीसाठी रु.१९.९४ प्रति क्विंटल वाहतुक दर मंजुरकेले आहे. त्यास अंतराचे बंधन नसल्याने वाहतूक ठेकेदारांना सदर दर मान्य नसल्याने उपरोक्त तक्त्यातील अनुक्रमांक १ ते ४ ठेकेदारांनी करारनामा अट क्र.२७ नुसार व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे लवाद दाखल केला आहे. त्यावर निर्णय झालेला नाही.

धानाची वाहतुक करण्यासाठी वाहतुक ठेकेदारांना अग्रीम रक्कम अदा केली आहे.मात्र शासनाने वाहतुक देयके मंजुर न केल्याने त्यांना दिलेल्या अग्रीम रकमेचे अद्यापही समायोजन झालेले नाही.समायोजन होण्याच्या दृष्टीने सदर देयकाबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.तसेच उपरोक्त व्यतीरीक्त वाहतुक ठेकेदारांचे त्याच हंगामातील अंतर्गत वाहतुकीचे देयके प्राप्त झाल्यास त्यांचेबाबत देखील निर्णय होणे आवश्यक आहे.करीता मान्यतेस सादर.

**आयत्या वेळेचा ठराव क्रमांक ०८ :-** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो की, अंतर्गत वाहतुकी करीता वाटतुक ठेकेदारांची सभा घेऊन पुढील योग्य तो निर्णय व्यवस्थापकीय संचालक यांनी घ्यावा.

**सुचक** :- मा. श्री.भरतलाल थुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य.
**अनुमोदक** :- मा. श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदस्य.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

Scanned with CamScanner

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक ०९ : भागभांडवलकरीता शासनाकडुन प्राप्त झालेला रक्कम रु.१०/- कोटीतुन रक्कम रु.७/- कोटी निधी एकाधिकार खरेदी योजनेकरीता उपयोग करणे बाबत.**

एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०२०-२१ मध्ये अन्नधान्य खरेदीकरीता नजरगहान कर्ज मंजुरीसाठी संदर्भ क्र.३ अन्वये वित्त मुख्य कार्यालय, नाशिक यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला असुन त्यांचे मार्फत MSC बँकेचे नजरगहाण कर्ज मंजूरीस प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

हंगाम २०१९-२० मध्ये MSC बँकेकडुन रक्कम रु.७.५० कोटी ४०% दुराव्याने व १२% व्याज दराने कर्ज घेणेत आले आहे. सदर नजरगहान कर्जा पैकी रु. १.५० कोटी उचल करण्यात आली आहे. सदर कर्ज मंजूर करताना MSC बँकेकडून प्रोसेसिंग फी, खरेदी करीता बँक पोस्टेज चार्जेस आकारण्यात आले आहे. या कामी रक्कम रु.५ ते ६ लक्ष खर्च झालेला आहे.

संदर्भ क्र.५ चे शासन निर्णया नुसार एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत महामंडळास भागभांडवला करीता रक्कम रु.१०/- कोटी प्राप्त झालेले आहेत. संदर्भ क्र.४ चे शासन निर्णया नुसार त्यापैकी रक्कम रु.३/- कोटी निधी गोदाम बांधकामाकरीता मंजुर करणेत आला आहे. उर्वरीत शिल्लक रक्कम रु.७/- कोटी एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत खरेदी करीता उपयोगात घेतल्यास MSC बँकेकडुन कर्ज घेण्याची आवश्यकता राहणार नाही व व्याजाची बचत होईल.

तरी भागभांडवलापैकी शिल्लक असलेला निधी रक्कम रु. ७.०० कोटी एकाधिकार योजनेसाठी वापरण्या करीता मंजूर मिळणेस सादर.

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक ०९ :-** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो की, महामंडळाचे हित लक्षात घेता शासन निर्णयानुसार एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत महामंडळास प्राप्त भागभांडवला पैकी उर्वरित शिल्लक रु. ७/- कोटी एकाधिकार खरेदी योजना राबविण्यास निधी उपयोगात आणणे बाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करणेत येत आहे.

**सुचाक** :- मा.सूनिल चंद्रकांत भुसारा, संचालक सदसय.

**अनुमोदक** :- मा. विठ्ठल देवराम देशमुख, संचालक सदसय.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

उपरोक्त सर्व विषयांवर चर्चा होऊन ठराव घेण्यात आले आणि मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक तथा मा.मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई यांच्या वतीने व्यवस्थापकी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**व्यवस्थापकीय संचालक,**
**म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,**
**मुख्य कार्यालय, नाशिक**

मा. अध्यक्ष

Scanned with CamScanner